मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषद

नियतकालिक

(त्रैमासिक)

# अर्थसंवाद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

पौष–माघ–फाल्गुन–चैत्र १९४७–४८

जानेवारी–फेब्रुवारी–मार्च २०२६/खंड ४९, अंक ४

# महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
(स्थापना : १९ नोव्हेंबर, १९६०)

**रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०२५**

दूरध्वनी : ०२२-२४३२५९२९/३१ फॅक्स : ०२२-२४३२ ५९३१ ई-मेल : secretary.sblc-mh@gov.in
संकेतस्तळ : https://msblc.maharashtra.gov.in


**मंडळाच्या योजना**

१. पुस्तक प्रकाशन योजना-विविध विषयांवरील बृहद्ग्रंथ प्रकाशित करणे
२. महाराष्ट्राचे शिल्पकार चरित्रमाला योजना
३. उत्कृष्ट ग्रंथांची भाषांतरे योजना
४. ललित व ललितेतर वाङ्मयाच्या प्रकाशनार्थ अनुदान योजना
५. नवलेखक पुस्तक प्रकाशनासाठी उत्तेजनार्थ अनुदान योजना
६. नवलेखक कार्यशाळा अनुदान योजना
७. नियतकालिकांना अनुदान योजना
८. स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना, विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार योजना, श्री.पु. भागवत पुरस्कार योजना
९. अन्य मराठी साहित्य संमेलनांना अनुदान योजना.

**मंडळाची निवडक प्रकाशने**

१. मृगपक्षिशास्त्र (मूळ संस्कृतासह) हंसदेव विरचित-संपा. मारुती चित्तमपल्ली. पं. नरसिंशास्त्री भातखंडे
२. खगोलशास्त्राचे विश्व - डॉ. जयंत विष्णू नारळीकर
३. कलेची मूलतत्त्वे (R.G.Collingwood यांच्या The Principles of Art या पुस्तकाचे भाषांतर) – स.गं. मालशे, डॉ. मिलिंद मालशे
४. मराठी चित्रपटसृष्टीचा समग्र इतिहास-रेखा देशपांडे.
५. महाराष्ट्राचा खाद्यसंस्कृतीकोश - संपा. डॉ. अनुपमा उजगरे
६. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास खंड पहिला- के.के. चौधरी
७. श्री. चांगदेव पासष्टी (अर्थ व विवरणासहित) – स्वामी नित्यबोधानंदतीर्थ
८. आधुनिक संत आणि समाज - श्री. रवींद्र गोळे

**मंडळाची निवडक ४४४ पुस्तके ई-बुक स्वरुपात मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत.**

**मंडळाच्या पुस्तकांचे जिल्हानिहाय वितरक**

१. मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगाव, मुंबई
२. आयडियल पुस्तक, दादर, मुंबई
३. लोकवाङ्मयगृह, प्रभादेवी, मुंबई.
४. लक्ष्मी बुक डेपो, शिवाजी पेठ, ठाणे.
५. अक्षर साहित्य , चिपळूण, जि. रत्नागिरी.
६. अशोक एजन्सीज्, कणकवली, जि. सिंधुदुर्ग
७. ज्योती स्टोअर्स बुकसेलर, नाशिक.
८. अक्षय लॉ बुक सेलर्स, देवपूर, धुळे.
९. मे. शारदा प्रकाशन आणि बुक डेपो, जळगाव
१०. शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, जि. अहमदनगर
११. मॅजेस्टिक बुक स्टॉल, पुणे.
१२. बलशेटवार बुक सेलर्स, सातारा.
१३. गजानन बुक स्टोअर्स, सोलापूर.
१४. मे. अजब पुस्तकालय, कोल्हापूर.
१५. मेहता बुक सेलर्स, कोल्हापूर.
१६. मे. धारा (साकेत) प्रकाशन, औरंगाबाद
१७. दीपाली बुक एजेन्सी, जालना.
१८. देबडबाड पुस्तक भांडार, नांदेड.
१९. शारदा बुक डेपो, अकोला.
२०. भारतीय पुस्तकालय, लातूर.
२१. मेसर्स प्रकाश बुक डेपो, अकोला.
२२. सरस्वती बुक्स अँड स्टेशनर्स, अमरावती.
२३. स्वराज्य भांडार महिला सेवा मंडळ, वर्धा
२४. मे. साहित्य प्रसार केंद्र, चंद्रपूर
२५. साहित्य वितरण केंद्र, चंद्रपूर
२६. मुद्रा बुक डेपो, पालघर
२७. मावळे बुक डेबो, कर्जत, जि. रायगड
२८. सुशांत बुक डेपो, नंदूरबार
२९. रत्नाकर बुक सेलर्स, मिरज, सांगली
३०. पूजा ग्रंथ वितरण, परभणी
३१. गोपाल बुक सेलर, हिंगोली
३२. अनुराग पुस्तकालय, अंबाजोगाई, बीड.
३३. टिकार बुक एम्पोरिअम, जि. बुलढाणा
३४. बालाजी बुक डेपो, वाशिम.
३५. गणेश पुस्तकालय, यवतमाळ.
३६. व्हीजन बुक शॉप, भंडारा.
३७. सनी स्टोअर्स, गोंदिया.
३८. राहुल ट्रेडिंग कंपनी अ‍ॅन्ड बुक डेपो, गडचिरोली

**शासकीय ग्रंथागारांचे पत्ते**
**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची पुस्तके मिळणाऱ्या शासकीय ग्रंथागारांचे पत्ते**

१. संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, नेताजी सुभाष मार्ग, चर्नीरोड, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी : (०२२) २३६३२६९३ २३६३०६९५, २३६३११४८, २३६३४०४९

२. व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी.पी.ओ. नजीक, पुणे ४११ ००१.
दूरध्वनी : (०२०) २६१२५०८०८

३. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, सिव्हिल लाईन्स, नागपूर – ४४० ००१.
दूरध्वनी : (०७१२) २५६२६१५

४. सहायक संचालक, शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार, शहागंज, गांधी चौकाजवळ, औरंगाबाद ४३१००१.
दूरध्वनी : (०२४०) २३३९१०९७

५. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, ताराबाई पार्क, कोल्हापूर – ४१६ ००३.
दूरध्वनी : (०२३१) २६५०३९५ २६५०४०२

**मंडळाकडून प्रकाशित ५२४ ग्रंथांवर २५२ अधिकृत वितरकांना ४० टक्के सूट मिळेल. जास्तीत जास्त पुस्तक वितरकांनी अधिकृत वितरणासाठी सहभागी व्हावे, असे आवाहन सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी मंडळाच्या https://msblc.maharashtra.gov.in संकेतस्थळाला भेट द्या.**

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।
www.marthpari.org
(स्थापना वर्ष - १९७७)

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये।
शोधचर्चाविवादार्थं संवादोऽयं प्रवर्तितः।।

# अर्थसंवाद

(तज्ज्ञ परिक्षित नियतकालीक)

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

जानेवारी - फेब्रुवारी - मार्च २०२६ / खंड ४९ / अंक ४

**प्रमुख संपादक**
राहुल शं. म्होपरे
(देवचंद कॉलेज, अर्जुननगर)

**सहाय्यक संपादक**
चंद्रकांत जाधव
(य.च.वारणा महाविद्यालय, वारणानगर)

**सल्लागार मंडळ**
(२०२५-२८)
सुर्यकांत जगदाळे
जगन्नाथ पाटील
राजेंद्र भांडवलकर
विनोद गावंडे

**संपादकीय पत्रव्यवहार**
राहुल शं. म्होपरे
'सर' निवास, री.स.नं. ३३/क/२,
प्लॉट नं. १८, लेक व्ह्यू कॉलनी,
दीपा गॅस गोडावूनच्या पाठीमागे,
उजळाईवाडी, ता. करवीर,
जि. कोल्हापूर - ४१६ ००४
भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०

**लेखातील मते लेखकांचीच**

## अ नु क्र म णि का

१. **राहुल शं. म्होपरे, गणेश आ. टेकळे**
आर्थिक पाहणी अहवाल २०२५-२६ : उदयोन्मुख आव्हाने आणि भविष्यातील धोरणात्मक दिशेचे चिकित्सक मूल्यांकन ............ २७४

२. **प्रमोद पांडुरंगराव लोणारकर**
केंद्रिय अर्थसंकल्प २०२६-२७ - एक दृष्टीक्षेप ................. २८६

३. **समित माहोरे**
महाराष्ट्र राज्याचा अर्थसंकल्प : २०२६-२७ ते विकसित महाराष्ट्र २०४७ ......................... २९३

४. **विनोद म. गावंडे, लक्ष्मण रामभाऊ म्हस्के, निता सखाराम खिराळे**
शाश्वत विकासासाठी हरित वाहतूक : वर्तमान परिस्थिती आणि आव्हाने ............................... ३०५

५. **राजकुमार आण्णासो वाईंगडे**
विकसित भारत @ २०४७ साठी आर्थिक सुधारणा ............. ३१५

६. **एम. एच. शिंदे**
जागतिक पातळीवरील बदलते आर्थिक संदर्भ आणि भारताची व्यापाररचना ........................................ ३२५

७. **मृणालिनी नरेन्द्र तापसे**
महाराष्ट्रातील मंदिरामुळे होणाऱ्या विकसित अर्थव्यवस्थेचे अध्ययन ........................................ ३३५

८. **नारायण नामदेव राऊत**
AI आणि भारताचा लोकसंख्यात्मक लाभ : रोजगारातून सर्वसमावेशक विकासाकडे ......................... ३४५

९. **मारोती तेगमपुरे**
मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४८ वे वार्षिक अधिवेशन : २०२५-२६ कार्यवाहांचा अहवाल ............................ ३५४

- संदर्भ सूची
अ) लेख सूची ............................................ ३५९
ब) लेखक सूची ........................................... ३६१
क) नवीन आजीव सभासदांची यादी .......................... ३६३
ड) तज्ञ परीक्षक सूची ..................................... ३६५

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### कार्यकारी मंडळ २०२४-२५

- **अध्यक्ष**

  **विलास खंदारे (देवगाव रंगारी)**

- **कार्याध्यक्ष**

  **विकास सुकाळे (नांदेड)**

- **कार्यवाह खजिनदार**

  **मारोती वि. तेगमपुरे (अंबड)**

- **प्रमुख संपादक-अर्थसंवाद**

  **राहुल शं. म्होपरे (कोल्हापूर)**

- **विश्वस्त**

  **विठ्ठल घीणमीने (हिंगणघाट)**
  **धोंडीराम पवार (पुणे)**
  **गणेश गावंडे (बदनापूर)**

- **सदस्य**

  **जयवंत इंगळे (मलकापूर)**
  **बाळासाहेब पाटील (पनवेल)**
  **सुभाष सावंत (नाशिक)**
  **राजाराम पाटील (सोलापूर)**
  **जितेंद्र तलवारे (धुळे)**
  **विठ्ठल ठावरी (भिसी)**
  **राजू शिंदे (धुळे)**
  **हनुमंत भोसले (खामगाव)**
  **विजय भोपाळे (नांदेड)**
  **धीरज कदम (नागपूर)**
  **दिपक भुसारे (पैठण)**

- **स्वीकृत सदस्य**

  **संभाजी काळे (भेंडा)**
  **लक्ष्मण मस्के (अमरावती)**

- **स्थानिक कार्यवाह**

  **धनंजय काळे (अकोला)**

**कार्यालयीन पत्रव्यवहार:**
(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक : **मारोती वि. तेगमपुरे**
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
'संगाई', घर नं. २२, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपामागे, पारनेर रोड, अंबड, जि. जालना.
पिन - ४३१ २०४ भ्रमणध्वनी : ९४२३९९३१३७

**अर्थसंवाद वर्गणी :**

- **परिषदेचे सदस्य :**

  आजीव सदस्य : रु. ३०००/- (एकरकमी)
  इमारत निधी : रु. २०००/-
  सदस्य सूची : रु. १००/-
  एकूण : रु. ५१००/-

- **संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:**

  शैक्षणिक संस्था, व्यावसायिक संस्था, ग्रंथालये } रु.२०००/-(त्रैवार्षिक), रु.३०००/-(पंचवार्षिक)

- **वर्षगणना :** १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्ट किंवा NEFT (BOI खाते क्र. 094720110000368, IFSC - BKID0000947, राजारामपुरी, कोल्हापूर) द्वारे प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.

**'अर्थसंवाद'साठी अनुदानाबद्दल आभार:**
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

टीप : म. रा. सा. सं. मंडळाने अनुदान दिले असले, तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

हे त्रैमासिक, प्रकाशक मारोती वि. तेगमपुरे (प्रमुख संपादक राहुल शं. म्होपरे) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता भारती मुद्रणालय, शाहूपुरी, कोल्हापूर येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपामागे, पारनेर रोड, अंबड - ४३१ २०४ येथे प्रसिद्ध केले.

# आर्थिक पाहणी अहवाल २०२५-२६ : उदयोन्मुख आव्हाने आणि भविष्यातील धोरणात्मक दिशेचे चिकित्सक मूल्यांकन

**राहुल शं. म्होपरे** †
**गणेश आ. टेकळे** ††

**प्रस्तावना**

२९ जानेवारी २०२६ रोजी यावर्षीचा आर्थिक पाहणी अहवाल प्रकाशित करण्यात आला आहे. आर्थिक पाहणी अहवाल केंद्रीय अर्थसंकल्पापूर्वी संसदेत विचारार्थ सादर केला जातो. १९५०-५१ मध्ये भारताचा पहिला आर्थिक पाहणी अहवाल प्रकाशित झाला. आर्थिक पाहणी अहवाल १९६४ पर्यंत केंद्रीय अर्थसंकल्पासोबत सादर केला जात होता, त्यानंतर अर्थसंकल्पाच्या आधी त्याचे सादरीकरण केले जाऊ लागले. आर्थिक सर्वेक्षणाच्या शिफारशी आणि त्यांचे सरकारने सादरीकरण करणे, हे संविधानानुसार बंधनकारक नाही (म्होपरे आणि टेकळे, २०२४).

या अहवालात प्राचीन महाकाव्य रामायणातील युद्धकांडाच्या प्रसंगाचा दाखला देत, प्रसंग बाका असला तरी शत्रू किंवा विरोधकांकडे असलेल्या चांगल्या गुणांचा अभ्यास प्रगतीसाठी आवश्यक असल्याचा संदेश सरकारने दिला आहे. सध्याच्या जटिल जागतिक परिस्थितीत, जिथे भू-राजकीय तणाव आणि आर्थिक अस्थिरता वाढत आहे, तिथे भारताची रणनीती लवचिक राहाणार असल्याचे यातून सूचित होते (प्रभात वृत्तसेवा, २०२६).

आकडेवारीच्या संकलनापेक्षा आर्थिक पाहणी अहवाल हा भारताच्या आर्थिक प्रवासाचे, संरचनात्मक ताकदीचे, उदयोन्मुख आव्हानांचे व भविष्यातील धोरणात्मक दिशेचे सरकारचे अधिकृत मूल्यांकन आहे. हा अहवाल भारतीय अर्थव्यवस्था कुठे आहे आणि कुठे जात आहे याचे सुसंगत वर्णन करतो. गेल्या काही वर्षात, ते नवीन विश्लेषणात्मक चौकटी, धोरणात्मक कल्पना आणि सुधारणाकेंद्रित विचार सादर करण्याचे व्यासपीठ बनले आहे (Vision IAS, 2026). यामुळे विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा उमेदवार, संशोधक, गृहिणी, नोकरदार, कामगार, शेतकरी व देशातील प्रत्येक अर्थशास्त्र अभ्यासकांस आर्थिक पाहणी अहवाल अभ्यासणे अपरिहार्य आहे (म्होपरे आणि टेकळे, २०२४). म्हणून या कारणास्तव प्रस्तुत लेखात आर्थिक पाहणी अहवाल २०२५-२६ मधील काही मुख्य विषयांवर ठळकपणे विवेचन केले आहे.

† प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर.
आजीव सभासद क्र. ११९४, भ्रमणध्वनी: ९९२३८७९०२०, ई-मेल: rahulmhopare@rediffmail.com
†† संशोधक विद्यार्थी.
आजीव सभासद क्र. २०००, भ्रमणध्वनी: ८६००८०४१०७, ई-मेल: ganeshtekale159@gmail.com

**आर्थिक पाहणी अहवाल २०२५-२६ मधील घटक**

| अ.क्र. | घटक |
|---|---|
| १ | अर्थव्यवस्थेची स्थिती : वृद्धी सीमारेषा पुढे नेणे. (State of the Economy: Pushing the growth frontier) |
| २ | वित्तीय विकास : विश्वासार्ह एकत्रिकरणाद्वारे स्थिरता टिकवणे. (Fiscal Developments: Anchoring Stability Through Credible Consolidation) |
| ३ | चलन व्यवस्थापन आणि आर्थिक मध्यस्थी: नियामक सुधार (Monetary Management and Financial Intermediation: Refining the Regulatory Touch) |
| ४ | बाह्य क्षेत्र : दीर्घकाळ चालणारा खेळ (External Sector: Playing the Long Game) |
| ५ | महागाई : नियंत्रित आणि स्थिर (Inflation: Tamed and Anchored) |
| ६ | शेती आणि अन्न व्यवस्थापन: उत्पादकता वाढविणे, उत्पन्न सुरक्षित करणे आणि अन्नसुरक्षा सुनिश्चित करणे. (Agriculture and Food Management: Raising Productivity, Securing Incomes and Ensuring Food Security) |
| ७ | सेवा: स्थिरतेपासून नवीन सीमांपर्यंत (Services – From Stability to New Frontiers) |
| ८ | उद्योगाची पुढील झेप: संरचनात्मक परिवर्तन आणि जागतिक एकात्मता (Industry's Next Leap - Structural Transformation and Global Integration) |
| ९ | गुंतवणूक आणि पायाभूत सुविधा: कनेक्टिविटी, क्षमता आणि स्पर्धात्मकता मजबूत करणे. (Investment and Infrastructure - Strengthening Connectivity, Capacity and Competitiveness) |
| १० | पर्यावरण आणि हवामान बदल: एक लवचिक, स्पर्धात्मक आणि विकासकेंद्रित भारताची निर्मिती. (Environment and Climate Change - Building a Resilient, Competitive and Development-Driven India) |
| ११ | शिक्षण आणि आरोग्य: काय काम करते आणि पुढे काय. (Education and Health - What Works and What's Next) |
| १२ | रोजगार आणि कौशल्य विकास: योग्य कौशल्य प्राप्त करणे. (Employment and Skill Development - Getting Skilling Right) |
| १३ | ग्रामीण विकास आणि सामाजिक प्रगती: सहभागापासून भागीदारीपर्यंत (Rural Development and Social Progress: From Particpiation to Partnershpi) |
| १४ | भारतातील एआय इकोसिस्टमची उत्क्रांती: पुढील मार्ग (Evolution of the AI Ecosystem in India - The Way Forward) |
| १५ | शहरीकरण: भारतातील शहरांना नागरिकांसाठी उपयुक्त बनविणे. (Urbanisation - Making India's Cities Work for Its Citizens) |
| १६ | भाग १ आयात प्रतिस्थापनेपासून ते धोरणात्मक लवचिकता आणि धोरणात्मक अपरिहार्यतेपर्यंत (From Import Substitution to Strategic Resilience and Strategic Indispensability) |
| १६ | भाग २ धोरणात्मक लवचिकता आणि धोरणात्मक अपरिहार्यता निर्माण करणे: राज्य, खासगी क्षेत्र आणि नागरिकांची भूमिका. (Building Strategic Resilience and Strategic Indispensability: The Role of the State, The Private Sector and the Citizens) |

स्त्रोत: आर्थिक पाहणी अहवाल २०२५-२६

**अर्थव्यवस्थेची स्थिती**

अमेरिकेने परस्पर शुल्क वाढवण्यामुळे चलनवाढीची चिंता निर्माण झाली होती, परंतु २०२६ मध्ये जागतिक आर्थिक विकासदर ३.३ तर जागतिक चलनवाढ ३.८ पर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. भारताच्या बाबतीत २०२६ मध्ये ७.४% वास्तविक सकल देशांतर्गत उत्पन्न (जीडीपी) वाढ तर जीव्हीएमध्ये ७.३% वाढ अपेक्षित आहे. ही वाढ समाधानकारक वाटत असली, तरी तिचा लाभ सर्व घटकांपर्यंत समानरीत्या पोहोचतो का, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. उत्पन्नातील विषमता, ग्रामीण-शहरी दरी, बेरोजगारी यांसारख्या संरचनात्मक समस्यांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. आर्थिक वर्ष २०२६ च्या सुरुवातीला खाजगी अंतिम उपभोग खर्च (पीएफसीई) ७.५% ने वाढला आहे जो २०१२ नंतरचा सर्वाधिक आहे. कमी चलनवाढ, स्थिर रोजगार स्थिती व सुधारीत वास्तविक क्रयशक्तीमुळे उपभोग वाढीस चालना मिळाली आहे. शेती (३.१%), उद्योग (६.२%) व सेवा (९.१%) ने वाढ दर्शवली आहे. सेवाक्षेत्राचा वाटा सर्वाधिक असून, यसाठीचे प्रमुख घटक रियल इस्टेट, वित्तीय सेवा व व्यावसायिक सेवा हे आहेत. एकंदरीत, आकडेवारी आशादायी असली तरी तिच्या शाश्वतता, समावेशकता आणि दीर्घकालीन परिणामांचा सखोल अभ्यास करणे अत्यावश्यक आहे.

**२. वित्तीय विकास**

जीडीपीच्या ९.२% (२०२१) वरून ४.८% (२०२५) पर्यंत राजकोषीय तूट झपाट्याने कमी झाली आहे. ही घट निश्चितच स्वागतार्ह आहे; मात्र २०२१ हे कोविडनंतरचे अपवादात्मक वर्ष होते. त्यामुळे उच्च तुटीच्या तुलनेत घट दिसणे स्वाभाविक होते. त्यामुळे या घटीचे मूल्यमापन करताना आधारवर्ष (Base effect) लक्षात घेणे गरजेचे आहे. बजेट २०२६ मध्ये ४.४% राजकोषीय तूट मांडण्यात आली आहे, जी स्थिर एकत्रीकरण दर्शवते. प्राथमिक तूट लक्षणीयरीत्या कमी झाल्यामुळे कर्जनियंत्रणाची दिशा स्पष्ट होते की, चालू खर्चासाठी निधी उभारणी देण्याऐवजी नवीन कर्जाचा वापर कर्ज फेडण्यासाठी करण्यात येत आहे. कर सुधारणा, जीएसटी डिजिटल वापर व थेट कर नफा प्राप्ती वाढली असून जीडीपीच्या १०.८% (कोविड महामारीपूर्व) वरून ११.५% (कोविड महामारीनंतर) पर्यंत वाढ झाली आहे. रिझर्व्ह बँकेने २.६८ लाख कोटी रुपयांचे अधिशेष हस्तांतरण मंजूर केले जे मागील वर्षाच्या (२०२५) तुलनेत २७% जास्त आहे. एप्रिल-नोव्हेंबर दरम्यान भांडवली खर्च वार्षिक २८% ने तर महसूल खर्च केवळ १.८% ने वाढला आहे. राज्यांची एकत्रित राजकोषीय तूट जीडीपीच्या २.८% राहिली आहे. मंदावलेल्या महसुलामुळे आणि वाढत्या रोख हस्तांतरण योजनांमुळे महसुली तूट वाढलेली आहे. राजकोषीय एकत्रीकरणाची दिशा सकारात्मक असली तरी त्याची शाश्वतता, कर्जभार आणि सामाजिक क्षेत्रावरील परिणाम यांचा संतुलित आढावा घेणे आवश्यक आहे.

**३. चलन व्यवस्थापन आणि आर्थिक मध्यस्थी**

कॅलिब्रिटेड चलन सुलभता, लवचिक संस्थात्मक ताळेबंद आणि मजबूत आर्थिक मध्यस्थीमुळे भारताच्या आर्थिक व वित्तीय क्षेत्रांनी एप्रिल-डिसेंबर २०२५ मध्ये चांगली कामगिरी केली आहे. या कालावधीत चलनविषयक धोरण समितीने (एम.पी.सी.) रेपो दर १०० बेसिस पॉईंट्सने घटवला. सी.आर.आर. १०० बेसिस पॉईंट्सने कमी करून ३.०% केला. त्यामुळे बँकिंग प्रणालीत २.५ लाख कोटी रुपयांची तरलता निर्माण झाली. व्याजदर कपातीमुळे कर्जवाढ आणि गुंतवणूक वाढू शकते; परंतु अतितरलतेमुळे भविष्यात चलनवाढीचा दबाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. व्यवसायिक क्षेत्रांना मिळणारे कर्ज व ठेवीत वाढ झाल्यामुळे ब्रॉड मनी (M3) १२.१% पर्यंत वाढला. ही वाढ अर्थचक्राला चालना देणारी असली तरी ती

वास्तविक उत्पादनवाढीशी सुसंगत आहे का, हे तपासणे महत्त्वाचे ठरते. सुधारित आर्थिक मध्यस्थी व बँकांकडून तरलता वितरण दर्शवणारे पैशाचे गुणक ६.२% पर्यंत वाढले. एक राज्य-एक आरआरबी धोरणांतर्गत प्रादेशिक ग्रामीण बँकांच्या एकत्रीकरणामुळे ग्रामीण आर्थिक सक्षमीकरणात सुधारणा झाली. मे २०२५ पर्यंत त्यांची संख्या १९६ वरून २८ पर्यंत कमी झाली असून, कार्यक्षमता व भांडवली स्थिती मजबूत झाली आहे. कार्यक्षमता वाढली असली तरी ग्रामीण भागातील स्थानिक गरजा व उपलब्धता यावर त्याचा नकारात्मक परिणाम झाला नाही, हा विचार आवश्यक आहे. रिझर्व्ह बँकेने ९००० पेक्षा जास्त पारित प्रकरणे २३८ मास्टर सर्क्युलरमध्ये एकत्रित करून नियमन सुलभ केले व पारदर्शकता वाढवली असली तरी अति-एकत्रीकरणामुळे सूक्ष्म तपशील दुर्लक्षित होण्याची शक्यता असते.

**४. बाह्य क्षेत्र**

जागतिक आर्थिक व्यवस्था वाढत्या व्यापार संरक्षणवादामुळे तसेच जागतिक अनिश्चिततेमुळे आंतरराष्ट्रीय व्यापारावर परिणाम झाला आहे. जागतिक व्यापार वाढीचा दर २०२४ मध्ये ३.१% वरून २०२५ मध्ये ३.६% तर २०२६ मध्ये २.८% पर्यंत कमी होण्याचा अंदाज वर्तवला आहे. भारतीय मजबूत देशांतर्गत मागणीमुळे २०२५ मध्ये एकूण आयात ७.४% वाढून ८०.३३ लाख कोटी रुपये झाली, तर एकूण व्यापार तूट ८.२७ लाख कोटी रुपये झाली. सोन्याच्या आयातीत वार्षिक २७.४% वाढ झाली, जी मजबूत देशांतर्गत मागणी व वाढत्या किंमती दर्शवते. ही वाढ उत्पादक गुंतवणुकीऐवजी निष्क्रिय मालमत्तेकडे झुकणारी प्रवृत्ती दर्शवते, ज्याचा चालू खाते तुटीवर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. भारताने निर्यात बाजारपेठेचे विविधीकरण करून रत्ने, कापड, व ऑटो घटकांवरील अमेरिकेचे अवलंबित्व कमी केले असून, परकीय चलनसाठ्यात वाढ व उच्च कर जोखीमेत घट केली आहे. असे जरी असले तरी, नवीन बाजारपेठांतील स्पर्धा, दर्जात्मक मानके आणि चलनातील अस्थिरता यांसारखी आव्हानेदेखील विचारात घ्यावी लागतील. एकंदरीत, व्यापार क्षेत्रात काही सुधारणा दिसत असल्या तरी वाढती आयात व व्यापार तूट यामुळे बाह्यक्षेत्रातील स्थैर्याबाबत सावध दृष्टिकोन आवश्यक ठरतो.

**५. महागाई**

कोरोना कालावधीनंतरच्या उच्चांकावरून जागतिक चलनवाढ कमी झाली आहे. २०२२ मध्ये ८.७% वरून २०२५ मध्ये ४.२% पर्यंत चलनवाढ घसरली असून, वस्तूंच्या किंमती कमी झाल्या व पुरवठा साखळी स्थिर झाली आहे. ही घट लक्षणीय असली तरी ती मोठ्या प्रमाणावर 'बेस इफेक्ट'मुळे देखील असू शकते. कारण २०२२ हे महामारीनंतरचे अपवादात्मक उच्च चलनवाढीचे वर्ष होते. पुरवठा साखळी स्थिर झाली असली तरी भूराजकीय तणाव, ऊर्जादरातील चढउतार आणि हवामान बदल यांसारख्या घटकांमुळे भविष्यातील अनिश्चितता कायम आहे. भारतामध्ये २०२५ मध्ये २.८% महागाई दर नोंदवला गेला, जो उदयोन्मुख अर्थव्यवस्थांमध्ये सर्वात कमी दरांपैकी एक आहे. तथापि, सरासरी दर कमी असला तरी अन्न, आरोग्य, शिक्षण किंवा निवास या आवश्यक घटकांतील किंमतवाढीचा परिणाम सर्वसामान्य नागरिकांवर अधिक होतो. त्यामुळे 'सरासरी' महागाई आणि 'अनुभवात्मक' महागाई यात फरक लक्षात घेणे गरजेचे आहे. आरबीआयने रेपो दरात एकूण १.२५ टक्के कपात केली आहे. घाऊक किंमत निर्देशांक (WPI) ही ग्राहक किंमत निर्देशांक (CPI) महागाईपेक्षा सातत्याने कमी राहिल्याने किरकोळ किंमतींवर दबाव निर्माण झाला आहे. जागतिक बाजारातील तेल व अन्नधान्य किंमतीतील स्थैर्यामुळे एकूण चलनवाढ नियंत्रणात राहिली आहे. यासोबतच जागतिक अनिश्चितेमध्ये सोने व चांदीच्या किंमतीमध्ये झालेल्या तीव्र वाढीमुळे मुख्य चलनवाढ दिसून येत

आहे. सोने-चांदीच्या किंमतीतील वाढ 'मुख्य चलनवाढी'शी जोडली आहे; परंतु मुख्य (Core) चलनवाढ साधारणतः अन्न व इंधन वगळून मोजली जाते, त्यामुळे संकल्पनात्मक स्पष्टता आवश्यक आहे.

कृषी उत्पादनातील व पुरवठ्यातील सुधारणा, देशांतर्गत उत्पादनात वाढ, स्थिर आयात व निर्यात वाढ यामुळे किंमतींवर सकारात्मक परिणाम झाला आहे. उत्तम साठा व्यवस्थापन आणि कच्च्या मालाचा योग्य वापर तसेच विविधीकरणामुळे अन्नधान्याच्या किंमती कमी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. महत्त्वाचे म्हणजे गृहनिर्माण, आरोग्य हे स्थिर, आदान खर्च कमी झाल्याने कपडे व पादत्राणे यांत तीव्र घट आणि वाहतूक दळणवळणात प्रासंगिक अस्थिरता दिसून आली आहे; परंतु स्पष्टपणे चलनवाढीचा कल दृष्टीस येत आहे.

**६. शेती आणि अन्न व्यवस्थापन**

कृषी आणि संबंधित व्यवसाय राष्ट्रीय उत्पन्नात एक पंचमांश योगदान देतात व ४६.१% रोजगारनिर्मिती करतात. तथापि, इतक्या मोठ्या प्रमाणावर रोजगार देणाऱ्या क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा तुलनेने कमी असल्यामुळे उत्पादकता कमी असल्याचे सूचित होते. यावरून ग्रामीण उत्पन्नातील मर्यादा व लपलेली (छुपी) बेरोजगारी (Disguised unemployment) यांसारख्या संरचनात्मक समस्यांकडे लक्ष देणे आवश्यक ठरते. अनुकूल मान्सून व धोरणात्मक उपाययोजनांमुळे अन्नधान्याचे उत्पादन वाढून २०२४-२५ च्या हंगामात ३५७७.३ लाख मेट्रिक टन झाले, जे वार्षिक सरासरीपेक्षा २५४.३ लाख मेट्रिक टन जास्त आहे. संतुलित पोषक तत्त्वांच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी २५.५५ कोटीहून अधिक मृदा आरोग्य कार्ड जारी करण्यात आले आहेत. २५,६८९ कस्टम हायरिंग सेंटर्सद्वारे शेती यंत्रीकरणाचा विस्तार झाला, तर १२५ कोटी एफ.एम.डी. लसीकरण व ४०% कृत्रिम रेतन कव्हरेजद्वारे पशुधन उत्पादकता सुधारली. कृषिक्षेत्रावर क्लस्टर-आधारित शेती पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. मृदा आरोग्य कार्ड, कस्टम हायरिंग सेंटर्स व पशुधन लसीकरण यांसारख्या उपाययोजना सकारात्मक असल्या तरी त्यांच्या प्रत्यक्ष परिणामांचे मूल्यमापन आवश्यक आहे. उदाहरणार्थ, मृदा कार्डांचा शेतकरी प्रत्यक्षात किती प्रभावी वापर करतात, याचा स्पष्ट उल्लेख नाही. तंत्रज्ञान-चालित उत्पादन पद्धती, उत्पन्न अंदाज व जलद डिजिटल दाव्यांच्या समाधान प्रक्रियेमुळे २०२५ मध्ये २२ पिकांसाठी किमान आधारभूत किंमत, ४.०९ लाख कोटी रुपयेपेक्षा जास्त पी.एम. किसान वितरण व ४.१९ कोटी शेतकऱ्यांच्या प्रधानमंत्री फसल बीमा योजना (PMFBY) अंतर्गत संरक्षण तसेच शेतकऱ्यांचे उत्पन्न व जोखीम समर्थन मजबूत करण्यात आले आहे.

**७. सेवा**

जागतिक अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक बदल, लवचिकता व सीमापार एकात्मतेमुळे सेवाक्षेत्राचे महत्त्व वाढत आहे. भारताचा जागतिक सेवा निर्यातीत लक्षणीय सहभाग वाढला आहे. जागतिक सेवा निर्यातीत २०२५ मध्ये २% तर २०२४ मध्ये ४.३% वाढ झाली आहे, यावरून वाढीचा वेग मंदावल्याचे संकेत मिळतात. त्यामुळे दीर्घकालीन स्पर्धात्मकता टिकवण्यासाठी केवळ विद्यमान क्षेत्रांवर अवलंबून राहाणे पुरेसे ठरणार नाही. भारत सातव्या क्रमांकाचा सेवा निर्यातदार देश बनला आहे, ही बाब गौरवाची असली तरी निर्यात संरचनेत आयटी व आयटी-सक्षम सेवांवर जास्त अवलंबित्व आहे. जागतिक तंत्रज्ञानातील बदल, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि संरक्षणवादी धोरणे यांचा या क्षेत्रावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे विविधीकरण व उच्च-मूल्य सेवांकडे वळणे आवश्यक आहे. भारतातील प्रमुख सेवाक्षेत्रांमध्ये पर्यटन, आयटी व आयटी-सक्षम सेवा, वाहतूक, दूरसंचार, वित्तीय सेवा आणि रियल इस्टेट सेवा इ. चे योगदान वाढले आहे.

## ८. उद्योगाची पुढील झेप

ग्लोबल व्हॅल्यू चेन (GVC) मध्ये धोरणात्मक सहभाग व अपरिहार्यतेमुळे जागतिक उत्पादन स्पर्धात्मकता वाढत्या प्रमाणात आकार घेत आहे. मध्यम आणि उच्च तंत्रज्ञान उत्पादनाकडे संरचनात्मक बदल आणि धोरण नेतृत्वाखालील क्षमता बांधणीद्वारे समर्थित, जागतिक प्रतिकूल परिस्थिती असूनही २०२६ मध्ये भारताचे औद्योगिक क्षेत्र नवीन गती साधत आहे; परंतु भारतातील कौशल्य पातळी, संशोधन व विकास (R&D) गुंतवणूक आणि तंत्रज्ञान हस्तांतरणाची मर्यादा या घटकांचा विचार केल्यास ही संक्रमण प्रक्रिया अपेक्षेपेक्षा धीमी ठरू शकते. राष्ट्रीय उत्पादन अभियानाचे लक्ष्य, २०३५ पर्यंत उत्पादन क्षेत्राचा जीडीपी वाटा २५% पर्यंत वाढविणे आणि १४३ दशलक्ष रोजगारनिर्मिती करण्याचे उद्दिष्ट आहे. तथापि, सध्याच्या रोजगार निर्मितीचा वेग, स्वयंचलन (Automation) आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा वाढता वापर लक्षात घेतल्यास इतक्या मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती कितपत वास्तववादी आहे, याचा विचार आवश्यक आहे. यासाठी भारताने नवोन्मेष परिसंस्था मजबूत करण्याकडे लक्ष दिले आहे. औद्योगिक क्षेत्रातील उद्दिष्टे आशादायी असली तरी त्यांची व्यवहार्यता, कौशल्य विकास, तंत्रज्ञान क्षमता आणि जागतिक जोखमींच्या पार्श्वभूमीवर शाश्वतता यांचा सखोल व संतुलित आढावा घेणे गरजेचे आहे

## ९. गुंतवणूक आणि जागतिक सुविधा

२०२२ मधील ५.९२ लाख कोटी रुपयांवरून सरकारी भांडवली खर्च २०२६ मध्ये ८९% ने वाढून ११.२१ लाख कोटी झाला आहे, जो प्रासंगिक खर्चापासून प्रामुख्याने पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक व दीर्घकालीन क्षमता बांधणीकडे धोरणात्मक बदल दर्शवतो. ही वाढ केवळ नाममात्र (Nominal) आकडेवारीत आहे की वास्तविक (Real) वाढ आहे, याचा विचार आवश्यक आहे. महागाई, प्रकल्पांच्या खर्चवाढी आणि वेळेतील विलंब यामुळे प्रत्यक्ष परिणाम अपेक्षेपेक्षा कमी असू शकतो. पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक दीर्घकालीन विकासासाठी महत्त्वाची असली तरी, अशा गुंतवणुकीचा लाभ सर्व प्रदेशांना समान मिळतो का, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. अनेकदा मोठे प्रकल्प शहरी किंवा औद्योगिक क्षेत्रांपुरते मर्यादित राहातात, ज्यामुळे प्रादेशिक विषमता वाढू शकते. रस्ते, रेल्वे, बंदरे, विमान वाहतूक, वीज, स्वच्छ ऊर्जा, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, लॉजिस्टिक नेटवर्क व लवचिक जल व्यवस्था यांचा विस्तार करण्यासाठी पंतप्रधान गतीशक्ती व राष्ट्रीय लॉजिस्टिक धोरण यांसारख्या संस्थात्मक सुधारणा आवश्यक असल्या तरी त्यांच्या अंमलबजावणीतील प्रशासकीय अडथळे, केंद्र-राज्य समन्वयातील तफावत आणि निधी वितरणातील विलंब यांचा उल्लेख नाही. कार्यक्षमतेत सुधारणा, खर्चात घट आणि वाहतूक सुलभतेमुळे व्यापार सुलभ झाला आहे. यामुळे 'इंडिया एनर्जी स्टॉक' सारख्या डिजिटल उपक्रमांचा उद्देश ग्राहक सहभाग, पारदर्शकता व प्रशासकीय कार्यक्षमता वाढत असल्याची चिन्हे दिसत आहेत.

## १०. पर्यावरण आणि हवामान बदल

भारताचे २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र होण्याचे ध्येय साध्य करण्यासाठी उच्च, समावेशक आणि पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत विकास आवश्यक आहे. ही संकल्पना आदर्शवत वाटत असली तरी या तीन उद्दिष्टांमध्ये अनेकदा परस्परविरोध आढळतो. वेगवान औद्योगिकीकरण आणि पायाभूत सुविधा विस्तार यामुळे पर्यावरणीय ताण वाढू शकतो. त्यामुळे आर्थिक वाढ आणि पर्यावरण संरक्षण यामधील संतुलन साधणे मोठे आव्हान ठरते. हवामान बदलावरील राष्ट्रीय कृती आराखडा, शेती, पाणी, आरोग्य, शहरी विकास, किनारी भाग आणि परिसंस्था यांसारख्या मोहिमांद्वारे अनुकूलन

कार्यान्वित होत असले तरी, त्यांच्या अंमलबजावणीतील प्रादेशिक असमतोल, निधीची मर्यादा आणि स्थानिक संस्थांची क्षमता यांचा विचार करणे आवश्यक आहे. केवळ धोरण जाहीर करणे पुरेसे नसून त्याची परिणामकारक अंमलबजावणी व मोजमाप (Monitoring) तितकेच महत्त्वाचे आहे. खनिजांची उपलब्धता, पुरवठा प्रमाण व भू-राजकीय जोखीमेमुळे जागतिक ऊर्जा संक्रमण मर्यादित होत असताना भारताचा प्रतिसाद देशांतर्गत शोध, कार्बन उत्सर्जन कमी करणे, पुनर्नवीकरणीय ऊर्जेचा वापर वाढविणे आणि हरित पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक वाढविणे यावर भर देणे आहे. या क्षेत्रात शाश्वत वापर, समुदाय सहभाग आणि संसाधन कार्यक्षमतेस प्राधान्य दिले जात आहे.

### ११. शिक्षण आणि आरोग्य

'कोणालाही मागे न ठेवता' विकास सुनिश्चित करण्यासाठी मानवी भांडवल व कल्याणाचा मुख्य स्रोत शिक्षण व आरोग्य यावर आधारित आहे. २०३० पर्यंत पूर्व-प्राथमिक ते माध्यमिक शिक्षणात १००% सकल नोंदणी गुणोत्तर साध्य करण्याचे धोरण आखले गेले आहे. सध्या पूर्व-प्राथमिक ते इयत्ता दुसरी (४१.४%), इयत्ता ५ वीपर्यंत (९५.४%), इयत्ता ७ वीपर्यंत (९०.३%) व इयत्ता ८ वीपर्यंत (६८.५%) असे प्रमाण आहे. यावरून प्राथमिक स्तरानंतर गळतीचे प्रमाण लक्षणीय असल्याचे दिसते. केवळ नोंदणी वाढविणे पुरेसे नसून शिक्षणाची गुणवत्ता, शिक्षकांची उपलब्धता आणि डिजिटल दरी यांवरही लक्ष देणे आवश्यक आहे. सर्व शिक्षा अभियान, पीएम श्री, पीएम पोषण यांसारख्या योजनांबरोबर नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू आहे. भारतातील उच्च शिक्षण संस्थांची संख्या २०१४-१५ मधील ५१,५३४ वरून जून २०२५ पर्यंत ७०,०१८ पर्यंत वाढली आहे. अशी वाढ झाली असली तरी शिक्षणाच्या गुणवत्तेचे परिणाम, कौशल्यविकास आणि रोजगारक्षमतेशी त्याचा संबंध कितपत दृढ आहे, याचे मूल्यमापन आवश्यक आहे. उच्च शिक्षण संस्थांची संख्या वाढली असली तरी संशोधन गुणवत्ता, निधी व जागतिक क्रमवारीतील स्थान या बाबींचा विचार करणे गरजेचे आहे. १९९० नंतर आरोग्यविषयक निर्देशांकांमध्ये लक्षणीय सुधारणा झाली आहे. विस्तारीत लसीकरण, नवजात शिशु काळजी व मजबूत सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेमुळे माता, शिशु व बालमृत्यू दरात तीव्र घट झाली आहे. आरोग्यक्षेत्रात माता व बालमृत्यू दरात घट ही सकारात्मक बाब आहे; परंतु ग्रामीण-शहरी तफावत, सार्वजनिक व खासगी आरोग्यसेवांतील विषमता आणि आरोग्य खर्चाचा भार अजूनही चिंतेचा विषय आहे. कुपोषणाविरुद्ध प्रयत्न, मानसिक आरोग्य, डिजिटल आरोग्य सेवा व टेली-मेडिसिन यावर धोरणात्मक लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. एकंदरीत, मानवी भांडवल वृद्धीसाठी शिक्षण व आरोग्यक्षेत्रात प्रगती दिसत असली तरी गुणवत्तापूर्ण, समावेशक आणि परिणामकारक अंमलबजावणी यावर अधिक भर देणे आवश्यक आहे.

### १२. रोजगार आणि कौशल्य विकास

भारतातील ५६ कोटींपेक्षा अधिक लोकसंख्या ही कार्यक्षम वयोगटातील असून कामगार बाजारात स्थिर रोजगारनिर्मिती, वाढता कामगार सहभाग आणि घटती बेरोजगारी दिसून येत आहे. परंतु हा लाभांश आपोआप आर्थिक शक्तीत रूपांतरित होत नाही. त्यासाठी कौशल्यविकास, उद्योगवृद्धी आणि गुणवत्तापूर्ण रोजगारनिर्मिती आवश्यक आहे. केवळ रोजगारसंख्या वाढणे पुरेसे नसून रोजगाराची गुणवत्ता व स्थैर्य महत्त्वाचे ठरते. २०३० पर्यंत लोकसंख्येच्या मोठ्या भागाला गुणवत्तापूर्ण रोजगार उपलब्ध करून देण्याचे लक्ष्य आहे. रोजगार गुणवत्ता, उत्पादकता, उत्पन्न सुरक्षा, कामगार कल्याण व समावेशक वाढ यांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. मागील तिमाहीत ८.७ लाख निव्वळ रोजगारनिर्मिती झाली आहे. डिसेंबर २०२५ पर्यंत

LFPR ५६.१% पर्यंत वाढला असून, बेरोजगारी दर ४.८% पर्यंत कमी झाला आहे. महिला कामगार सहभाग दर २३.३% (२०१७-१८) वरून ४१.७% (२०२३-२४) पर्यंत वाढला आहे. तथापि, रोजगारातील अनौपचारिकता, अल्पउत्पादकता व अस्थिर उत्पन्न या बाबींचा उल्लेख नाही. ८.७ लाख निव्वळ रोजगार निर्मिती ही आकडेवारी तात्पुरत्या किंवा अल्पकालीन नोकऱ्यांमुळे वाढलेली नाही ना, याचे विश्लेषण आवश्यक आहे.

भारतातील गिग वर्कफोर्स २०२५ पर्यंत १.२ कोटी कामगारांपर्यंत विस्तारला आहे आणि २०३० पर्यंत ई-कॉमर्स व लॉजिस्टिक्समुळे ६.७% रोजगार वाढीचा अंदाज आहे; परंतु गिग कामगारांचे उत्पन्न स्थैर्य, सामाजिक सुरक्षा आणि कामगार हक्क यांबाबत अजूनही अनिश्चितता आहे. नोव्हेंबर २०२५ मध्ये अधिसूचित झालेल्या नवीन कामगार संहितामुळे गिग कामगारांना मान्यता, संरक्षण, सामाजिक सुरक्षा व सुलभता देण्यासाठी २९ कायदे एकत्रित करण्यात आले आहेत.

### १३. ग्रामीण विकास आणि सामाजिक प्रगती

'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास' या तीन तत्त्वांच्या आधारावर ग्रामीण विकास योजनांमुळे गरिबी कमी करणे, पायाभूत सुविधा सुधारणे आणि मूलभूत सेवा प्रदान करणे यावर भर दिला जात असला तरी, योजनांची परिणामकारकता सर्व घटकांपर्यंत समान पोहोचते का, हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. गेल्या काही वर्षांत दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्या कमी झाली असून, सामाजिक संरक्षण कवचाचा विस्तार करण्यात आला आहे. तेंडुलकर यांच्या दारिद्र्यरेषेच्या अंदाजानुसार २०२३-२४ पर्यंत २.५% पर्यंत कमी होण्याची शक्यता कल्याण दर्शविते; परंतु दारिद्र्य मोजण्याच्या पद्धतीवर अनेकदा टीका केली जाते. वास्तविक जीवनमान, महागाईचा परिणाम, आरोग्य व शिक्षणावरील खर्च या घटकांचा विचार केल्यास 'अदृश्य दारिद्र्य' (Hidden poverty) अजूनही असू शकते. सामाजिक संरक्षण कव्हरेज २२ % (२०१६) वरून ६४.३ % (२०२५) पर्यंत वाढले आहे. मात्र या कवचाची गुणवत्ता, लाभांचे प्रमाण आणि वितरणातील पारदर्शकता यांचे मूल्यांकन आवश्यक आहे. मनरेगा अंतर्गत प्रवर्गित लाभार्थ्यांची संख्या कमी झाली आहे. डिजिटल पायाभूत सुविधा, स्वच्छ ऊर्जा, पाणी, गृहनिर्माण आणि टेलिमेडिसिन यांसारख्या उपक्रमांमुळे ग्रामीण जीवनमान सुधारले आहे. 'स्मार्ट व्हिलेज (गाव)' उपक्रमाद्वारे ग्रामीण भागात आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येत असला तरी डिजिटल दरी, देखभाल व्यवस्थापन आणि स्थानिक प्रशासनाची क्षमता यांवरही लक्ष देणे गरजेचे आहे.

### १४. एआय इकोसिस्टमची उत्क्रांती

भांडवल, ऊर्जा, डेटा आणि विशेष प्रतिभेच्या अत्यंत गरजेमुळे फ्रंटियर एआय विकास केंद्रित आहे. हे वास्तव असले तरी भारतासारख्या विकसनशील देशासाठी या संसाधनांची उपलब्धता आणि त्यांचा समतोल वापर हे मोठे आव्हान आहे. उच्च खर्चामुळे संशोधन व विकास काही मोजक्या मोठ्या कंपन्या किंवा संस्थांपुरते मर्यादित राहाण्याची शक्यता आहे, ज्यामुळे डिजिटल असमानता वाढू शकते. भारतासाठी फ्रंटियर फाउंडेशन मॉडेल्स अभ्यास व विविध सरकारी उपक्रमांमुळे नवोन्मेषाला चालना मिळाली आहे, तसेच यासाठी खूप जास्त खर्चही येतो. भारतासारख्या श्रम-आधारित अर्थव्यवस्थासाठी, अल्पकालीन जोखीम मर्यादित आहे; मात्र एआयमुळे काही पारंपरिक नोकऱ्यांवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेषतः कमी-कौशल्याच्या नोकऱ्यांवर स्वयंचलनाचा प्रभाव दिसू शकतो. त्यामुळे कौशल्यविकास आणि पुनर्प्रशिक्षण (Reskilling) यावर अधिक भर देणे आवश्यक आहे. एआयमूळे श्रमाच्या तुलनेत भांडवलाची किरकोळ उत्पादकता वाढते.

आरोग्यसेवा, पाणी व्यवस्थापन, आपत्ती-निवारण प्रणाली, शेती व शिक्षण या क्षेत्रांमध्ये एआय सुरुवातीची उदाहरणे विकसित करत आहे; मात्र डेटा गोपनीयता, नैतिकता, सायबर सुरक्षा आणि तांत्रिक पायाभूत सुविधांची गुणवत्ता यांसारखे मुद्देही तितकेच महत्त्वाचे आहेत.

**१५. शहरीकरण**

शहरीकरणामुळे आर्थिक प्रगती, कामगार-बाजार सुलभता, पायाभूत सुविधांची उपलब्धता आणि ज्ञानाचा प्रसार यांना चालना मिळते. भारतातील शहरांनी आकार वाढविल्याने उत्पादकता १२% पर्यंत वाढल्याचे दिसून आले आहे. हे आर्थिक एकाग्रतेचे (Agglomeration effect) परिणाम असू शकतात; मात्र ही वाढ सर्व शहरांमध्ये समान आहे का, की काही मोजक्या महानगरांपुरती मर्यादित आहे, याचा विचार आवश्यक आहे. लहान व मध्यम शहरांमध्ये आवश्यक पायाभूत सुविधा आणि रोजगार संधींची कमतरता अजूनही दिसून येते. शहरे दीर्घकालीन आर्थिक कामगिरीसाठी महत्त्वाची ठरत असून, भारतातील सर्वात मोठी लोकसंख्या शहरी भागात राहाते, ही वस्तुस्थिती आर्थिक परिवर्तनाचे संकेत देते; तथापि, झोपडपट्ट्या, अपुरी गृहनिर्माण व्यवस्था, वाहतूक कोंडी, प्रदूषण आणि मूलभूत सेवांची कमतरता ही गंभीर आव्हाने आहेत. त्यामुळे शहरीकरणाचे लाभ आणि त्यासोबतच्या सामाजिक-पर्यावरणीय समस्यांमध्ये संतुलन साधणे गरजेचे आहे. यासोबतच कमी गुंतवणूक, विस्कळीत प्रशासन आणि कमकुवत संरचनात्मक व्यवस्था यामुळे जागतिक आर्थिक नोड्स म्हणून शहरे पूर्ण क्षमतेने कार्य करू शकलेली नाहीत. शहरे स्वतःच्या स्रोतांद्वारे जीडीपीचा सुमारे ०.६% पेक्षा कमी महसूल निर्माण करतात. ही बाब नागरी वित्तीय क्षमतेतील मर्यादा दर्शवते. मालमत्ता कर संकलनातील कमतरता, राज्यांवर अवलंबित्व आणि वित्तीय स्वायत्ततेचा अभाव यामुळे शहरांचे नियोजन आणि सेवा पुरवठा प्रभावित होतो. त्यामुळे शहरीकरणाचे शाश्वत व्यवस्थापन, उत्पादकता वाढ आणि समावेशक वाढ साध्य करण्यासाठी नागरी वित्त व्यवस्थेत सुधारणा करणे आवश्यक आहे.

**१६. भाग १ व २ आयात प्रतिस्थापना ते धोरणात्मक लवचिकता व धोरणात्मक अपरिहार्यता**

समग्र आर्थिक स्थिरीकरण बंधनकारक न राहाता धोरणांची भू-राजकीय विविधता आणि धोरणात्मक लवचिकतेच्या गुणांनी उत्पादन क्षमता व स्पर्धात्मकतेतील वाढ टिकवून ठेवण्याची क्षमता निर्माण करण्यात भर दिला आहे. यात लवचिकता महत्त्वाची असली तरी स्थिर व पूर्वानुमेय धोरणपर्यावरण हे गुंतवणूक आणि दीर्घकालीन नियोजनासाठी अत्यावश्यक असते. अतिलवचिकता कधी कधी धोरणात्मक अनिश्चितता निर्माण करू शकते. अनिश्चिततेच्या काळात उद्योगोन्मुख प्रशासन, मिशन-केंद्रित योजना व सँडबॉक्स नियामक कायदेशीर संरक्षण तयार करते; मात्र नियामक सवलती आणि कायदेशीर संरक्षण यामुळे पारदर्शकता व उत्तरदायित्व कमी होणार नाही याची खात्री करणे गरजेचे आहे. 'सँडबॉक्स' पद्धती सर्व क्षेत्रांत समान प्रभावी ठरेलच असे नाही. जेव्हा कंपन्या स्पर्धात्मकता, कौशल्ये आणि तंत्रज्ञान यांना नागरी जबाबदारी मानून राष्ट्रीय उद्देश आत्मसात करतात तेव्हाच खाजगी क्षमता व राज्य क्षमता एकमेकांना बळकटी देतात. राज्य, कंपन्या आणि नागरी समाज यांच्या शिस्तबद्ध सहकार्याने राष्ट्रीय उद्दिष्ट साध्य करण्यात येते. याच समन्वयातून निर्माण होणारी धोरणात्मक अपरिहार्यता हेच भारताचे उज्ज्वल भविष्य घडविण्याचे ध्येय आहे. एकंदरीत, धोरणात्मक अपरिहार्यता आणि समन्वय ही विकासाची साधने ठरू शकतात; परंतु त्यांची परिणामकारकता स्थिर धोरण, उत्तरदायित्व आणि समावेशक सहभाग यांवर अवलंबून असेल.

## टीकात्मक परीक्षण

वरील सर्व परिच्छेदांमध्ये भारताच्या अर्थव्यवस्थेचे व्यापक, सकारात्मक आणि आत्मविश्वासपूर्ण चित्रण केले असले तरी एकात्मिक चिकित्सक दृष्टिकोनातून पाहिल्यास काही मूलभूत प्रश्न उभे राहातात. उच्च जीडीपी वाढ, राजकोषीय तूट कमी होणे, नियंत्रित चलनवाढ, वाढता भांडवली खर्च, सेवा व औद्योगिक क्षेत्रातील प्रगती, कृषी उत्पादनवाढ, रोजगारनिर्मिती, महिला सहभागातील वाढ, सामाजिक संरक्षणाचा विस्तार, शिक्षण-आरोग्यातील सुधारणा आणि शहरीकरण यांसारख्या निर्देशकांमुळे स्थैर्य आणि प्रगतीचे संकेत मिळतात. तथापि, या सर्व आकडेवारीचा मोठा भाग अंदाजांवर आधारित आहे किंवा 'बेस इफेक्ट'मुळे अनुकूल दिसू शकतो. आर्थिक वाढ सर्वसमावेशक आहे का, प्रादेशिक व सामाजिक विषमता कमी झाली आहे का, रोजगाराची गुणवत्ता व उत्पन्न सुरक्षा कितपत सुनिश्चित झाली आहे आणि सार्वजनिक कर्ज व महसुली तूट दीर्घकालीन शाश्वततेच्या चौकटीत बसते का? हे प्रश्न अनुत्तरित राहातात. सेवाक्षेत्रावर वाढते अवलंबित्व, कृषीतील कमी उत्पादकता, गिग व अनौपचारिक रोजगाराची अस्थिरता आणि एआय व स्वयंचलनामुळे उद्‌भवणारी कौशल्य-दरी ही संभाव्य संरचनात्मक आव्हाने आहेत.

तसेच पायाभूत सुविधा, डिजिटल उपक्रम, हरित ऊर्जा, GVC सहभाग आणि धोरणात्मक लवचिकता यांचा विकासाभिमुख हेतू स्पष्ट असला तरी अंमलबजावणीतील समन्वय, संस्थात्मक क्षमता, वित्तीय स्वायत्तता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यांवरच त्यांची खरी परिणामकारकता अवलंबून आहे. दारिद्र्य घट आणि सामाजिक संरक्षणवाढीचे दावे आशादायी असले तरी दारिद्र्य मापन पद्धती, जीवनमानातील वास्तविक सुधारणा आणि 'अदृश्य असुरक्षितता' यांचा विचार आवश्यक आहे. शिक्षण व आरोग्य क्षेत्रातील संख्यात्मक विस्तार गुणवत्तात्मक सुधारण्यात रूपांतरित झाला आहे का, आणि शहरीकरणाने उत्पादकतेसोबत सामाजिक व पर्यावरणीय ताणही वाढवला आहे का, याचे संतुलित मूल्यमापन करणे गरजेचे आहे. एकंदरीत, धोरणात्मक समन्वय, खाजगी-राज्य सहकार्य आणि दीर्घकालीन दृष्टिकोन हे सकारात्मक घटक असले तरी शाश्वत, समावेशक आणि न्याय्य विकासासाठी केवळ आकडेवारी नव्हे तर गुणवत्तापूर्ण अंमलबजावणी, पारदर्शकता आणि मानवी कल्याणकेंद्रित दृष्टिकोन अत्यावश्यक आहे.

## समारोप

एकूणच, भारताची अर्थव्यवस्था स्थैर्य आणि परिवर्तनाच्या टप्प्यावर असून वाढ, गुंतवणूक, डिजिटल व हरित उपक्रम आणि सामाजिक संरक्षण यांमुळे सकारात्मक दिशा दिसते. विकसित राष्ट्राचे ध्येय साध्य करण्यासाठी आर्थिक प्रगतीसोबत मानवी भांडवल, तांत्रिक नवोन्मेष आणि पर्यावरणीय शाश्वतता यांचा समन्वय आवश्यक आहे. तथापि, केवळ आकडेवारीपुरती वाढ पुरेशी नाही; रोजगाराची गुणवत्ता, विषमता कमी करणे, शिक्षण-आरोग्याची गुणवत्ता सुधारणे आणि प्रभावी अंमलबजावणी यांवर भर देणे गरजेचे आहे. समावेशक, शाश्वत आणि उत्तरदायी विकास हाच भारताच्या दीर्घकालीन यशाचा खरा पाया ठरेल.

## संदर्भसूची


१. India Brand Equity Foundation (IBEF). (2026). Economic Survey 2025-26. IBEF. Retrieved Feb. 14, 2026, from https://www.ibef.org/economy/economic-survey-2025-26.

२. Press Information Bureau. (2026). Economic Survey 2025-26 India transions towards a high-growth and resilient economy. New Delhi: PIB Government of India. Retrieved Feb. 12,

2026, from https://static.pib.gov.in/WriteReadData/specificdocs/documents/2026/jan/doc2026130774501.pdf

३. Sakal, (2026). Economic Survey 2025-26: Key Insights on Indias Economy and Inflation. eSakal. Sakal. Retrieved Feb. 10, 2026, from https://www.esakal.com/sakal-money/economic-survey-2025-26-india-economy-highlights-vsd00

४. Vajiram and Ravi, (2026). Economic Survey 2025-26 Out, Key Highlights, Features. General Studies. Vajiram and Ravi. Retrieved Feb. 15, 2026, from https://vajiramandravi.com/current-affairs/economic-survey-2026/

५. Vision IAS, (2026). Economic Survey 2026: Release, Significance, Structure. Vision IAS. Retrieved Feb. 19, 2026, from https://visionias.in/blog/subject-strategy/economic-survey-2025-26-release-significance-structure-download-pdf

६. प्रभात वृत्तसेवा, (२०२६). आर्थिक सर्वेक्षणात रामायणातील संदेश; विरोधकांकडून शिकून पुढे जाणार भारत. Marathi News, Business. Prabhat. Retrieved Feb. 15, 2026, from https://www.dainikprabhat.com/economic-survey-2026-features-a-message-from-the-ramayana

७. म्होपरे रा.आणि टेकळे ग., (२०२५, जानेवारी-फेब्रुवारी-मार्च). आर्थिक पाहणी अहवाल २०२४-२५: एक चिकित्सा. (म. अ. परिषद, Ed.) अर्थसंवाद, ४८(४), २९१-३००. Retrieved फेब्रुवारी २०, २०२६, from https://marathiarthshatraparishad.com/media/arthsawad/arthsawad_2025/Jan_Feb_March_2025.pdf

८. म्होपरे रा. आणि टेकळे ग., (२०२४, जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर) आर्थिक पाहणी अहवाल २०२३-२४: एक चिकित्सक अभ्यास. (म. अ. परिषद, Ed.) अर्थसंवाद, ४८ (२), १०७-११४. Retrieved फेब्रुवारी २१, २०२६, from https://marathiarthshatraparishad.com/media/arthsawad/arthsawad_2024/July-Aug-Sept_2024.pdf

◆

उच्च शिक्षण ही सामाजिक आणि आर्थिक हालचालीचा वेग
वाढविण्यासाठीची सर्वात मजबूत आणि सर्वात कठीण शिडी आहे.

**- ड्यू फॉस्ट**

# केंद्रिय अर्थसंकल्प २०२६-२७ - एक दृष्टीक्षेप

**प्रमोद पांडुरंगराव लोणारकर** †

**प्रस्तावना**

अर्थसंकल्प ही सरकारने मांडलेली एक अशी योजना असते की, ज्यात एका विशिष्ट काळात सरकारला करावा लागणारा खर्च हा कोणत्या बाबींवर होणारा आहे आणि त्यासाठी लागणारे अपेक्षित उत्पन्न हे नेमके कोणत्या मार्गाने उभारले जाणार आहे याची रूपरेषा दिलेली असते. राज्यघटनेच्या कलम ११२ आणि २०२ नुसार सरकारला उत्पन्न आणि खर्चाचे हे विवरण संसदेत व विधिमंडळांच्या सभागृहासमोर मांडावे लागते आणि ते मंजूर करून घ्यावे लागते. संविधानात अर्थसंकल्प हा शब्द कुठेही वापरला नसला तरी त्याचा वार्षिक वित्तविषयक विवरण पत्र म्हणून उल्लेख केलेला आहे. एका विशिष्ट काळासाठी म्हणजे साधारणतः एका आर्थिक वर्षासाठी म्हणजेच भारतात १ एप्रिल ते ३१ मार्च या कालावधीसाठी हा अर्थसंकल्प मांडला जातो. इतर काही देशात देखील याच कालावधीसाठी तो मांडला जातो. मात्र काही देशात आर्थिक वर्षाची सुरवात जानेवारी, जुलै, ऑक्टोबर अशी वेगवेगळ्या महिन्यात होते.

भारतात संविधानाने परिभाषित केलेल्या तीन मुख्य निधी ज्यात कलम २६६(१) नुसार एकत्रिक निधी, कलम २६७ नुसार आकस्मिक निधी आणि कलम २६६(२) नुसार सार्वजनिक किंवा लोक लेखे यांचा समावेश होतो. संसदेत मांडले जाणारे हे वार्षिक वित्तविषयक विवरण प्रामुख्याने एकत्रित निधीशीच संबंधित असते. कारण त्यातून संसदेच्या मान्यतेशिवाय पैसा काढता येत नाही. एकत्रित निधीमध्ये महसुली, भांडवली आणि कर्ज शीर्षाखालील जमा आणि खर्चाचा समावश होतो आणि अधिकतर हाच भाग अर्थसंकल्प म्हणून मांडला जातो.

वर्ष २०२६-२७ साठीच्या तरतुदींचा हा अर्थसंकल्प १ फेब्रुवारी २०२६ रोजी भारताच्या मा.वित्तमंत्री श्रीमती निर्मला सीतारमण यांनी मांडला. या अर्थसंकल्पात 'विकसित भारत @२०४७' चे ध्येय पूर्ण करण्यासाठी सुशासन, आर्थिक शिस्त आणि सर्वसमावेशकता या त्रिसूत्रीचा समावेश केलेला आहे. बदल्या जागतिक आव्हानात्मक परिस्थितीतही भारताच्या अर्थव्यवस्थेचा विकास दर ७% गाठला जाईल, या अनुषंगाने या अर्थसंकल्पाची आखणी केली आहे. ज्यात तीन प्रमुख कर्तव्यांना अधोरेखित केले आहे त्यातील पहिले म्हणजे

† प्राध्यापक (अर्थशास्त्र), सामाजिक शास्त्रे संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
आजीव सभासद क्र. १५६४, भ्रमणध्वनी: ७७४५०८३३७७, ई-मेल: pramodlonarkar83@gmail.com

आर्थिक विकास साधण्यासाठी उत्पादन क्षमता वाढवून जागतिक पुरवठा साखळीत भारताचे स्थान भक्कम करणे. दुसरे कर्तव्य म्हणजे जनआकांक्षाची पूर्तता ज्यात शिक्षण आणि कौशल्य विकासाच्या माध्यमातून नागरिकांना सक्षम बनवणे आणि तिसरे कर्तव्य हे 'सबका साथ सबका विकास' हे असून ज्यात गरीब, महिला, युवक आणि अन्नदाता यांना मुख्य प्रवाहात आणणे असे आहे.

अशा विकासासह सर्वसमावेशकतेची किनार असलेल्या या अर्थसंकल्पाचा बृहत आढावा घेण्याच्या दृष्टीने या शोधनिबंधाची आखणी केली आहे. त्यासाठी खालील प्रमुख उद्देश मांडलेली आहेत.

**शोध निबंधाची उद्दिष्ट्ये:**

१) वर्ष २०२६-२७ च्या अर्थसंकल्पाची महसुली संरचना अभ्यासणे.

२) अर्थसंकल्पातील तुटीची आणि कर्जाची तुलनात्मक स्थिती जाणून घेणे.


३) अर्थसंकल्पातील करविषयक तरतुदी आणि भांडवली खर्चाची चर्चा करणे.

४) विविध प्रमुख योजनांसाठी केलेल्या तरतुदींवर प्रकाश टाकणे.

**अर्थसंकल्पाची महसुली रचना:**

अर्थसंकल्प २०२६-२७ साठी एकूण रु. ५३.४७ लाख कोटी एवढ्या खर्चाची तरतूद करण्यात आली असून, ही तरतूद मागील दोन अर्थसंकल्पातील तरतुदींपेक्षा सुमारे ४ ते ७ लाख कोटीने जास्त आहे. या खर्चासाठी प्राप्त होणाऱ्या किंवा केल्या जाणाऱ्या संसाधानाची उभारणी कर आणि करेत्तर संसाधने आणि कर्ज उभारणी या माध्यमातून केली जाते. यापैकी कर आणि करेत्तर महसुलाची रचना खालील आकृतीत दर्शवली आहे. या अर्थसंकल्पानुसार केंद्र सरकारच्या करमहसुलात उत्पन्न कराचा हिस्सा सर्वाधिक म्हणजे १४.६६ लाख कोटी एवढा असणार आहे. त्यापाठोपाठ निगम कर १२.३१ लाख कोटी आणि जी.एस.टी. १०.१९ लाख कोटी, सीमाशुल्क आणि इतर कर मिळून एकूण कर महसूल ४४.०४ लाख कोटी रुपयांएवढा असेल, मात्र सोळाव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्राच्या विभाजन योग्य कर निधी मधील १५.२६ लाख कोटी एवढा राज्यांचा हिस्सा जाऊन निव्वळ करमहसूल २८.९९ लाख कोटी असणार आहे.


**आकृती १: अर्थसंकल्पाची महसुली रचना**



करेत्तर महसुलात लाभ आणि लाभांश याद्वारे ३.९१ लाख कोटी इतर करेत्तर महसूल २.२९ लाख कोटी आणि इतर संसाधने जसेकी व्याजप्राप्ती, विदेशी अनुदान इत्यादी मार्गाने ६.६६ लाख कोटी सरकारला प्राप्त होणार आहेत असे अनुमानित केले आहे. म्हणून वर उल्लेख केल्याप्रमाणे सरकारचा निव्वळ करमहसूल आणि करेत्तर महसूल असे मिळून एकूण ३५.३३ लाख कोटी सरकारला प्रत्यक्ष खर्चासाठी उपलब्ध असणार आहेत.

**महसूल-कर्ज विभागणी:** वरील महसूल संरचना समजून घेतल्यावर आपल्याला हे लक्षात येते की, ५३.४७ लाख कोटी एवढ्या खर्च तरतुदी यासाठी ३५.३३ लाख कोटी एवढी संसाधने उपलब्ध आहेत म्हणजेच उर्वरित ३३% संसाधने ही कर्जाच्या माध्यमातून उभारली जाणार आहेत, ते प्रमाण खालील आकृतीच्या स्वरूपात दर्शवले आहे.

**आकृती २: महसूल-कर्ज विभागणी**





राजकोषीय शिस्त आणि अंदाजपत्रक व्यवस्थापन कायदा (FRBM) २००३ नुसार राजकोषीय तुटीचे GDP शी असलेले प्रमाण ३% पर्यंत आणण्याचे ध्येय ठेवण्यात आले आहे. त्यानुसार या अर्थसंकल्पात मागील अर्थसंकल्पाच्या तुलनेत राजकोषीय तुटीचे हे प्रमाण मागील दोन वर्षाच्या तुलनेत (४.८% आणि ४.४%) वरून ४.३% असे कमी राहील, याची या अर्थसंकल्पाने दक्षता घेतल्याचे दिसून येते. यावरून सरकारचे राजकोषीय शिस्तीच्या मार्गावर चालण्याचे धोरण दिसून येते.

याशिवाय कर्जाचे GDP शी असलेले प्रमाण २०३० पर्यंत ५०%च्या (अधिक-उणे १%) पेक्षा अधिक असता कामा नये. त्यानुसार या अर्थसंकल्पात मागील अर्थसंकल्पाच्या तुलनेत (५७%) असलेले कर्जाचे प्रमाण देखील कमी करून ते आता ५५% पर्यंत कमी करण्यात आले आहे.

महसूल आणि खर्च यातील तफावतीमुळे निर्माण झालेल्या विविध प्रकारच्या तुटीची स्थिती खालील आकृतीत दर्शवली आहे. त्यानुसार हा अर्थसंकल्प वर्ष २०२४-२५ च्या तुलनेत जवळपास सर्वच तुटीचे प्रमाण कमी करताना दिसतो.

एकंदरीतच, देशाची वित्तीय तूट कमी करण्याचे आणि कर्ज-जीडीपी प्रमाण संतुलित ठेवण्याचे कठीण

आकृती ३: तुटीची स्थिती




आव्हान पेलत, हा अर्थसंकल्प भारताला आत्मनिर्भरतेकडून पूर्ण विकासाकडे नेणारा एक महत्त्वाचा मार्ग ठरेल असे वाटते.

**अर्थसंकल्पातील करविषयक तरतुदी:**

या अर्थसंकल्पात करप्रणाली अधिक सुटसुटीत करण्यासाठी काही ठोस पावले उचलण्यात आली आहेत. त्यातील प्रत्यक्ष (Direct) आणि अप्रत्यक्ष (Indirect) कर तरतुदींची माहिती खालीलप्रमाणे आहे:

**प्रत्यक्ष कर** (Direct Tax) **तरतुदी**

प्रत्यक्ष कराच्याबाबतीत सर्वात मोठी घोषणा म्हणजे 'नवीन आयकर कायदा २०२५' (New Income Tax Act, 2025), जो १ एप्रिल २०२६ पासून लागू होणार आहे. या नवीन करव्यवस्थेअंतर्गत आयकर स्लॅब पूर्वीप्रमाणेच ठेवण्यात आला आहे. त्यानुसार रु.१२ लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त राहाणार आहे. याशिवाय या अर्थसंकल्पात ITR दाखल करण्याच्या मुदती संदर्भात पगारदार व्यक्तींसाठी ३१ जुलै, तर ऑडिट असलेल्या प्रकरणांसाठी ३१ ऑगस्ट अशी अंतिम दिनांक प्रस्तावित केली आहे.

याठिकाणी एक महत्त्वपूर्ण बाब अशी निदर्शनास येते की, शिक्षण आणि वैद्यकीय उपचारांसाठी परदेशात पैसे पाठवताना लागणारा 'स्त्रोतावर कर संकलन' (TCS) चादर ५% वरून २% करण्यात आला आहे ज्याचा अनेकांना फायदा होईल. याशिवाय 'मिनिमम अल्टरनेट टॅक्स' (MAT) १५% वरून १४% वर आणला आहे.

**अप्रत्यक्ष कर** (Indirect Tax) **तरतुदी**

अप्रत्यक्ष करांच्या बाबतीत मुख्य भर व्यापार सुलभता (Ease of Doing Business) आणि निर्यातीला प्रोत्साहन देण्यावर आहे. तसेच जी.एस.टी. कायद्यात सुधारणा करून अनुपालन (Compliance) ओझे कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. 'इन्व्हर्टेड ड्युटी स्ट्रक्चर' असलेल्या प्रकरणांमध्ये ९०% तात्पुरता परतावा देण्याची तरतूद केली आहे.

**सीमा शुल्क** (Customs Duty):

या अर्थसंकल्पातील सीमाशुल्कविषयक काही प्रमुख तरतुदी अशा आहेत की, ज्याचा उत्पादक आणि ग्राहक दोघांनाही लाभ होईल, ज्यामध्ये वैयक्तिक वापरासाठी आयात केल्या जाणाऱ्या अनेक वस्तूंवरील

सीमा शुल्क २०% वरून १०% करण्यात आले आहे. काही दुर्मिळ आजारांवरील औषधांना सीमा शुल्कातून पूर्ण सूट देण्यात आली आहे. फूटवेअर आणि कापड उद्योगाला लागणाऱ्या कच्च्या मालावरील आयात शुल्कात सवलत देऊन निर्यातीला बळ दिले आहे. कुरिअरद्वारे केल्या जाणाऱ्या निर्यातीसाठी असलेली रु.१० लाखांची मर्यादा काढून टाकण्यात आली आहे, ज्यामुळे छोट्या उद्योजकांना जागतिक बाजारपेठ गाठणे सोपे होईल.

**अर्थसंकल्पातील भांडवली खर्च आणि राज्यांना होणारे वितरण किंवा हस्तांतरण:**

सरकारने उभारलेल्या कर्जासंदर्भात नेहमी चिंता व्यक्त केली जाते की, ही कर्ज रक्कम नेमकी कुठे खर्च केली जाते. अर्थसंकल्पात केल्या जाणाऱ्या एकूण खर्चापैकी २२.८४% खर्च हा भांडवली खर्च असणार आहे याशिवाय प्रभावी भांडवली खर्च ज्यात भांडवलीखर्चासह राज्यांना भांडवलीमत्ता (Asset) निर्माण करण्यासाठी केलेली तरतूद समाविष्ट असते त्याचे प्रमाण तर ३२% एवढे आहे. सोळाव्या वित्तआयोगाच्या शिफारशीनुसार केंद्राच्या विभाजन योग्य कर निधीमधील ४१% हिस्सा राज्यांना दिला गेला पाहिजे. मात्र प्रत्यक्षात या अर्थसंकल्पात विभाजन योग्य कर निधीमधील हिस्सा, कर्जअनुदान आणि केंद्र पुरस्कृत योजना या सर्व माध्यमातून एकूण अर्थसंकल्पीय खर्चाच्या जवळपास ४८% संसाधने राज्यांकडे वळवली गेली आहेत.

**विविध योजनांवरील खर्च तरतुदी**

**कृषी आणि ग्रामीण विकासाच्या योजना:**

कृषी आणि संबंधित क्षेत्रे यासंदर्भात या अर्थसंकल्पात ग्रामीण विकासासाठी कृषी योजनांना प्राधान्य देण्यात आले आहे. त्यात प्रामुख्याने राष्ट्रीय कृषी योजना ज्यावर एकूण ८,५५० कोटी रुपये खर्चाची तरतूद करण्यात आली आहे. वर्ष २०२४-२५ च्या तुलनेत (रु.७२२८ कोटी) यावेळी १६२२ कोटी रुपयांची वाढ करण्यात आली आहे. कृषी उन्नती योजनेत तर २०२४-२५ च्या तरतुदीवर ५६८६ कोटीची वाढ करून एकूण रु ११२०० कोटीची तरतूद केली आहे. यासोबतच भारत विस्टा या उपक्रमाद्वारे शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची आणि ‘ॲग्रीस्टॅक’ पोर्टलची जोड देण्यात आली आहे.

याशिवाय जलजीवन मिशनसाठी केलेली तरतूद वर्ष २०२४-२५ च्या तुलनेत जवळपास दुपट्टीने वाढ करून ती यावर्षी रु.६७,६७० एवढी भरीव स्वरूपात केल्याचे दिसून येते. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजेसाठी मात्र पूर्वीपेक्षा तरतूद मोठ्या प्रमाणावर कमी करून ती रु. ३०,००० कोटी एवढी केल्याचे दिसते.

**शिक्षण, कौशल्य आणि रोजगाराशी संबंधित योजना:**

या अर्थसंकल्पात समग्रशिक्षा अंतर्गत रु. ४२,१०० कोटीची तरतूद केल्याचे दिसून येते. याशिवाय अर्थसंकल्पात विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष व्यावहारिक ज्ञान देणाऱ्या पी.एम. इंटर्नशिप या योजनेवर रु.४,७८८ कोटी खर्चाचे प्रस्तावित आहे. पूर्वी २०२४-२५ मध्ये यावर केवळ रु.३२ कोटींची तरतूद केली होती. याशिवाय प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान या अंतर्गत वर्ष २०२४-२५ मधील तरतूद केवळ रु.३०१ कोटी होती. त्यात भरीव वाढ करून यावेळी ती तरतूद रु. १,८५० कोटी एवढी करण्यात आली आहे. याशिवाय शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी प्रत्येक जिल्ह्यात वसतिगृहांची सोय करण्याचेदेखील प्रस्तावित केले आहे.

युवकांना रोजगारक्षम बनवण्यासाठी कौशल्य भारत कार्यक्रमांतर्गत रु.२,८०० कोटीची तरतूद करण्यात आली असून एक वर्षापूर्वीच्या अर्थसंकल्पात ही तरतूद रु. २,३१८ कोटी एवढी होती. याशिवाय यावर्षी एकीकृत कौशल्य वास्तुकला योजना आणि आय. टी. आय. च्या माध्यमातून प्रधानमंत्री कौशल्य आणि रोजगार क्षमता परिवर्तन योजना या नवीन योजनांच्या माध्यमातून कौशल्य विकासासाठी रु. ६,७४१ कोटी एवढी तरतूद करण्यात आली आहे. याशिवाय उद्योजकता

विकासासाठी रु. ५,००० कोटीची स्वतंत्र तरतूद या अर्थसंकल्पात दिसते.

यावरून अर्थसंकल्पाचा मूळ भर हा देशातील 'युवा' वर्ग असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. या अर्थसंकल्पात तरुणांच्या हाताला काम आणि कौशल्याची जोड देण्यासाठी सरकारने विशेष पाऊल उचलले आहे. त्यानुसार तब्बल दीड लाख तरुणांना जागतिक दर्जाचे 'केअरगिव्हर' म्हणून प्रशिक्षित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. जेणेकरून त्यांना केवळ भारतातच नव्हे तर परदेशातही रोजगाराच्या संधी मिळाव्यात.

या अर्थसंकल्पात ग्रामीण भागातील रोजगारातील सहभाग वाढीसाठी विकसित भारत रोजगार आजीविका मिशन (राम-जी) ही योजना आणि प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजना या दोन योजना नव्याने सुरू करण्यात आल्या असून, त्यासाठी अनुक्रमे रु. ९,६९२ कोटी आणि रु. २०,०८३ कोटी एवढी तरतूद करण्यात आली आहे.

**विज्ञान, ऊर्जा आणि तंत्रज्ञान क्षेत्राशी संबंधित योजना:**

विकसित भारत २०४७ चे ध्येय गाठण्यासाठी भारताला तंत्रज्ञानाचे केंद्र बनवण्याच्या दृष्टिकोनातून संशोधनावर खर्च वाढवण्यात आला आहे. त्यांतर्गत अवकाश मोहिमांना गती देण्यासाठी रु. १०३९७ कोटी एवढी तरतूद आणि उद्योजकता विकासाला चालना देण्यासठी बायोराईड साठी रु. २,३०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. बायो फार्मा शक्ती आणि केमिकल पार्क यावर मिळून रु.१,१०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

छोट्या व्यापाऱ्यांसाठी या अर्थसंकल्पात 'चॅम्पियन्स' योजनेअंतर्गत रु.१०,००० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देऊन उद्योजकांना स्वतःच्या पायावर उभे राहाण्यासाठी बळ देण्यात आले आहे.

कुटुंबांना मोफत वीज मिळावी यासाठी २०२४ मध्ये सुरू केलेल्या पी. एम. सूर्यघर या योजनेसाठी सुरुवातीला केलेल्या रु. ७,८१८ कोटी एवढ्या तरतुदीपेक्षा यावेळी १४,१८२ कोटीने वाढ करून एकूण रु.२२,,००० कोटी एवढी तरतूद केली आहे. जी भारताची शाश्वत उर्जा, आत्मनिर्भरता आणि हरित विकासाप्रति असलेली बांधिलकी दर्शवते. याशिवाय तंत्रज्ञानाच्या युगात भारताला एक तंत्रज्ञानाचे केंद्र बनवण्यासाठी या अर्थसंकल्पात पूर्वीच्या योजनेत असलेल्या रु. ६३८ कोटी तरतुदीपेक्षा यावेळी रु. ८,००० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. याशिवाय सेमी कंडक्टर मिशन २.० राबवले जाणार असून त्यासाठी स्वतंत्र १,००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. इंडिया एआय मिशन वरील रु. १,००० कोटी तरतुदी व्यतिरिक्त एआय तंत्रज्ञानातील आणि बायो तंत्रज्ञान यातील संशोधनासाठी प्रधान मंत्री रिसर्च चेयर या शीर्षकाअंतर्गत २,०० कोटींची स्वतंत्र तरतूद यावेळी करण्यात आली आहे. इलेक्टॉनिक घटक निर्माण करण्यासाठी रु. १,५०० कोटींची तरतूददेखील केल्याची निदर्शनास येते.

**वाहतूक संबंधित पायाभूत सुविधा याबाबतच्या योजना :**

देशाच्या आधारभूत संरचनेत कायम वाढ करण्यासाठी असलेल्या प्रमुख गुंतवणूक निधी एन.आय. आय. एफ. यातील तरतूद मागील वर्षीप्रमाणेच रु. ३,००१ कोटी ठेवण्यात आली आहे. याशिवाय या अर्थसंकल्पात भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणासाठी रु. १,८७,२९३ कोटी एवढी तरतूद करण्यात आली आहे. रेल्वेच्या आधुनिकीकरणासाठी रु. ८८,८३१ कोटींची तरतूद आणि मेट्रो प्रकल्पांसाठी रु.२८,७४० कोटींची तरतूद इत्यादी मार्गाने देशाची वाहतूक संबंधित पायाभूत संरचना सक्षम करण्यासाठी या अर्थसंकल्पात प्रयत्न केले गेले आहेत. तसेच, रेल्वेच्याबाबतीत मुंबई-पुणे आणि पुणे-हैदराबाद यांसारख्या शहरांना जोडणारे ७ हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर आणि पूर्वेकडून पश्चिमेकडे जाणारे नवीन मालवाहतूक मार्ग यासाठीच्या तरतुदी आधारभूत रचनेला बळ देताना दिसून येतात.

**आरोग्यविषयक योजना :**

कोरोन काळानंतर आरोग्य यंत्रणेत सातत्याने सुधारणा करण्यात येत आहे. राज्यांनाही सार्वजनिक आरोग्य यंत्रणेत सुधारणा करण्यासाठी या अर्थसंकल्पात र. ४२०० कोटींचे अर्थसहाय्य देण्याची तरतूद केली आहे. आयुष्यमान भारत योजनेवरील तरतूद रु. ९,५०० कोटी, आणि आयुष्यमान भारत आरोग्य अवसंरचन यासाठी रु. ४,२०० कोटी, राष्ट्रीय आयुष अभियान यासाठी रु.१,३०० कोटीएवढी तरतूद करण्यात आली आहे. पहिली ते आठवीच्या मुलांची पोषण पातळी सुधारण्यासाठी चालवल्या जाणारी प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्मात योजनेसाठी रु. १२७५० कोटी, सक्षम अंगणवाडी आणि पोषण २.० योजनेसाठी रु.२३,१०० कोटी रुपये तरतूद याशिवाय केंद्रपुरस्कृत आरोग्य योजन राष्ट्रीय शहरी स्वास्थ्य मिशन या अंतर्गत रु. ३१,८२० कोटीएवढी भरीव तरतूद करण्यात आली आहे. आरोग्यावरील मानव संसाधन आणि वैद्यकीय शिक्षण यावर रु. १,७२५ कोटी, यावेळी स्वास्थ्य कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र योजनेसाठी रु. १,,००० कोटींची तरतूद केली आहे. आरोग्यविषयक सुविधांच्या बाबतीत सामान्य माणसाला दिलासा देताना, कॅन्सरसारख्या गंभीर आजाराच्या औषधांवरील आयात शुल्क काढून टाकून आरोग्यासाठी मोठी तरतूद करण्यात आली.

**संरक्षणावर होणारा तरतूद :**

संरक्षण सज्जतेसाठी खर्च २०२४-२५ साठी रु. ४४,३६५ कोटी होता तो आता या अर्थसंकल्पात रु. ६३,७३४ कोटी प्रस्तवित करण्यात आला आहे. याशिवाय इतर उपकरणे यासाठी २०२४-२५ मध्ये रु. ५२,२०५ कोटी होती ती आता या अर्थसंकल्पात रु. ८२,२१८ करण्यात आली आहे.

**निष्कर्ष :**

२०२६-२७ चा हा अर्थसंकल्प भारताला 'विकसित भारत @२०४७' या ध्येयाकडे नेणारा एक महत्त्वपूर्ण दस्तऐवज ठरला आहे. या अर्थसंकल्पात राजकोषीय शिस्त पाळतानाच भांडवली खर्चावर दिलेला भर देशाच्या पायाभूत सुविधांना बळ देणारा आहे. आयकर संरचनेत केलेले बदल आणि 'नवीन आयकर कायदा २०२५' मुळे करप्रणाली अधिक सुटसुटीत होण्यास मदत होईल. शिक्षण, कौशल्य विकास आणि युवकांसाठीच्या नवीन योजनांमधून मानवी संसाधन विकासाला प्राधान्य दिल्याचे स्पष्टपणे दिसून येते. कृषी आणि ग्रामीण विकासासाठी केलेली भरीव तरतूद 'अन्नदाता' आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला सक्षम करणारी आहे. तंत्रज्ञान, सेमी-कंडक्टर मिशन आणि एआय (AI) मधील गुंतवणूक भारताला जागतिक तंत्रज्ञान केंद्र बनवण्याच्या दिशेने टाकलेले पाऊल आहे. सौर ऊर्जा आणि हरित विकासावरील भर भारताची पर्यावरणपूरक शाश्वततेप्रति असलेली बांधिलकी दर्शवतो. आरोग्यावरील खर्चात केलेली वाढ आणि गंभीर आजारांच्या औषधांवरील सवलती सामान्य नागरिकांना दिलासा देणाऱ्या आहेत. राज्यांना दिलेला वाढीव निधीचा हिस्सा संघराज्यीय सहकार्य आणि प्रादेशिक समतोल राखण्यास सहाय्यक ठरेल. एकंदरीत, हा अर्थसंकल्प आर्थिक विकास, सामाजिक समावेशकता आणि स्वावलंबनाचा एक सुवर्णमध्य साधणारा भविष्यवेधी आराखडा आहे.

**संदर्भः**


१. फडणवीस, देवेंद्र (२००५), अर्थसंकल्प म्हणजे नेमके काय?, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे.

२. फडणवीस, देवेंद्र (२०२०), अर्थसंकल्प सोप्या भाषेत, लाखे प्रकाशन, नागपूर.

३. https://www.indiabudget.gov.in/

४. https://www.indiabudget.gov.in/economicsurvey/index.php

५. https://www.niti.gov.in/

६. https://fincomindia.nic.in/commission-reports-sixteenth


◆

# महाराष्ट्र राज्याचा अर्थसंकल्प : २०२६-२७ ते विकसित महाराष्ट्र २०४७

**समित माहोरे** †

**प्रस्तावना**

अर्थसंकल्प हा शासनाचा सर्वात महत्त्वाचा वित्तीय आणि धोरणात्मक दस्तऐवज असतो. भारतीय राज्यांसाठी वार्षिक अर्थसंकल्प हा केवळ अंदाजित उत्पन्न-खर्चाचा तक्ता नसून तो विकासाच्या प्राधान्यक्रमाबरोबरच, संसाधनांचे वितरण आणि धोरणांची अंमलबजावणी यांचा सर्वसमावेशक आर्थिक आराखडा असतो.

भारतीय संघराज्यीय व्यवस्थेत राज्ये आणि केंद्र सरकार यांची आर्थिक रचना परस्परावलंबी असल्यामुळे बहुतांश राज्ये आपला अर्थसंकल्प केंद्रीय अर्थसंकल्पानंतरच सादर करतात. केंद्रीय अर्थसंकल्पात राज्यांना मिळणाऱ्या कर महसुलातील वाट्याची रक्कम, विविध अनुदाने, तसेच केंद्र पुरस्कृत योजनांसाठी (Centrally Sponsored Schemes) दिला जाणारा निधी जाहीर केला जातो. या तरतुदींवर राज्यांच्या उत्पन्नाचा मोठा भाग अवलंबून असतो. याशिवाय राज्यांच्या कर्जमर्यादा व राजकोषीय तूट मर्यादा या केंद्राच्या वित्तीय धोरणांशी जोडलेल्या असल्याने राज्यांना स्वतःचे वित्तीय नियोजन केंद्रीय तरतुदींनुसार करावे लागते.

पायाभूत सुविधा, कृषी व ग्रामीण विकास, आरोग्य, शिक्षण, सामाजिक कल्याण, शहरी विकास आणि हरित ऊर्जा ही क्षेत्रे विशेषतः केंद्रीय निधीवर अवलंबून असतात. राष्ट्रीय महामार्ग, मेट्रो, रेल्वे, सिंचन प्रकल्प, ग्रामीण रस्ते, राष्ट्रीय आरोग्य अभियान, समग्र शिक्षण योजना, स्मार्ट सिटी मिशन, तसेच सौर व हरित ऊर्जा प्रकल्प हे केंद्र-राज्य संयुक्त निधीतून राबवले जातात. त्यामुळे केंद्रीय अर्थसंकल्पातील तरतुदी स्पष्ट झाल्यानंतरच राज्यांना आपल्या विकास योजना, खर्च प्राधान्यक्रम आणि निधी वाटप यांचे वास्तववादी नियोजन करता येते.

**अर्थसंकल्पाचे महत्त्व**

राज्य अर्थसंकल्पाचे मूलभूत महत्त्व म्हणजे राज्याचे सुसूत्र वित्तीय नियोजन आणि संसाधनांचे कार्यक्षम वितरण होय. आरोग्य सेवा, शालेय व उच्च शिक्षण, शेती, सिंचन, ग्रामीण विकास, शहरी प्रशासन, पायाभूत सुविधा आणि सार्वजनिक सेवा ही राज्यांची प्रमुख

† सहयोगी प्राध्यापक, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग (स्वायत्त), संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
आजीव सभासद क्र. १६४१, भ्रमणध्वनी: ९९२११४०५५३, ई-मेल: drsamitmahore@gmail.com

जबाबदारी आहे. या सर्व क्षेत्रांसाठी निश्चित आर्थिक तरतूद अर्थसंकल्पाद्वारे केली जाते. त्यामुळे मर्यादित संसाधनांचा प्राधान्यक्रमानुसार आणि परिणामकारक वापर शक्य होतो. अर्थसंकल्पाशिवाय खर्च अनियोजित राहातो व विकासप्रक्रियेत अडथळे निर्माण होतात.

अर्थसंकल्पाचे दुसरे महत्त्व म्हणजे विकास धोरणांचे प्रत्यक्ष कृतीमध्ये रूपांतर करणे. शासनाची आश्वासने, विकास आराखडे आणि क्षेत्रनिहाय धोरणे यांना अर्थसंकल्पीय तरतुदींचा आधार मिळाल्याशिवाय त्यांची अंमलबजावणी शक्य होत नाही. सार्वजनिक रुग्णालये, शासकीय शाळांचे आधुनिकीकरण, ग्रामीण रस्ते, सिंचन प्रकल्प, कौशल्य विकास योजना, परवडणारी घरे, शहरी वाहतूक व्यवस्था आणि डिजिटल सेवा या सर्व उपक्रमांची अंमलबजावणी राज्याच्या अर्थसंकल्पावर आधारित असते. त्यामुळे अर्थसंकल्प हा धोरण आणि विकास परिणाम यांतील दुवा आहे.

अर्थसंकल्प हा राज्याची महसुली संरचना स्पष्ट करतो. यामध्ये राज्याचा वस्तू व सेवा करामधील (SGST) हिस्सा, उत्पादन शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, वाहन कर इत्यादी कर महसूल तसेच सेवा शुल्क, फी आणि सार्वजनिक उपक्रमांमधून मिळणारे बिगरकर महसूल यांचे अंदाज यात दिले जातात. तथापि, राज्यांच्या वित्तीय क्षमतेत केंद्रीय अर्थसंकल्पाचा महत्त्वाचा वाटा असतो. केंद्र सरकारकडून राज्यांना वित्त आयोगाच्या शिफारसीनुसार कर महसूल वाटप, अनुदाने (Grants-in-aid) आणि केंद्र प्रायोजित योजना (Centrally Sponsored Schemes) यासारख्या विविध मार्गांनी निधी प्राप्त होतो. त्यामुळेच केंद्रीय अर्थसंकल्पातील तरतुदी राज्यांचा विकास खर्च, भांडवली गुंतवणूक आणि वित्तीय स्थैर्यावर थेट परिणाम करतात. राज्याचा अर्थसंकल्प वित्तीय शिस्त आणि व्यापक आर्थिक स्थैर्य सुनिश्चित करतो. वित्तीय जबाबदारी व अर्थसंकल्प व्यवस्थापन (FRBM) नियमांनुसार तूट आणि कर्जमर्यादा नियंत्रित केल्या जातात. यामुळे दीर्घकालीन वित्तीय स्थैर्य राखले जाते, कर्जभार नियंत्रणात राहातो आणि गुंतवणूकदारांचा विश्वास कायम राहातो.

तसेच अर्थसंकल्प समावेशक विकास आणि कल्याणकारी योजनांसाठी अत्यावश्यक आहे. दारिद्र्य निर्मूलन, अन्नसुरक्षा, शिष्यवृत्ती, आरोग्य विमा, महिला व बालकल्याण, सामाजिक संरक्षण योजना या राज्यस्तरावर प्रभावीपणे राबवल्या जातात. परिणामकारक अर्थसंकल्पामुळे सामाजिक व प्रादेशिक विषमता कमी करण्यास मदत होते आणि मानवी विकास निर्देशांक सुधारतो.

अर्थसंकल्पाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे पायाभूत सुविधा निर्मिती आणि भांडवली गुंतवणूक होय. रस्ते, वीज, सिंचन व्यवस्था, शहरी विकास, औद्योगिक क्षेत्रे, डिजिटल कनेक्टिव्हिटी यांसाठी मोठ्या प्रमाणावर भांडवली खर्च केला जातो. यामुळे रोजगारनिर्मिती, उत्पादनक्षमतेत वाढ आणि खासगी गुंतवणुकीला चालना मिळते.

अर्थसंकल्पामुळे लोकशाही उत्तरदायित्व आणि पारदर्शकता सुनिश्चित होते. अर्थसंकल्प हा राज्य विधानमंडळात ठरल्याप्रमाणे आर्थिक पाहणी सादर केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी सादर केला जातो व पुढे तो सर्वानुमते मंजूर केला जातो. लेखापरीक्षण आणि सार्वजनिक चर्चाप्रक्रियेमुळे सार्वजनिक निधीचा जबाबदारीने वापर होतो.

### स्थापनेपासून महाराष्ट्र राज्याच्या अर्थसंकल्पाचा आढावा

महाराष्ट्र राज्याच्या विकासाची दिशा आणि दशा ठरविण्यामध्ये अर्थसंकल्पाची मांडणी आणि त्याची अंमलबजावणी यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे, १९६० रोजी झाली. स्थापनेपासून आजपर्यंत राज्याच्या अर्थसंकल्पाचा विचार

केला तर हा केवळ उत्पन्न-खर्चाचा तक्ता न राहाता विकासाचा मार्गदर्शक दस्तऐवज म्हणून विकसित झालेला दिसतो. महाराष्ट्राची औद्योगिक प्रगती, पायाभूत सुविधा, सामाजिक न्याय आणि अलीकडील काळात डिजिटल व हरित विकास या सर्व बाबींमध्ये अर्थसंकल्पाने निर्णायक भूमिका बजावली आहे. पुढील काही टप्प्यांमधून महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पाच्या माध्यमाने विकास, प्रवास, प्रमुख कामगिरी, उपक्रम, मर्यादा आणि भारतातील इतर राज्यांशी तुलना करण्याचा प्रयत्न केला आहे.

**पायाभूत निर्मिती व औद्योगिक पाया (१९६०-१९८०)**

स्थापनेनंतरच्या पहिल्या दोन दशकांत राज्याने प्रशासनिक रचना उभी करताना सिंचन, वीज, रस्ते आणि ग्रामीण मूलभूत सुविधा यांवर विशेष भांडवली खर्च वाढवला. त्यामुळे ह्या सेवांमध्ये वाढ झालेली दिसून येते. भारतातील सर्वात मोठ्या सहकार चळवळीच्या माध्यमातून साखर कारखाने, दुग्धव्यवसाय आणि कृषिप्रक्रिया उद्योगांना महाराष्ट्रामध्ये विशेष चालना मिळाली. याचा सकारात्मक परिणामामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला स्थैर्य मिळाले. जिल्हानिहाय औद्योगिक वसाहती, वीज प्रकल्प आणि वाहतूक जाळे उभारून कृषिप्रधान अर्थव्यवस्थेतून औद्योगिक संक्रमणाची पायाभरणी याच काळात झालेली दिसून येते.

ही वाटचाल करीत असताना सर्वच समस्या सोडवणे शक्य होतेच असे नाही. ह्यामध्ये भांडवल निर्मितीची व उभारणीची समस्या, तांत्रिक कौशल्याचा अभाव आणि प्रादेशिक असमतोल अशा समस्यांचा आपण आजही सामना करीत आहोत. याकाळातच गुजरात व तामिळनाडूसारख्या राज्यांनी औद्योगिक धोरणे राबविली. महाराष्ट्राने सहकार चळवळ यशस्वी करून ग्रामीण भागाला रोजगार आणि स्थैर्य मिळवून दिले व औद्योगिक वसाहतीद्वारे राष्ट्रीय उत्पादनात लक्षणीय वाटा उचलला.

**औद्योगिक विस्तार व शहरीकरण (१९८०-२०००)**

१९८० ते २००० या कालखंडात महाराष्ट्राने औद्योगिक विस्तार आणि वेगवान शहरीकरणाचा महत्त्वपूर्ण टप्पा अनुभवला. उत्पादन, वाहननिर्मिती, अभियांत्रिकी आणि वस्त्रोद्योग या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर औद्योगिक वाढ झाली आणि राज्य राष्ट्रीय औद्योगिक नकाशावर ठळकपणे पुढे आले. मुंबई-पुणे औद्योगिक पट्टा हा देशातील सर्वाधिक गतिशील औद्योगिक प्रदेश म्हणून विकसित झाला, ज्यामुळे देशांतर्गत व परकीय गुंतवणूक आकर्षित झाली. औद्योगिक वाढीबरोबरच शहरीकरणाचा वेग वाढला आणि महानगरांमध्ये रोजगाराच्या नव्या संधी निर्माण झाल्या. वाढत्या नागरी लोकसंख्येमुळे गृहनिर्माण, पाणीपुरवठा, सार्वजनिक परिवहन, आरोग्य व स्वच्छता सेवांवरील सरकारी खर्च मोठ्या प्रमाणात वाढवावा लागला. औद्योगिक समूह विकास, औद्योगिक वसाहतींचा विस्तार आणि मोठ्या गृहनिर्माण प्रकल्पांसारखे उपक्रम राबविण्यात आले. या काळात सेवाक्षेत्रानेही विस्तारास सुरुवात केली आणि वित्तीय, व्यापार व व्यावसायिक सेवांना चालना मिळाली. एका बाजूने हे सर्व चित्र बदलत असताना दुसऱ्या बाजूने अनियंत्रित नागरीकरणामुळे महानगरांमध्ये गर्दी वाढली, झोपडपट्ट्यांची वाढ झाली आणि पायाभूत सुविधांवरील ताण प्रचंड वाढला. नियोजनातील मर्यादा आणि शहरी व्यवस्थापनातील अडचणी स्पष्टपणे जाणवू लागल्या. तामिळनाडूने ऑटोमोबाईल उत्पादन क्षेत्रात आघाडी घेतली असली तरी महाराष्ट्राने वित्तीय सेवा, विविध उद्योग आणि व्यापार विस्ताराच्या बळावर सकल राष्ट्रीय उत्पादनात आणि कर महसुलात अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान दिले.

### उदारीकरणानंतरचा बदल (१९९१-२०१०)

भारताने नवीन आर्थिक धोरणाचा अवलंब केल्यानंतर महाराष्ट्राने नवीन धोरणांचा स्वीकार केला. १९९१ ते २०१० या उदारीकरणानंतरच्या कालखंडात महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत संरचनात्मक बदल घडून आले. आर्थिक उदारीकरणामुळे खासगी क्षेत्र आणि परकीय थेट गुंतवणुकीला (FDI) प्रोत्साहन मिळाले, ज्यामुळे आयटी, वित्तीय सेवा, दूरसंचार आणि आधुनिक उत्पादन उद्योगांना मोठी चालना मिळाली. देशात मुंबईची वित्तीय राजधानी असलेली ओळख बँकिंग विस्तार, भांडवली बाजार, विमा आणि कॉर्पोरेट सेवांमध्ये झपाट्याने वाढ झाल्याने अधिक मजबूत झाली. या काळात द्रुतगती महामार्ग, बंदरे, विमानतळ आधुनिकीकरण आणि विशेष आर्थिक क्षेत्रे (SEZ) यांसारखे मोठे पायाभूत प्रकल्प राबवून राज्याने जागतिक स्पर्धात्मकतेकडे वाटचाल केली. औद्योगिक गुंतवणूक वाढवण्यासाठी सुलभ परवाना प्रक्रिया, कर सवलती आणि सार्वजनिक-खासगी भागीदारी (PPP) मॉडेल्स प्रभावीपणे राबविण्यात आले. आयटी-सेवाक्षेत्राच्या विस्तारामुळे उच्च कौशल्याधारित रोजगारनिर्मिती झाली आणि सेवा निर्यातीत वाढ झाली. आवश्यक आणि अपेक्षित मनुष्यबळातील वाढती दरी कमी करण्यासाठी इतर राज्यांतून रोजगार मिळविण्याकरिता मोठ्या प्रमाणात स्थलांतरे होऊ लागली.

हे सर्व घडत असताना अपेक्षा आणि वास्तवातील दरी वाढत गेली. मोठ्या प्रकल्पांसाठी जमीन अधिग्रहणातील अडचणी, पर्यावरणीय मंजुरीतील विलंब आणि प्रादेशिक विकासातील असमतोल ही गंभीर आव्हाने कायमचीच निर्माण झाली. मुंबई-पुणे परिसरात विकास केंद्रित झाल्याने विदर्भ व मराठवाड्यातील दरी वाढली. कर्नाटकाने बेंगळुरूच्या माध्यमातून आय.टी. क्षेत्रात राष्ट्रीय नेतृत्व मिळवले, तर महाराष्ट्राने वित्तीय राजधानीचा लाभ घेत सेवाक्षेत्र, उद्योग निर्यात आणि राष्ट्रीय कर महसुलात अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान दिले असल्याचे दिसून येते.

### समावेशक विकास व प्रादेशिक संतुलन (२०१०-२०२०)

२०१० ते २०२० या दशकात महाराष्ट्राने समावेशक विकास आणि प्रादेशिक संतुलन साधण्यासाठी विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील मागास भागांवर विशेष लक्ष केंद्रित केले. या काळात 'जलयुक्त शिवार', ग्रामीण रस्ते विकास आणि कृषी सहाय्य यांसारख्या योजनांच्या माध्यमातून मानवी विकास निर्देशांक (HDI) सुधारण्याचे प्रयत्न करण्यात आले. जलयुक्त शिवार आणि कौशल्य विकास मोहीम यासारख्या उपक्रमांमुळे जलसंधारण आणि ग्रामीण भागात काही प्रमाणात सकारात्मक बदल झाले असले, तरीही निधी वापराची कार्यक्षमता, शैक्षणिक व आरोग्य सुविधांच्या गुणवत्तेतील तफावत आणि वारंवार येणारे दुष्काळी चक्र यांसारख्या समस्यांवर पूर्ण समाधान मिळविता आले नाही. छत्तीसगड राज्याने प्रशासकीय विकेंद्रीकरण आणि प्रादेशिक समतोल साधण्यासाठी जिल्ह्यांच्या संख्येत वाढ केली. छत्तीसगड राज्याने प्रशासकीय पुनर्रचनेद्वारे समानतेची दरी कमी करण्याचा प्रयत्न केला आणि मध्यप्रदेशसारख्या राज्यांनी कृषी उत्पादन वाढीत मोठी झेप घेतली. महाराष्ट्राने मात्र सामाजिक समावेशकता आणि प्रादेशिक विषमता दूर करण्यावर भर देऊन राष्ट्रीय मानव विकास उद्दिष्टांमध्ये मोलाचे योगदान दिले आहे.

### डिजिटल अर्थव्यवस्था व शाश्वत विकास (२०२०-सद्यस्थिती)

२०२० पासून सद्यस्थितीपर्यंत महाराष्ट्राने डिजिटल अर्थव्यवस्था आणि शाश्वत विकासाच्या दिशेने सकारात्मक पाऊले उचलली आहेत. ई-गव्हर्नन्स, डीबीटी (DBT) आणि स्टार्टअप प्रोत्साहनासोबतच मेट्रो नेटवर्क, समृद्धी महामार्ग आणि लॉजिस्टिक हब्स यांसारख्या आधुनिक पायाभूत सुविधांमुळे राज्याच्या

विकासाला वेग आला आहे. समृद्धी महामार्ग आणि मेट्रो विस्तार यांसारख्या प्रकल्पांनी दळणवळणात क्रांती केली असून, हरित ऊर्जा संक्रमण आणि स्मार्ट सिटी उपक्रमांद्वारे शाश्वत शहरी विकासावर विशेष भर दिला जात आहे. या प्रवासात वाढता भांडवली खर्च, वाढता कर्जाचा भार आणि सायबर सुरक्षेचे धोके यांसारख्या मर्यादा असल्या, तरी स्टार्टअप आणि तांत्रिक क्षेत्रात तेलंगणा व कर्नाटकसारख्या राज्यांकडून मिळणाऱ्या स्पर्धेला महाराष्ट्राने आपल्या वित्तीय सेवा आणि लॉजिस्टिक क्षेत्रामध्ये प्रगती करून मात देण्याचा प्रयत्न केला आहे. भारताच्या एकूण आर्थिक वृद्धीत महाराष्ट्राने आपले अग्रणी स्थान कायम राखले असून, कौशल्य तुटवडा दूर करून भविष्यातील आव्हाने स्वीकारण्यासाठी राज्य सज्ज होत आहे.

महाराष्ट्राच्या विकासातील अडथळे आणि राज्याच्या अर्थसंकल्पीय मर्यादा यांचा परस्परांशी घनिष्ठ संबंध आहे. महाराष्ट्रात प्रादेशिक असमतोल कायम राहाण्याचे एक प्रमुख कारण म्हणजे निधीचे असमान वितरण व मर्यादित भांडवली तरतूद होय. महसुली खर्चाचा मोठा हिस्सा पगार, निवृत्तीवेतन, अनुदाने आणि कर्जावरील व्याज देयकांवर करावा लागत असल्याने मागास भागांसाठी दीर्घकालीन पायाभूत गुंतवणूक अपुरी पडते. दुष्काळप्रवण क्षेत्रांतील जलसंपदा प्रकल्पांसाठी मोठी तरतूद आवश्यक असताना वित्तीय तूट आणि कर्जमर्यादा यांमुळे सिंचन व जलव्यवस्थापनाची कामे टप्प्याटप्प्यानेच राबवावी लागतात. वेगवान शहरीकरणामुळे नागरी पायाभूत सुविधांवर प्रचंड ताण येतो. परंतु महानगरांसाठी वाहतूक, गृहनिर्माण, सांडपाणी व प्रदूषण नियंत्रणासाठी लागणारी भांडवली गुंतवणूक अर्थसंकल्पातील मर्यादित संसाधनांमुळे विलंबित होते.

औद्योगिक विस्तारालाही अर्थसंकल्पीय बंधने येतात. मोठे पायाभूत प्रकल्प हाती घेतल्याने कर्जभार वाढतो आणि नव्या औद्योगिक क्षेत्रांसाठी आवश्यक जमीन-विकास, वीज, लॉजिस्टिक्स यांसाठी पुरेशी सातत्यपूर्ण तरतूद करणे कठीण होते. प्रशासकीय यंत्रणेतील कार्यक्षमता व पारदर्शकता वाढवण्यासाठी डिजिटलायझेशन व कौशल्यविकासावर गुंतवणूक आवश्यक असली तरी सामाजिक क्षेत्रातील आवश्यक खर्चामुळे अपेक्षित निधी उपलब्ध होत नाही. शिक्षण व कौशल्य प्रशिक्षणातील अपुऱ्या गुंतवणुकीमुळे उद्योगांच्या गरजेनुसार मनुष्यबळ तयार होत नाही. परिणामतः उच्च उत्पादकतेची क्षमता मर्यादित राहाते. अशा अनेक अर्थसंकल्पीय मर्यादा राज्याच्या सर्वांगीण व संतुलित विकासाच्या गतीला अडथळा निर्माण करतात.

**महाराष्ट्र राज्याचा अर्थसंकल्पः २०२६-२७**

या भागात नुकताच सादर झालेला अर्थसंकल्प २०२६-२७ चा आढावा घेतला आहे. महाराष्ट्राचा चालू अर्थसंकल्प हा आकारमान, दीर्घकालीन विकासदृष्टी, तंत्रज्ञानाचा वापर आणि हरित विकास यांचा संगम दर्शवणारा आहे. ह्या अर्थसंकल्पामध्ये प्रादेशिक संतुलित विकास साध्य करण्याकरिता प्रगतिशील, शाश्वत, सर्वसमावेशक आणि सुशासन अशा चार स्तंभांवर भर देण्यात आला आहे. २०४७ पर्यंत महाराष्ट्राला विकसित राज्य बनविण्याच्या स्वप्नपूर्तीकरिता अर्थसंकल्पाच्या चारही स्तंभांतर्गत १६ उपक्षेत्रे निश्चित केली आहेत. हा अर्थसंकल्प पारंपरिक खर्च आराखड्यापेक्षा 'वाढ-उत्पादकता-शाश्वतता' अशा तिहेरी ध्येयपूर्ती करणारा आहे. मुख्यमंत्री आणि अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ६ मार्च २०२६ रोजी हा ७.६९ लाख कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर केला आहे.

महाराष्ट्राचा २०२६-२७ चा अर्थसंकल्प हा आकारमान, भांडवली प्राधान्यक्रम, तंत्रज्ञानाधिष्ठित सुशासन आणि समावेशक विकास यांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. एकूण रु. ७,६९,४६७ कोटींचा हा अर्थसंकल्प राज्याला उच्च वृद्धिदराच्या मार्गाने विकासाचे ध्येय साध्य करेल असे अपेक्षित आहे. महसुली जमा

रु. ६,१६,०९९ कोटी, महसुली खर्च रु. ६,५६,६५१ कोटी आणि अंदाजित तूट रु. ४०,५५२ कोटी राहाणार आहे. राजकोषीय तूट स्थूल राज्य उत्पन्नाच्या ३% च्या आत ठेवण्यात यश आल्याने वित्तीय शिस्त राखण्याचा प्रयत्न दिसून येतो. अर्थतज्ज्ञांच्या दृष्टीने हा अर्थसंकल्प 'उच्च गुंतवणूक-उच्च उत्पादकता-उच्च उत्पन्न' या विकासचक्राला गती देण्याचा प्रयत्न करीत असला तरीही तूट व कर्जाचा भार यामुळे मोठे प्रकल्प वित्तपोषित करताना आव्हाने निर्माण होतील, यात शंका नाही. २०२६-२७ च्या अर्थसंकल्पाचा प्रमुख क्षेत्रावार आढावा थोडक्यात घेतला आहे.

**कृषी व ग्रामीण अर्थव्यवस्था**

कृषिक्षेत्राचा विचार करता अर्थसंकल्पामध्ये तात्कालिक दिलासा आणि दीर्घकालीन उत्पादकतेमध्ये सुधारणा या दोन्हींचा समतोल साधण्याचा प्रयत्न केला आहे. 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजने'अंतर्गत ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकबाकी असलेल्या पात्र शेतकऱ्यांना रु. २ लाखांपर्यंत कर्जमाफी, तर नियमित परतफेड करणाऱ्यांना रु. ५०,००० प्रोत्साहन अनुदान जाहीर करण्यात आले आहे. यामुळे गरीब शेतकऱ्यांना दिलासा मिळेल. जून-ऑक्टोबर २०२५ दरम्यानच रु. १५,४९२ कोटींचे वितरण झाले होते. या कर्जाची परतफेड झाल्यास ग्रामीण भागात तरलता वाढण्याची शक्यता आहे.

ऊर्जा खर्च कमी करण्यासाठी मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना (सुमारे रु. २०,००० कोटी तरतूद) आणि सौर कृषी वाहिनी २.० अंतर्गत १६,००० मे.वॅ. क्षमतेचे लक्ष्य ठेवले आहे. अशा उर्जेवर आधारित पायाभूत सुविधांवर मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्याचा मुख्य उद्देश उत्पादन खर्चात घट होऊन शेतकऱ्यांचे निव्वळ उत्पन्न वाढेल, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

डिजिटल कृषी पायाभूत सुविधा, केंद्र व राज्य सरकारद्वारे विकसित केलेले डिजिटल व्यासपीठ-ॲजग्रीस्टॅक, AI-आधारित शेतकऱ्यांना कृषिविषयक माहिती आणि सल्ला, समकांची देवाणघेवाण यांसारख्या डिजिटल योजनांमुळे योग्य आणि लाभदायक शेती तसेच बाजाराभिमुख उत्पादनाला चालना मिळेल. ५ लाख हेक्टर नैसर्गिक शेती, १.३१ कोटी शेतकरी ओळखपत्र (आयडी) आणि कृषी विद्यापीठांत AI नावीन्यता केंद्रे ही दीर्घकालीन उत्पादकता वाढवणारी पावले आहेत.

कर्जमाफी आणि प्रोत्साहन अनुदानामुळे ग्रामीण भागात तात्काळ उपभोगक्षमता वाढून मागणीला गती मिळेल. तसेच शेतकऱ्यांना नवीन गुंतवणुकीसाठी प्रोत्साहन मिळेल, अशी अपेक्षा आहे. सौर ऊर्जा आणि डिजिटल उपायांच्या वापरामुळे उत्पादन खर्च कमी होऊन बाजारातील उपलब्धता सुधारल्याने उत्पन्नातील अस्थिरता कमी होईल. परिणामी, कृषी जोखीम कमी होऊन निर्यातक्षमता वाढेल. हे चित्र सकारात्मक जरी असले तरीही आर्थिक लाभ पुरविताना वारंवार होणाऱ्या कर्जमाफीमुळे निर्माण होणारा 'नैतिक धोका' आणि हवामान बदलामुळे उद्भवणारी उत्पादनातील अस्थिरता या आव्हानांचा जाणीवपूर्वक अभ्यास करणे तितकेच महत्त्वाचे आहे.

**उद्योग, उत्पादन व गुंतवणूक**

अर्थमंत्र्यांद्वारे अर्थसंकल्पामध्ये औद्योगिक वाढीसाठी मोठ्या प्रमाणावर भांडवली गुंतवणुकीवर भर देण्यात आला आहे. १८ अतिविशाल औद्योगिक केंद्रे, प्रत्येक जिल्ह्यात MSME केंद्रे आणि गडचिरोलीतील स्टील हबमध्ये रु.२.६१ लाख कोटी गुंतवणूक यामुळे राज्याच्या उत्पादन क्षमतेत संरचनात्मक बदल घडून येईल. रत्ने-आभूषण धोरणातून रु. १ लाख कोटी गुंतवणूक व ५ लाख रोजगार, तर बांबू विकास प्रकल्पातून रु. ५०,००० कोटी गुंतवणूक अपेक्षित आहे. राज्यातील आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि मोठ्या शहरांना वित्तीय सेवा, कॉर्पोरेट मुख्यालय, बँकिंग आणि भांडवली बाजार उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न करण्यात येणार आहे. बंदरे,

लॉजिस्टिक्स जाळे, तांत्रिक मनुष्य बळ (Skilled labour) आणि इतर अनुकूल आर्थिक व्यवस्था असेल तर उद्योगांना सहकार्य प्राप्त होते आणि स्टार्टअप्सना महाफंडमधून थेट मदत यामुळे ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेकडे वाटचाल होत असल्याचे दिसून येत आहे. यामुळे उच्च कौशल्य रोजगार आणि निर्यातक्षम सेवाक्षेत्र अधिक बळकट करण्यावर भर देण्यात येणार आहे. नुकतेच २०२५ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या अनेक धोरणांवर या अर्थसंकल्पात विशेष भर दिल्याचे दिसून येते. यामुळे IT/ITeS, मीडिया-टेक, AVGC, फार्मा, ऑटो आणि उत्पादन समूह यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञावर आधारित उद्योगांचे समूह निर्माण करून रोजगारात आणि स्वयंरोजगारात मोठ्या प्रमाणात वाढ होईल, यावर भर देण्यात आला आहे.

असे असले तरीही महाराष्ट्रातील MIDC आणि FDI च्या वाढीसमोर प्रामुख्याने जमीन अधिग्रहणातील सामाजिक विरोध, अधिक मोबदला आणि पर्यावरणीय परवान्यांमधील विलंब हे मोठे अडथळे आहेत. यासोबतच काही औद्योगिक क्षेत्रांत पाणी, ऊर्जा आणि लॉजिस्टिक्स यांसारख्या पायाभूत सुविधांची कमतरता असून, उच्च तंत्रज्ञान उद्योगांसाठी आवश्यक असलेल्या तांत्रिक कौशल्याचा तुटवडा (Skill Gap) जाणवतो. धोरणात्मक सातत्याच्या अभावामुळे गुंतवणूकदारांचा विश्वास संपादन करण्यात अनेक अडचणी येतात. इतर राज्यांशी तुलना करता, गुजरात आपल्या बंदरांवर आधारित विकास आणि वेगवान 'लँड पूलिंग' धोरणांमुळे, तर कर्नाटक आणि तेलंगणा त्यांच्या आयटी समूह व तांत्रिक मानवी भांडवलामुळे महाराष्ट्राला चांगलीच स्पर्धा देत आहेत. तामिळनाडूने ऑटो आणि निर्यात-उन्मुख वस्तुनिर्माणामध्ये आपले स्थान मजबूत केले आहे. महाराष्ट्राकडे मोठी भौगोलिक आणि आर्थिक संपदा असली तरी, गुजरातसारखी वेगवान निर्णयप्रणाली आणि इतर राज्यांमधील प्रशासकीय सुलभतेच्या तुलनेत महाराष्ट्रातील जटिल परवाना प्रक्रिया आणि जमिनीशी संबंधित धोरणे काहीशी वेळखाऊ ठरत आहेत, ज्यामुळे अर्थसंकल्पामध्ये तरतूद करूनही स्पर्धात्मकतेवर परिणाम होत आहे.

### आरोग्य व मानवी भांडवल

आरोग्यक्षेत्रात शहरी आरोग्य आयुक्तालय, तसेच ३५ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये कार्यरत आहेत. नागपूर येथे सार्वजनिक आरोग्य संस्था स्थापन करण्याची घोषणा ही आरोग्यविषयक पायाभूत सुविधांना बळ देणारी आहे. महात्मा फुले जनारोग्य योजनेअंतर्गत उपचारांची संख्या १,३५६ वरून २,३९९, संलग्न रुग्णालये १,७९२ वरून ४,५३७ आणि अवयव प्रत्यारोपणासाठी रु. २२ लाखांपर्यंत कवच देण्यात येणार आहे. ग्रामीण निदानासाठी रु. ४,५०० कोटींची योजना आरोग्यसेवांचा विस्तार करेल. यामुळे आरोग्य सुविधांचा नक्कीच विस्तार होईल.

आरोग्यविषयक सर्व उपाय उत्पादक श्रमशक्ती, आरोग्य खर्चात घट आणि मानवी विकास निर्देशांक सुधारण्यास मदत करतात, असे असले तरीही ग्रामीण भागातील तज्ञ मनुष्यबळ व डिजिटल पायाभूत सुविधा यांच्यामध्ये फार मोठी दरी आहे. ही दरी कमी होत असलेली दिसून येत नाही. ग्रामीण भागातील जनतेला आवश्यक आरोग्यविषयक सुविधा मिळविण्याकरिता शहराकडेच वाटचाल करावी लागते. त्यामुळे ग्रामीण जनतेला या सेवा मिळविण्याकरिता मोठा खर्च करावा लागतो, तर दुसरीकडे मजुरीला मुकावे लागते.

### शिक्षण, कौशल्य व रोजगार

महाराष्ट्राच्या चालू अर्थसंकल्पात मानवी भांडवल निर्मितीला ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे ध्येय गाठण्याच्या अनुषंगाने उपाययोजना आणि तरतुदी करण्यात आल्याचे दिसून येते. शिक्षण व कौशल्यविकासासाठी संस्थात्मक विस्तार आणि रोजगाराभिमुख प्रशिक्षणावर भर देण्यात आला आहे.

त्याकरिता अलीकडेच महाराष्ट्राचे पहिले कौशल्य विद्यापीठ स्थापन करण्यात आले आहे. राज्यात ३५ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये कार्यरत असून आणखी ११ महाविद्यालये टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात येणार आहेत. आरोग्य शिक्षणातील ही वाढ उच्च कौशल्याधारित मनुष्यबळ निर्माण करण्यास मदत करेल. विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या शिक्षणासाठी शैक्षणिक संकुले विकसित करण्याची तरतूद, तसेच विज्ञानाभिमुख उपक्रमांद्वारे संशोधनवृत्ती वाढवण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. कौशल्य विकासासाठी विशेष यंत्रणा उभारून परदेशी रोजगार संधींसाठी भाषा व कौशल्य प्रशिक्षण देण्याची तरतूद केली आहे.

रोजगारनिर्मिती व उद्योजकतेसाठी राज्याने स्टार्टअप परिसंस्थेला गती दिली आहे. पुढील ५ वर्षांत १.२५ लाख उद्योजक घडविणे आणि ५०,००० स्टार्टअप्सना बळ देणे हे लक्ष्य ठेवले आहे. उत्कृष्ट ५० स्टार्टअप्सना रु. २५ लाखांपर्यंत शासकीय कामांचे थेट कार्यादेश (वर्क ऑर्डर) देण्याची तरतूद केली असल्याने नवोपक्रमांना प्रत्यक्ष बाजारपेठेशी जोडणे शक्य होईल. क्रीडा व कौशल्य पायाभूत सुविधांमध्ये राज्यस्तरावर ८ उच्च कार्यकारी केंद्रे आणि आणखी ४ विशेष केंद्रांच्या उभारणीबरोबरच, विभागीय व जिल्हास्तरावर क्रीडा उत्कृष्टता केंद्रे स्थापित करण्यात येणार असल्याने क्रीडा-आधारित रोजगार व सेवा अर्थव्यवस्थेला चालना मिळू शकते. समुपदेशन व मार्गदर्शनासाठी ३६ नवदिशा केंद्रे उभारण्याच्या योजनेमुळे विद्यार्थ्यांना रोजगाराच्या नवनवीन संधी उपलब्ध होणार आहेत.

महाराष्ट्रचे ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे लक्ष्य गाठण्याकरिता शिक्षण-कौशल्य-रोजगार ह्या त्रिसूत्रीची भूमिका गुणक परिणाम (Multpilier effect) निर्माण करणारी आहे. उच्च कौशल्याधारित मनुष्यबळामुळे आयटी, वित्तीय सेवा, प्रगत उत्पादन, डिजिटल तंत्रज्ञान आणि हरित ऊर्जा क्षेत्रांत गुंतवणूक वाढणार आहे. उद्योजकता प्रोत्साहनामुळे स्वयंरोजगार व रोजगारनिर्मिती वेगाने होते, ज्याचा परिणाम राज्याच्या सकल उत्पन्नवाढीवर होतो. उद्योगांच्या गरजांशी संलग्न कौशल्य प्रशिक्षणामुळे उत्पादकता वाढून निर्यातक्षम सेवा व उत्पादन क्षेत्र मजबूत होते.

महाराष्ट्राने ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट गाठण्याचे २०४७ पर्यंत निश्चित केले असले तरीही वर्तमान अर्थव्यवस्थेचे मूल्य आणि स्थिती यांचा विचार करता हे लक्ष गाठणे वाटते तितके सोपे नाही. यामध्ये अनेक आव्हाने आहेत. शिक्षणाच्या गुणवत्तेतील विषमता आणि ग्रामीण-शहरी दरीमुळे संधींचे असमान वितरण होते. कौशल्य प्रशिक्षण व उद्योगांच्या मागणीतील तफावत (Skill mismatch) रोजगारक्षमतेवर परिणाम करते. डिजिटल पायाभूत सुविधांची असमान उपलब्धता आणि प्रशिक्षित अध्यापकांची कमतरता ह्या अंमलबजावणीतील मर्यादा आहेत. नुकतेच आपण उच्च शिक्षणामध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० चा अवलंब केला आहे. परंतु हे धोरण योग्य पद्धतीने अवलंबविण्याकरिता आणखी दहा ते पंधरा वर्षांचा कालावधी लागू शकतो. वाढता महसुली खर्च आणि कर्जदबाव लक्षात घेता शिक्षण व कौशल्य क्षेत्रातील सातत्यपूर्ण भांडवली गुंतवणूक राखणे कठीण ठरू शकते. त्यामुळे परिणामकेंद्रित अंमलबजावणी, उद्योग-शिक्षण दुवा आणि डिजिटल समावेशन बळकट केल्याशिवाय अपेक्षित आर्थिक झेप घेणे साध्य होणार नाही.

### पायाभूत सुविधा व शहरी विकास

महाराष्ट्राच्या चालू अर्थसंकल्पात पायाभूत सुविधा आणि शहरी विकासाचे प्रमुख चालक मानले आहे. राज्याने भांडवली खर्चाला प्राधान्य देत मोठ्या प्रमाणावर द्रुतगती मार्ग, मेट्रो जाळे, जलमार्ग, विमानतळ विस्तार आणि शहरी पायाभूत सेवा उभारणीवर भर दिला आहे. पायाभूत सुविधांवरील ही गुंतवणूक उत्पादनक्षमता वाढविण्यावर भर देते.

वाहतूक आणि कनेक्टिव्हिटी क्षेत्रात राज्याने महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतले आहेत. राज्यातील मेट्रोचे जाळे १,२०० कि.मी.पर्यंत विस्तारण्याचे उद्दिष्ट असून द्रुतगती मार्गांचे जाळे ६,००० कि.मी.पेक्षा अधिक करण्याची योजना आहे. शहरी जलवाहतुकीसाठी विद्यमान १२५ कि.मी. जलमार्ग जाळे वाढवून ३४० कि.मी. करण्याचे उद्दिष्ट आहे. मुंबई महानगर प्रदेशात मेट्रो-११ हा पूर्ण भूमिगत प्रकल्प सुमारे रु.२३,४८७ कोटी खर्चातून उभारला जाणार आहे, तर मेट्रो-८ साठी सुमारे रु. २२,८६२ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. या प्रकल्पांमुळे महानगरांतील प्रवास वेळ कमी होऊन शहरी उत्पादकता वाढण्यास मदत होईल.

रस्ते आणि औद्योगिक जोडणी मजबूत करण्यासाठी मोठ्या महामार्ग प्रकल्पांनाही चालना दिली जात आहे. महाराष्ट्र अमृतकाल रस्ते विकास योजनेअंतर्गत ६,२७२ कि.मी. द्रुतगती मार्ग आणि १४,९१९ कि.मी. राज्य व जिल्हा मार्ग विकसित करण्याचे उद्दिष्ट आहे. ग्रामीण संपर्कता सुधारण्यासाठी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेत २३,००० कि.मी. रस्त्यांची कामे प्रस्तावित आहेत. महामार्ग जाळ्यामुळे कृषी बाजारपेठा, औद्योगिक समूह (क्लस्टर) आणि लॉजिस्टिक हब यांच्यातील दळणवळण वेगवान होईल, ज्याचा थेट परिणाम औद्योगिक उत्पादन व व्यापारवाढीवर होणार आहे.

शहरीकरणाच्या दृष्टीने राज्याने नव्या आर्थिक केंद्रांची उभारणी करण्यावर भर दिला आहे. अटल सेतू परिसरात सुमारे २०० चौ.कि.मी. क्षेत्रात 'तिसरी मुंबई' विकसित करण्याचा आराखडा आहे. वाढवण बंदर प्रकल्पामुळे १२ लाखांहून अधिक रोजगारनिर्मिती अपेक्षित आहे आणि लॉजिस्टिक व वेअरहाऊसिंग क्षेत्राला चालना मिळणार आहे. मुंबई महानगर प्रदेशात २० लाख झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास आणि १० लाख परवडणारी घरे उभारण्याची योजना शहरी जीवनमान सुधारण्यास महत्त्वाची आहे.

अर्थव्यवस्थेच्या वृद्धीसाठी पायाभूत सुविधांचा थेट परिणाम बहुआयामी आहे. सुधारित जोडणीमुळे गुंतवणूक वाढते, औद्योगिक उत्पादन खर्च कमी होतो, निर्यातक्षमता वाढते आणि सेवाक्षेत्राचा विस्तार होतो. शहरी पायाभूत सुविधा मजबूत झाल्यास उच्च कौशल्याधारित रोजगारात वाढ होते आणि महानगरांची जागतिक स्पर्धात्मकता उंचावते. लॉजिस्टिक साखळी सक्षम झाल्याने उत्पादन क्षेत्रातील मूल्यवर्धन होते जे उच्च सकल राज्य देशांतर्गत उत्पादन वृद्धीसाठी अत्यावश्यक आहे.

पायाभूत सुविधा आणि शहरी विकास या क्षेत्रातील आव्हानांचाही विचार करणे आवश्यक आहे. मोठ्या प्रमाणावरील भांडवली गुंतवणुकीमुळे कर्जभार वाढण्याचा धोका तर आहे. त्याचबरोबर बाजारभावापेक्षा जास्त किंमतीला होणारे जमीन अधिग्रहण, पर्यावरणीय मंजुरी आणि पुनर्वसन प्रक्रिया प्रकल्पांना विलंब होतो. त्यामुळे प्रकल्पांच्या मूळ खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ होते. महानगरांतील अनियंत्रित शहरीकरणामुळे पायाभूत सुविधांवर ताण येतो, झोपडपट्ट्यांमध्ये व अनधिकृत बांधकामात वाढ होते आणि सेवा वितरणात असमानता वाढते. निधी वितरणातील कार्यक्षमता, प्रकल्प व्यवस्थापन कौशल्य आणि बहु-यंत्रणांतील समन्वय हे यशाचे निर्णायक घटक आहेत. त्यामुळे योजनांच्या अंलबजावणीबरोबरच येणाऱ्या अडचणींचा विचार करणे तितकेच महत्त्वाचे आहे.

**पर्यावरण, हवामान व हरित अर्थव्यवस्था**

महाराष्ट्राच्या चालू अर्थसंकल्पात हरित अर्थव्यवस्थेला विकासाच्या मुख्य प्रवाहात स्थान देण्यात आले आहे. राज्याने २०२९ पर्यंत ५०% आणि २०३५ पर्यंत ६५% हरित ऊर्जा साध्य करण्याचे लक्ष्य ठेवले असून याकरिता सुमारे रु.३ लाख कोटी गुंतवणूक अपेक्षित आहे. सौर ऊर्जेच्या क्षेत्रात ४.५७ लाख घरांमध्ये १,७३५ मेगावॅट छतावरील (रुफटॉप) सोलार क्षमता उभारली गेली असून रु.३,२०० कोटी अनुदान

वितरित झाले आहे; तसेच पुढे ५ लाख लाभार्थ्यांना रु.६३५ कोटी सहाय्य दिले जाणार आहे. मोठ्या प्रमाणावर ऊर्जा साठवणूक वाढवण्यासाठी ५५ पंप युक्त जल विद्युत (पंप्ड स्टोरेज) प्रकल्पांमधून ७८,२१५ मेगावॅट क्षमता उभारण्याचे नियोजन असून रु.१.२८ लाख कोटी गुंतवणूक अपेक्षित आहे. पर्यावरण संवर्धनासाठी ३०० कोटी वृक्षलागवड आणि स्वच्छ वाहतूक धोरणे राबविली जात आहेत. हरित ऊर्जा व पर्यावरणपूरक पायाभूत सुविधा उद्योगांना स्वस्त व स्थिर ऊर्जा देऊन उत्पादनक्षमता वाढविण्यास मदत करतात, गुंतवणूक आकर्षित करतात आणि हरित तंत्रज्ञान उद्योगांद्वारे नवीन रोजगार निर्माण करतात. जे विकसित अर्थव्यवस्थेचे ध्येय साध्य करण्याकरिता महत्त्वाचे आहे.

अर्थव्यवस्थेच्या या संक्रमणात आव्हानांचा विचार करणेसुद्धा महत्त्वाचे आहे. अक्षय ऊर्जा प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणावर भांडवली गुंतवणूक आणि दीर्घ परतावा कालावधीमुळे वित्तपुरवठा संरचना गुंतागुंतीची ठरते. सौर व पवन ऊर्जेच्या अस्थिर निर्मितीमुळे ग्रिड स्थिरता आणि ऊर्जा साठवणूक व्यवस्थापन महत्त्वाचे राहाते. महाराष्ट्रामध्ये हरित तंत्रज्ञानासाठी प्रगत कौशल्ययुक्त मनुष्यबळाची उपलब्धता मर्यादित आहे. वर्तमान स्थितीत पर्यावरणीय मानकांची योग्य अंमलबजावणी होत नाही आणि ती करण्यासाठी नफा कमी होऊन उद्योगांचा अनुपालन खर्च वाढतो. हवामान बदलामुळे पूर, उष्णतेच्या लाटा आणि किनारी भागातील जोखमींमुळे पायाभूत सुविधांसाठी करण्यात येणाऱ्या संरक्षण खर्चात वाढ होते. ग्रामीण भागात हरित तंत्रज्ञानाचा प्रसार आणि नागरिकांचा सहभाग सुनिश्चित करणेही तितकेच आवश्यक आहे.

**सामाजिक न्याय व समावेशकता**

महाराष्ट्राच्या चालू अर्थसंकल्पात सामाजिक न्याय आणि समावेशकतेला विकासाच्या केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे. वंचित घटकांच्या सक्षमीकरणासाठी लक्षित तरतुदी करण्यात आल्या असून, अनुसूचित जातींसाठी रु.२३,१५० कोटी आणि अनुसूचित जमातींसाठी रु.२१,७२३ कोटी निधी राखीव आहे. महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी 'माझी लाडकी बहीण' योजनेस रु.२६,५०० कोटी तर स्वयं-सहायता गट, उद्योजकता आणि कौशल्यविकास उपक्रमांना प्रोत्साहन देण्यात आले आहे. दिव्यांगांसाठी विविध सुविधा एकत्रित करणारी यंत्रणा, तृतीयपंथीयांसाठी स्वयंरोजगार बीजभांडवल आणि आकांक्षित जिल्हा कार्यक्रमाचा विस्तार या उपायांमुळे सामाजिक संरक्षण जाळे अधिक मजबूत होते.

समावेशक गुंतवणुकीमुळे मानवी भांडवल वाढते, कामगार सहभाग दर सुधारतो आणि उत्पादकता वृद्धिंगत होते जे ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेसाठी अत्यावश्यक आहे. शिक्षण, आरोग्य आणि उद्योजकतेतील प्रवेश वाढल्याने उत्पन्नवाढ आणि स्थानिक बाजारपेठा विस्तारतात. तथापि, लाभार्थी ओळख अचूकता, योजनांची समन्वित अंमलबजावणी, परिणाममापन यंत्रणा कमकुवतपणा, आणि अनुदानांवरील दीर्घकालीन अवलंबित्व कमी करण्याची गरज ही महत्त्वाची आव्हाने आहेत.

**डिजिटल सुशासन व तंत्रज्ञान**

महाराष्ट्राच्या चालू अर्थसंकल्पात डिजिटल सुशासन आणि प्रगत तंत्रज्ञानाला विकासाच्या दृष्टीने अधिक महत्त्व दिले आहे. प्रशासनातील पारदर्शकता व कार्यक्षमता वाढविण्यासाठी आपले सरकार २.०, मैत्री २.० आणि महाडीबीटी २.० ही पोर्टल्स नव्याने विकसित करण्यात येत आहेत. जमीन व्यवहारांचे १००% संगणकीकरण आणि १००% ई-कार्यालय अंमलबजावणीमुळे कागदविरहित व वेगवान प्रशासन साध्य होणार आहे. राज्याच्या सार्वभौम समंक सुरक्षिततेसाठी नागपूर येथे अत्याधुनिक राज्य समंक केंद्र उभारले जात आहे. उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रात

नेतृत्व मिळवण्यासाठी एआय, क्वांटम संगणन, ड्रोन, स्वयंचलित वाहने आणि डीपटेक यांसाठी स्वतंत्र धोरण आखण्याची तरतूद आहे. गुंतवणूक व उद्योग सुलभतेसाठी 'इन्व्हेस्ट महाराष्ट्र' हे एकसंध डिजिटल व्यासपीठ विकसित केले जात आहे.

अर्थसंकल्पात सुचविल्याप्रमाणे डिजिटल पायाभूत सुविधा मजबूत झाल्यास व्यवहार खर्च कमी होईल, सेवा वितरण जलद होते आणि उद्योगांना सुलभ नियामक वातावरण मिळते. यामुळे गुंतवणूक वाढ, नवउद्योगांना चालना आणि उच्च उत्पादकता साध्य होते. समंक-आधारित निर्णयप्रक्रिया आणि डिजिटल अर्थव्यवस्था विस्तारामुळे सेवाक्षेत्राचा वेग वाढून डॉलर अर्थव्यवस्थेसाठी आवश्यक मूल्यवर्धन निर्माण होते.

डिजिटल सुशासन आणि तंत्रज्ञानावर भर देताना सायबर सुरक्षा जोखीम, समंक गोपनीयता व्यवस्थापन, डिजिटल साक्षरतेतील दरी, तांत्रिक मनुष्यबळाची कमतरता आणि बहु-विभागीय समन्वयातील गुंतागुंत ही प्रमुख आव्हाने असून यावर नियंत्रण प्राप्त करणे महत्त्वाचे आहे.

२०४७ विकसित भारत व ५ ट्रिलियन महाराष्ट्र

अर्थसंकल्पीय दृष्टिकोनानुसार, २०४७ पर्यंत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन करण्याचे ध्येय 'विकसित भारत' संकल्पनेचा मुख्य आधार आहे. या अंतर्गत औद्योगिक उत्पादन १,५०० बिलियन आणि सेवाक्षेत्राचे उत्पादन ३,००० बिलियनपर्यंत नेण्याचे लक्ष्य निर्धारित केले आहे. ७.६९ लाख कोटींच्या अर्थसंकल्पात द्रुतगती मार्ग, उच्च-वेग रेल्वे आणि शहरी पायाभूत सुविधांसाठी मोठ्या तरतुदींमुळे राज्यातील सुमारे ७०% शहरी लोकसंख्येची उत्पादकता वाढण्याची अपेक्षा आहे. सुधारित जोडणी आणि लॉजिस्टिक कार्यक्षमतेमुळे कृषिक्षेत्रालाही चालना मिळून कृषी सकल देशांतर्गत उत्पादन ५५ बिलियनवरून ५०० बिलियनपर्यंत वाढण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. उद्योजकता वृद्धीसाठी पुढील पाच वर्षांत १.२५ लाख उद्योजक घडवणे आणि ५०,००० स्टार्टअप्सना बळ देणे ही उद्दिष्टे नवोपक्रमाधारित वाढीस पूरक आहेत.

२०४७ च्या महत्त्वाकांक्षी उद्दिष्टांसमोर अनेक आव्हाने आहेत. महाराष्ट्रात सध्या सुरू असलेल्या कल्याणकारी योजनांवर मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागत असल्यामुळे भांडवली गुंतवणुकीवर मोठा भार पडतो. हे लक्ष्य साध्य करण्याकरिता गुंतवणूक दर २७% वरून ३७% पर्यंत वाढविण्याची गरज आहे. मराठवाडा व विदर्भात नेहमीच निर्माण होणाऱ्या दुष्काळी परिस्थितीवर नियंत्रण मिळवून प्रादेशिक विकासातील तफावत कमी करणे आव्हानात्मक आहे. जागतिक आर्थिक मंदीच्या पार्श्वभूमीवर सातत्यपूर्ण औद्योगिक वाढ टिकवून ठेवणेही कठीण आहे. या सर्व आव्हानांचा विचार २०४७ चे लक्ष्य निर्धारित वेळेत पूर्ण करण्याकरिता आवश्यक आहे.

**निष्कर्ष**

महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पाचा १९६० पासूनचा प्रवास पाहिला तर राज्याच्या विकासाचा आराखडा काळानुरूप बदलत गेला आहे आणि तो अधिक परिपक्व तसेच धोरणनिष्ठ होत गेल्याचे स्पष्ट दिसते. प्रारंभीच्या दशकांत पायाभूत सुविधा, सिंचन व्यवस्था आणि औद्योगिक पाया उभारण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले होते. त्यानंतर उत्पादनक्षमतेत वाढ, शहरी विस्तार आणि औद्योगिक गुंतवणूक यांना चालना देण्यात आली. उदारीकरणोत्तर काळात जागतिक स्पर्धात्मकता, खासगी गुंतवणूक आणि सेवाक्षेत्रावर भर दिल्याने राज्याची अर्थव्यवस्था अधिक गतिमान झाली. पुढील टप्प्यात सामाजिक समावेशकता, प्रादेशिक संतुलन आणि मानवी विकास या घटकांना केंद्रस्थानी ठेवून विकासावर भर देण्यात आला. अलीकडील कालखंडात डिजिटल प्रशासन, हरित ऊर्जा, आधुनिक पायाभूत सुविधा आणि नवोपक्रमाधारित उद्योगव्यवस्थांवर आधारित विकास

प्रारूप स्वीकारण्यात आले आहे.

क्षेत्रनिहाय विश्लेषणातून असे दिसते की, कृषी आधुनिकीकरण, औद्योगिक विस्तार, सेवाक्षेत्र बळकटीकरण, शहरी पायाभूत सुविधेत सुधारणा, मानवी भांडवलनिर्मिती आणि पर्यावरणीय शाश्वतता यांचा एकात्मिक समन्वय साधण्याचा प्रयत्न सातत्याने झाला आहे. मोठ्या प्रमाणावरील भांडवली गुंतवणूक राज्याच्या दीर्घकालीन उत्पादक क्षमतेत वाढ घडवू शकते, तर कौशल्यविकास व उद्योजकता धोरणे रोजगारनिर्मितीचा पाया मजबूत करतात. त्याचवेळी सामाजिक क्षेत्रातील लक्षित खर्चामुळे विकास अधिक सर्वसमावेशक करण्याची दिशा स्पष्ट होते. त्याचबरोबर वित्तीय मर्यादा, अंमलबजावणीतील अकार्यक्षमता, प्रादेशिक असमतोल आणि बदलती जागतिक आर्थिक परिस्थिती या घटकांचा परिणाम विकासाच्या गतीवर होत असतो.

एकूणच, महाराष्ट्राच्या विकासात अर्थसंकल्प हा केवळ आर्थिक तरतुदींचा संच नसून राज्याच्या दीर्घकालीन परिवर्तनाचा आराखडा आहे. महाराष्ट्रासारख्या प्रभावी राज्यासाठी अर्थसंकल्प हा केवळ वित्तीय दस्तऐवज नसून देशाच्या आर्थिक प्रगतीचा दिशादर्शक आहे. औद्योगिक नेतृत्व, वित्तीय सामर्थ्य आणि धोरणात्मक गुंतवणूक यांच्या आधारावर राज्याने राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत अग्रस्थान टिकवले आहे. आगामी काळात दीर्घकालीन निर्धारित लक्ष्य प्राप्त करण्याकरिता शाश्वत वाढ, संतुलित विकास आणि उच्च उत्पादकतेकडे वाटचाल कायम ठेवण्यासाठी वित्तीय शिस्त, तंत्रज्ञानाचा परिणामकारक वापर आणि संस्थात्मक सक्षमतेवर विशेष भर देणे निर्णायक ठरेल. महाराष्ट्राचा अर्थसंकल्प हा वित्तीय दस्तऐवज नसून राज्याच्या संरचनात्मक आर्थिक परिवर्तनाचा धोरणात्मक नकाशा आहे

**संदर्भ ग्रंथ सूची :**


१. भारतीय रिझर्व्ह बँक, (२०२४), 'भारतीय राज्यांवरील सांख्यिकी हस्तपुस्तिका,' RBI.

२. महाराष्ट्र शासन, (२०२६), 'अर्थसंकल्पीय भाषण २०२६-२७', भाग १ आणि २, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन.

३. महाराष्ट्र शासन, (२०२५), 'महाराष्ट्र आर्थिक सर्वेक्षण २०२४-२५', अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन.

४. महाराष्ट्र शासन, (२०२०),'व्हिजन महाराष्ट्र २०४७', नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन.

५. वित्त आयोग, (२०२१), 'पंधराव्या वित्त आयोगाचा अहवाल (२०२१-२६)', भारत सरकार.


◆

नवप्रवर्तन हे आर्थिक विकासाचे एक अक्षम्य इंजिन आहे.

**- ली केकियांग**

# शाश्वत विकासासाठी हरित वाहतूक : वर्तमान परिस्थिती आणि आव्हाने

**विनोद म. गावंडे** †
**लक्ष्मण रामभाऊ म्हस्के** ††
**निता सखाराम खिराळे** †††

**प्रस्तावना :**

शाश्वतता संकल्पना सर्वप्रथम ब्रुंडलँड अहवालात १९८७ मध्ये मांडण्यात आली होती. ती या अहवालात खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहे. ''भविष्यातील पिढ्यांच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेशी तडजोड न करता वर्तमान गरजा पूर्ण करणे म्हणजे शाश्वतता होय.''[१] यात आर्थिक विकास, सामाजिक समता आणि पर्यावरण संरक्षण यांच्यात संतुलन साधण्यावर जोर देण्यात आला आहे. संशोधन आणि विकासाचा विषय, ज्यामध्ये शाश्वततेची संकल्पना त्याच्या सामाजिक, पर्यावरणीय आणि हवामानाच्या प्रभावांसह वाहतुकीवर केंद्रित आहे, त्याला शाश्वत वाहतूक किंवा हरित वाहतूक म्हणतात. यावाहतूक पद्धतीमध्येरस्ते, जल आणि हवाई वाहतुकीसाठी वापरण्यात येणारी वाहने आणि शाश्वततेचे मूल्यांकन करण्यासाठी ते वापरत असलेल्या ऊर्जा स्त्रोतांचा समावेश होतो. संयुक्त राष्ट्रांच्या अहवालानुसार, शाश्वत वाहतूक ही हवामान बदलाशी सामना करण्यासाठी अत्यावश्यक मानली जाते.[२] वाहतुकीची शाश्वतता वाहतूक प्रणालीच्या कार्यक्षमतेवर तसेच पर्यावरणीय वातावरण आणि प्रणालीचे हवामान प्रभाव यावर मोजली जाते. हरित वाहतूक लोकांना कार्यक्षम, सुरक्षित आणि प्रवेशयोग्य प्रवास देते आणि पर्यावरणाची हानी कमी करते.[१] पारंपारिक वाहतूक ही जीवाश्म इंधनावर जास्त अवलंबून असते त्यामुळे उत्सर्जन आणि वायू प्रदूषण मोठ्या प्रमाणात होते. पारंपारिक इंधन संसाधने यांचे साठे भविष्यात संपुष्टात येत आहे, त्यामुळे पर्यायी इंधन म्हणून नूतनीकरणीय संसाधने यांचा वाहतुकीसाठी उपयोग करावा लागेल. हरित वाहतुक ही सामाजिक व आर्थिकदृष्ट्या महत्त्वाची आहे. पर्यावरणातील हवेची गुणवत्ता आणि शहरी भागातील एकूण पर्यावरणीय आरोग्यावरसुद्धा वाहतुकीचा मोठा परिणाम होत असतो. जीवाश्म इंधन जसे की, पेट्रोल

---

† अर्थशास्त्र विभाग प्रमुख, एल्फिन्सटन महाविद्यालय, मुंबई.
आजीव सभासद क्र. १४६१, भ्रमणध्वनी: ९४२३१३०१६७, ई-मेल: drvinodgawande123@gmail.com
†† अर्थशास्त्र विभाग प्रमुख, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती.
आजीव सभासद क्र. १८२९, भ्रमणध्वनी: ९४२३७२११९७, ई-मेल: dnyanlaksh81@gmail.com
††† संशोधक विद्यार्थीनी शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती.
आजीव सभासद क्र. २१०४, भ्रमणध्वनी: ९३२५७११६७१, ई-मेल: nitakhirale06@gmail.com

किंवा डिझेल हे पारंपारिक इंधन कार, बस आणि व्हॅन या वाहनांमुळे वायू प्रदूषणास कारणीभूत ठरतात, त्यामुळे वातावरणातील घातक वायूच्या उत्सर्जनात वाढ होऊन मानवी आरोग्याच्या समस्या निर्माण होतात. पर्यावरण समतोल राखण्यासाठी प्रदूषण कमी करणे गरजेचे आहे. पारंपारिक वाहतूक व्यवस्थेला शाश्वत पद्धतीने बदलण्यासाठी हरित वाहतुकीचा सर्वांगीण दृष्टिकोन आवश्यक आहे आणि त्यामध्ये गतिशीलता आणण्यासाठी परिसंस्थेतील सर्व संबंधित घटकांकडून गंभीर प्रयत्न करणे अनिवार्य आहे. हरित परिवहन व्यवस्थेमुळे सार्वजनिक आरोग्य धोक्यात येत नाही, तर त्यांच्या पुनरुत्पादनाच्या गतीपेक्षा कमी अक्षय स्त्रोत वापरून गतिशीलता प्रदान केली जाते. हवामान बदल हा आजच्या पिढीला भेडसावणारी महत्त्वाची समस्या आहे, त्यामुळे या समस्येने शाश्वत वाहतूक व्यवस्था असण्याच्या गरजेवर लक्ष केंद्रित केले आहे. हवामानातील बदल रोखण्यासाठी सतत वाढत असलेल्या प्रदूषणाने, भारताला शाश्वत वाहतुकीकडे नेणे आवश्यक आहे. हरित वाहतुकीमध्ये इलेक्ट्रिक वाहने आणि हायब्रीडपासून ते सायकलिंग आणि चालणे या पर्यायांचा समावेश होतो. या वाहन पद्धतीच्या माध्यमातून वातावरणातील उत्सर्जन पातळी कमी करणे हे लक्ष्य साध्य होईल त्याचबरोबर लोकांना परवडणारी जुळवणूकतादेखील मिळू शकते.[३]

**संशोधन साहित्याचा आढावा:**

भारतात वाढती लोकसंख्या, शहरीकरण आणि वाहनसंख्या यामुळे वाहतूक क्षेत्रातून होणारे प्रदूषण आणि कार्बन उत्सर्जन वेगाने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय संशोधकांनी हरित वाहतूक आणि शाश्वत विकास यांमधील संबंधाचा सखोल अभ्यास केला आहे.

**१) मोहन आणि तिवारी (१९९९) :** यांनी भारतातील शाश्वत शहरी वाहतुकीसाठी सार्वजनिक वाहतूक, सायकलिंग आणि पादचारी वाहतुकीचे महत्त्व अधोरेखित केले आहे. त्यांच्या संशोधनानुसार, खासगी वाहनांवर अवलंबून राहाण्याऐवजी सार्वजनिक आणि अपारंपरिक वाहतूक पद्धती स्वीकारल्यास पर्यावरणीय प्रदूषण कमी होऊ शकते.

**२) बदामी (२००५) :** यांनी भारतातील शहरी वाहतूक धोरणांचा आढावा घेतला असून, हरित वाहतूक धोरणे प्रभावीपणे राबविण्यासाठी संस्थात्मक सुधारणा आणि धोरणात्मक समन्वय आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. त्यांच्या अभ्यासात वाहतूक नियोजनाचा थेट परिणाम शाश्वत विकासावर होत असल्याचे स्पष्ट केले आहे.

**३) सिंग (२०१५) :** यांनी भारतातील पर्यावरणपूरक वाहतुकीसाठी इलेक्ट्रिक वाहने आणि स्वच्छ इंधनांचा वापर यावर भर दिला आहे. त्यांच्या मते, इलेक्ट्रिक वाहने ही दीर्घकालीन दृष्टीने कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी उपयुक्त ठरू शकतात, मात्र त्यासाठी चार्जिंग पायाभूत सुविधा आणि सरकारी प्रोत्साहने आवश्यक आहेत.

**४) नारायण आणि चावला (२०१७) :** यांनी भारतातील हरित वाहतूक स्वीकारण्यामागील सामाजिक व आर्थिक घटकांचा अभ्यास केला आहे. त्यांच्या संशोधनातून असे दिसून येते की इंधन दर, पर्यावरणीय जाणीव आणि सरकारी धोरणे हे घटक हरित वाहतूक स्वीकारण्यावर प्रभाव टाकतात.

**५) नीती आयोग आणि भारतीय संशोधकांच्या संयुक्त अभ्यासात (२०१८) :** भारतातील इलेक्ट्रिक गतिशीलतेचा रोडमॅप मांडण्यात आला आहे. या अहवालानुसार, इलेक्ट्रिक वाहने, सार्वजनिक वाहतूक सुधारणा आणि नवीकरणीय ऊर्जेचा वापर हे शाश्वत वाहतूक व्यवस्थेचे प्रमुख आधारस्तंभ आहेत.

थोडक्यात, हरित वाहतूक ही भारताच्या शाश्वत विकास धोरणासाठी अत्यंत महत्त्वाची आहे असे भारतीय संशोधकांच्या अभ्यासातून स्पष्ट होते, धोरणात्मक

पाठबळ, तांत्रिक नवकल्पना आणि जनसहभाग यांच्या माध्यमातूनच ती यशस्वी होऊ शकते.

**विषयाची निवड:**

भारतासारख्या विकसनशील देशात वेगाने वाढत्या लोकसंख्येमुळे शहरीकरणात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. त्यामुळे खाजगी वाहनांची संख्या वाढीबरोबर प्रदूषण, इंधन आयात खर्च आणि आरोग्य समस्या वाढत आहेत. त्यामुळे भारतात इलेक्ट्रिक वाहने, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, सायकलिंग, पादचारी सुविधा आणि स्वच्छ इंधनांचा वापर यांसारख्या हरित वाहतूक पर्यायांचा स्वीकार करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. भारत सरकारने हरित वाहनांसाठी विविध योजना, तसेच विविध राज्यांची इलेक्ट्रिक वाहन धोरणे जाहीर केली आहेत. या धोरणांचा प्रत्यक्ष अंमलबजावणीवरील परिणाम, सामाजिक-आर्थिक स्वीकार्यता आणि पर्यावरणीय फायदे यांचे सखोल शास्त्रीय विश्लेषण करण्याची आवश्यकता आहे. हीच गरज लक्षात घेऊन 'शाश्वत विकासासाठी हरित वाहतूक' हा संशोधन विषय निवडण्यात आला आहे.

**उद्दिष्टे :**

१) शाश्वत वाहतूक संकल्पनेचा अभ्यास करणे.

२) हरित वाहतुकीच्या महत्त्वाचा अभ्यास करणे.

३) हरित वाहनांची सद्य परिस्थिती आणि आव्हाने यांचे निरीक्षण करणे.

४) उपाययोजनां सुचविणे.

**गृहीतके:**

१) हरित वाहतुकीमुळे जीवाश्म इंधनांवरील अवलंबित्व कमी होऊन ऊर्जा सुरक्षिततेला चालना मिळते.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्म्क संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. हे सांशोधनपूर्णपणे दुय्यम स्त्रोतांवर आधारित असून, यामध्ये विविध तज्ञ लेखकाचे पूर्वप्रकाशित संशोधन, सरकारी धोरणे, सरकारी योजना, सरकारी अहवाल, विशेषांक, दैनिके, वृत्तपत्र यामध्ये प्रकाशित लेख याचा आधार घेण्यात आला आहे.

**शाश्वत वाहतुकीची आवश्यकता :**

देशाचा अधिक वेगाने घडून येणारा आर्थिक विकास हा विशेषतः कृषिक्षेत्राकडून सेवाक्षेत्राकडे वळलेला दिसून येत आहे. त्यामुळे देशांमध्ये शहरांचा विस्तार हा अधिक गतीने वाढत आहेत. या वाढीचा परिणाम म्हणून देशात मागील दोन दशकात वाहनांची संख्या प्रचंड वाढली आहे.[४] देशातील वाहतूक क्षेत्र हे एक पायाभूत क्षेत्र आहे. भारतातील वाहतूक क्षेत्र हे मोठ्या प्रमाणावर अंतर्गत ज्वलन इंजिनवर आधारित आहे आणि वाहनांना चालना देण्यासाठी ऊर्जेचा स्रोत म्हणून जीवाश्म इंधनावर अवलंबून आहे. या वाहनांमुळे उत्सर्जित होणाऱ्या विषारी वायूमुळे पर्यावरण आणि मानवी आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. त्याचबरोबर देशात कच्च्या तेलाचे साठे कमी प्रमाणात उपलब्ध आहेत, त्यामुळे देशाची कच्च्या तेलाची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी विदेशातून त्याची मोठ्या प्रमाणावर आयात केली जाते.[५] तसेच वर्तमान परिस्थितीत आखाती देशांनी कच्च्या तेलाचे उत्पादन कमी केल्याने तेलाच्या वाढत्या मागणीमुळे त्याच्या किमतीत सतत वाढ झालेली दिसून येते व त्याचा परिणाम कच्च्या तेलाच्या आयातक देशाच्या उपभोक्त्यावर होतो. जीवाश्म इंधनाच्या जलद वापरामुळे या संसाधनांचा जलद ऱ्हास होत आहे आणि त्यामुळे वाढत्या मागणीमुळे त्यांच्या किमती सतत वाढताना दिसत आहे. त्याचा परिणाम सतत देशाच्या विदेशी गंगाजळीवर त्याचा भार वाढत असताना दिसून येत आहे. त्यामुळे भारतात वाहतूक तंत्रज्ञानामध्ये पारंपारिक जीवाश्म इंधनांचा पर्याय शोधणे आवश्यक झाले आहे. पारंपारिक ऊर्जा संसाधनाचा पर्याय हे हरित पर्यावरणाची देशाची गरज पूर्ण करण्यासाठी हायब्रीड

वाहन, इलेक्ट्रिक वाहन, सौर उर्जा रूपांतरीत बॅटरी चालीत वाहन असे तंत्रज्ञानाच्या दृष्टीने एक नावीन्यपूर्ण असा उपाय समोर येत आहेत. देशात हरित वाहने स्वीकारण्यातील आव्हाने त्याचे उपाय आणि त्यांना रस्त्यावर प्रोत्साहन देण्यासाठी भारत सरकारने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**हरित वाहतूक संकल्पना:**

हरित परिवहन ही संकल्पना शाश्वत विकासाच्या संकल्पनेसह प्रस्तावित असून ही वाहतूक व्यवस्था वाहनाभिमुख ते लोकाभिमुख संक्रमण आहे.[२] यामध्ये खाजगी मोटार गाड्यांचा वापर कमी करणे तसेच सायकल, पायी चालणे, सार्वजनिक वाहतूक आणि स्वच्छ ऊर्जा वाहनांचा वापर वाढविणे इत्यादी सुचवले आहे. वाहतुकीच्या साधनांच्या दृष्टिकोनातून, हरित वाहतूक प्रणालीमध्ये चालणे, सायकल, नियमित सार्वजनिक वाहतूक आणि रेल्वे वाहतूक यांचा समावेश होतो.[६] हरित वाहनांमध्ये दुहेरी उर्जा वाहन, नैसर्गिक वायू वाहन, इलेक्ट्रिक वाहन, हायड्रोजन ऊर्जावाहन आणि सौर उर्जा वाहने यासारख्या कमी प्रदुषणाच्या वाहनांचा समावेश होतो. इलेक्ट्रिक, हायब्रीड आणि हायड्रोजन आधारित वाहने ही ऊर्जा-कार्यक्षम व कमी उत्सर्जन करणारी असल्याने हरित वाहतुकीचा महत्त्वाचा घटक आहेत.[७] हरित वाहतूक व्यवस्था ही एक वाहतुकीची नवीन पद्धती असून, यामध्ये वाहतूक तंत्रे आणि विकासाचा अभ्यास करण्यास मदत होते. तसेच या वाहतुकीमुळे सामाजिक, आर्थिक, पर्यावरणीय आणि हवामान समस्या यांचा अभ्यास करून त्यांचे मूल्यांकन करण्यास मदत होते. हरित वाहतूक म्हणजे अशी वाहतूक व्यवस्था जी कमी किंवा शून्य-उत्सर्जन करते, ती अधिक ऊर्जा-कार्यक्षम असते आणि पर्यावरणास परवडणारी वाहतूक आहे. यामध्ये इलेक्ट्रिक आणि पर्यायी-इंधन तसेच घरगुती इंधन यांचा समावेश होतो. हरित वाहतूक ही कमी होत चाललेल्या नैसर्गिक संसाधनांचा म्हणजेच पारंपारिक इंधनाचा वापर करत नाही किंवा त्यावर अवलंबून नसून, त्याऐवजी ते मर्यादित साठे असलेल्या जीवाश्म इंधनांऐवजी अक्षय किंवा पुनर्निर्मित ऊर्जेवर अवलंबून असते. या कारणास्तव पर्यावरणावर त्याचा कमी किंवा नकारात्मक प्रभाव असल्याचे म्हटले जाते. कारण ही वाहतूक पद्धती टिकाऊ ऊर्जास्त्रोतांचा वापर करते.

अशा प्रकारे हरित वाहतूक संकल्पना केवळ वाहतूक व्यवस्थेतील बदल नाही, तर हा एक व्यापक दृष्टिकोन आहे. यातून आपण अशी भविष्यातील वाहतूक प्रणाली निर्माण करू शकतो, ज्यामुळे पर्यावरणाचा समतोल राखल्या जाईल, सर्व नागरिकांना न्याय मिळेल आणि आर्थिक प्रगतीला हातभार लावेल. या दृष्टिकोनाचा स्वीकार केल्याने आपण आर्थिक समावेशक, सुरक्षित आणि लवचिक भविष्य निर्माण करू शकतो.

**हरित वाहतुकीचे महत्व :**

भारताच्या रस्ते वाहतूक क्षेत्रात वाढलेला प्रवास आणि वाढत्या मोटारीकरणामुळे ऊर्जेच्या वापरात लक्षणीय वाढ झाली आहे, त्यामुळे कार्बन उत्सर्जनातही मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येते. वर्ष २०२१ पर्यंत, देशाच्या एकूण ऊर्जा वापरापैकी १४ टक्के वाटा रस्ते वाहतूक क्षेत्राचा होता, तर ऊर्जा-संबंधित कार्बन उत्सर्जनातही रस्ता क्षेत्राचे योगदान १४ टक्के एवढे होते.[८] वाढत्या लोकसंख्येमुळे वाहनांचा विस्तार होत असताना कार्बन उत्सर्जनात अधिक जलद वाढ होऊ शकते. वाहनांच्या अंतर्गत ज्वलन इंजिनच्या वाढत्या मागणीने ऊर्जा वापर आणि उत्सर्जनात लक्षणीय वाढ झाली आहे. वर्ष २००० पासून ऊर्जेचा वापर आणि त्याच्या उत्सर्जनात दुपटीने झाली आहे. याशिवाय, जगभरात भारताच्या रस्ते मालवाहतुकीकरिता सर्वाधिक जीवाश्म इंधनाची मागणी आहे. मालवाहतुकीतसुद्धा भरीव वाढ झाली असून, ती १९९० च्या दशकापासून दहा पटींनी वाढली आहे, त्यामुळे वाहतूक क्षेत्रामध्ये जीवाश्म इंधन वापर अधिक वाढणे अपेक्षित आहे. ऊर्जेच्या बाबतीत

९५ टक्के गरजांसाठी रस्ता वाहतूक पेट्रोल आणि डिझेलवर अवलंबून आहे, त्यामुळे भारतातील रस्ते वाहतूक हे सर्वात मोठे तेल ग्राहक क्षेत्र म्हणून ओळखले जाते. वर्ष २०२१ मध्ये तेलाच्या एकूण वापरातील ४४ टक्के वाटा रस्ते वाहतुकीचा होता, तर नैसर्गिक वायू, वीज आणि जैवइंधन यांसारखी पर्यायी इंधने परिवहन पद्धतीत केवळ किरकोळ भूमिका बजावत आहे. वर्ष २००० पासून, रस्ते वाहतुकीतून ऊर्जेची मागणी आणि कार्बन उत्सर्जन तिपटीने वाढले आहे. मालवाहू ट्रक आणि प्रवासी कार या प्रत्येकाचा या वाढीत सुमारे एक तृतीयांश वाटा आहे. २०२१ मध्ये, ट्रकचा ३८ टक्के इतका इंधनाचा वापर आणि उत्सर्जन असा वाटा होता, तर कारचा वाटा २५ टक्के होता. एकूण वाहनांच्या साठ्यात दुचाकी आणि तीनचाकी वाहनांचा वाटा ८० टक्के असला, तरी ऊर्जेची मागणी आणि उत्सर्जन यामध्ये त्यांचे योगदान केवळ २० टक्के होते. परंतु २०१० पासून हा वाटा सातत्याने वाढला आहे.[९]

अशा प्रकारे वरील माहितीच्या आधारे लक्षात येते की, भारताच्या रस्ते वाहतूक क्षेत्रात ऊर्जा वापर आणि कार्बन उत्सर्जन अत्यंत वेगाने वाढत असून, हे क्षेत्र देशातील सर्वात मोठे तेल-ग्राहक म्हणून स्थिर झाले आहे. लोकसंख्या, वाहनसंख्या आणि मालवाहतुकीच्या वाढीमुळे जीवाश्म इंधनांवरील अवलंबित्व आणखी वाढण्याची शक्यता आहे. ट्रक व प्रवासी कार हे उत्सर्जन वाढीचे प्रमुख कारण असून, पर्यायी इंधनांचा वापर अत्यल्प असल्याने हरित वाहतूक धोरणांची आवश्यकता वाढली आहे. सरकारद्वारे वाहतूक क्षेत्रात तातडीच्या आणि वेगवेगळ्या उपाययोजना केल्याशिवाय जागतिक तापमान रोखण्याची कोणतीही परिस्थिती शक्य नाही. हे असे क्षेत्र आहे की ज्याकडे हवामानाच्या समीकरणात अनेकदा दुर्लक्ष केले जाते. वाहतूक क्षेत्र सामाजिक, आर्थिक, पर्यावरणीय सर्वच घटकांना प्रभावित करते. त्यामुळे पारंपरिक इंधन दहनामुळे निर्माण होणाऱ्या समस्या हरित वाहतुकीमुळे कमी केले जाऊ शकते आणि इंधन पद्धतीत सुधारणा करून अक्षय ऊर्जा इंधन, किंवा इलेक्ट्रिक वाहनांचा उपयोग वाढविल्यास ते अधिक पर्यावरणपूरक ठरेल. वाहतुकीतून होणारे उत्सर्जन रोखण्यासाठी आवश्यक साधने देशात अस्तित्वात आहेत. त्यापैकी काही उदाहरणे जसे की वर्धित सार्वजनिक वाहतूक पर्याय, सक्रिय गतिशीलता, शून्य-उत्सर्जन वाहने आणि हरित इंधन अनेक देशांमध्ये लागू केले जात आहेत. वाहतुकीचा अभ्यास करता हरित वाहतूक ही खालील कारणासाठी महत्त्वाची असे पूर्वसंशोधनांतून प्राप्त झाले आहे.

१) वाहतूक क्षेत्र २०% जागतिक कार्बन उत्सर्जनासाठी जबाबदार आहे, तरीही हवामान बदलाचा सामना करताना त्याकडे दुर्लक्ष केले जाते.[१०]

२) हवामान बदलातील संतुलनासाठी स्मार्ट वाहतूक पर्याय विकसित जगात केंद्रित आहेत. कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये उत्सर्जनात वाढ होत आहे.[११]

३) जागतिक तापमानाचा परिणाम कमी करण्यासाठी हरित वाहतूक व्यवस्थेला प्रोत्साहन देण्यासाठी जागतिक बँकेने भागधारकांना एकत्र काम करण्याचे आवाहन केले आहे.[१२]

**भारतातील इलेक्ट्रिक वाहनांची वर्तमान परिस्थिती :**

तक्ता क्र. १ मध्ये दोन चाकी वाहन, तीन चाकी वाहन, चारचाकी वाहन, माल वाहतूक वाहन आणि सार्वजनिक वाहन सेवा यांचे वर्ष २०१८ ते वर्ष २०२३ पर्यंत एकूण वाहनांची संख्या, त्यापैकी इलेक्ट्रिक वाहनांची एकूण संख्या आणि त्याची टक्केवारी दिली आहे. आकडेवारीनुसार २ चाकी वाहनांची वर्ष २०१८ मध्ये एकूण संख्या १,९५,७६,२३५ असून त्यापैकी १७,०६७ EV वाहने आहेत.

EV वाहनांची एकूण वाहनाशी टक्केवारी ०.०९ %

**तक्ता क्र. १ : ई-वाहन पोर्टलनुसार विकल्या गेलेल्या इलेक्ट्रिक वाहनांची श्रेणीवार माहिती (२०१८ ते २०२३)**

| अ. क्र. | वाहन प्रकार | दोन चाकी | तीन चाकी | चार चाकी | माल वाहतुक | सार्वजनीक सेवा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०१८ एकूण | १९५७६२३५ | ७६४८०६ | २९९९२८८ | ८८६०४७ | ७९३१७ |
| २ | २०१८ इव्ही | १७०६७ | ११०१३३ | १०४७ | ६५८ | ५० |
| ३ | २०१८ % | ०.०९ | १४.४ | ०.०३ | ०.०७ | ०.०६ |
| ४ | २०१९ एकूण | १८६४४७०० | ७६५८६७ | २८२२७८२ | ७९९६६१ | ८१०२२ |
| ५ | २०१९ इव्ही | ३०३८९ | १३३४८९ | ९६२ | ५४ | ५०८ |
| ६ | २०१९% | ०.१६ | १७.४३ | ०.०३ | ०.०१ | ०.६३ |
| ७ | २०२० एकूण | १४३०५१२९ | ४००८९३ | २३९६४२८ | ५०३३५८ | ४०३२८ |
| ८ | २०२० इव्ही | २९११३ | ९०३८५ | ३२०७ | १५ | ८८ |
| ९ | २०२० % | ०.२ | २२.५५ | ०.१३ | ० | ०.२२ |
| १० | २०२१ एकूण | १३९२६२१७ | ३९०८२० | २९४५३४० | ६०२८०५ | १५४३४ |
| ११ | २०२१ इव्ही | १५६२४३ | १५८१२९ | १२२५९ | १११८ | ११७७ |
| १२ | २०२१% | १.१२ | ४०.४६ | ०.४२ | ०.१९ | ७.६३ |
| १३ | २०२२ एकूण | १५५९२११८ | ६७७०३४ | ३३४६९७३ | ८०४४०९ | ४५४४८ |
| १४ | २०२२ इव्ही | ६३११८१ | ३५०२४७ | ३३२०५ | ६५३ | १९७२ |
| १५ | २०२२ % | ४.०५ | ५१.७३ | ०.९९ | ०.०८ | ४.३४ |
| १६ | २०२३ एकूण | ९२७६३३७ | ५७२६५४ | २०२०४५९ | ४९०९२० | ४७०५८ |
| १७ | २०२३ इव्ही | ४८९६३७ | ३००११४ | ४०१८६ | १५१२ | ९८५ |
| १८ | २०२३ % | ५.२८ | ५२.४१ | १.९९ | ०.३१ | २.०९ |

स्त्रोत : https://www.data.gov.in/

एवढी आहे. वर्ष २०१९ ते २०२३ पर्यंत EVचे एकूण २ चाकी वाहनाशी असलेले प्रमाण वाढले असून ते अनुक्रमे ०.१६ %, ०.२%,१.१२%,४.०५%, ५.२८% असे आहे. ३ चाकी वाहनांमध्ये २०१८ मध्ये ७,६४,८०६ एकूण वाहनांची नोंदणी झाली असून, त्यापैकी इलेक्ट्रिक वाहनांची संख्या १,१०,१३३ म्हणजेच १४.४ % आहे. वर्ष २०१९ ते २०२३ पर्यंत EVचे एकूण ३ चाकी वाहनाशी असलेले प्रमाण अनुक्रमे १७.४३%,२२.५५%, ४०.४६%, ५१.७३%, ५२.४१% असे आहे. ४ चाकी वाहनांमध्ये २०१८ मध्ये एकूण नोंदणीकृत वाहनाची संख्या २९,९९,२८८ असून त्यापैकी १०४७ EV वाहने म्हणजेच ०.३% होती. वर्ष २०१९ ते २०२३ पर्यंत EVचे एकूण ४ चाकी वाहनाशी असलेले प्रमाण ०.०३%, ०.१३%, ०.४२%, ०.९९%, १.९९% असे आहे. वरील आकडेवारीनुसार एकूण मालवाहतूक वाहनांमध्ये इलेक्ट्रिक वाहनांची नोंदणी अत्यंत कमी म्हणजेच वर्ष २०१८ मध्ये एकूण नोंदणीकृत वाहने ८,८६,०४७ असून त्यापैकी इलेक्ट्रिक वाहने ६५८ म्हणजेच ०.०७ % एवढे आहे. वर्ष २०१९ ते २०२३ पर्यंत EVचे एकूण मालवाहतूक वाहनाशी असलेले प्रमाण अनुक्रमे ०.०१%, ०%, ०.१९%, ०.०८%, ०.३१% असे अत्यंत कमी आहे. तसेच सार्वजनिक वाहन सेवा यांची वर्ष २०१८ ते २०२३ पर्यंत एकूण वाहनाशी असलेले इलेक्ट्रिक वाहनांची टक्केवारी अनुक्रमे ०.०६%, ०.६३%, ०.२२%, ७.६३%, ४.३४%, २.०९% असे आहे.

**तक्ता क्र. २ : ई-वाहन पोर्टलनुसार भारतातील नोंदणीकृत इलेक्ट्रिक वाहनांची संख्या**

| अ.क्र. | राज्य किंवा केंद्रशासित प्रदेश | इलेक्ट्रिकल वाहन संख्या |
|---|---|---|
| १ | अंदमान व निकोबार | १८२ |
| २ | आंध्रप्रदेश | ५१३२२ |
| ३ | अरुणाचल प्रदेश | २४ |
| ४ | आसाम | ९४९२९ |
| ५ | बिहार | १२८८८५ |
| ६ | चंदिगड | ५५३३ |
| ७ | छत्तीसगड | ४०५१६ |
| ८ | दिल्ली | २०३२६३ |
| ९ | गोवा | ८७१० |
| १० | गुजरात | ९९२३६ |
| ११ | हरियाना | ५६२४३ |
| १२ | हिमाचल प्रदेश | १८७७ |
| १३ | जम्मू व काश्मिर | ७०८० |
| १४ | झारखंड | २८३९५ |
| १५ | कर्नाटका | १८३५३६ |
| १६ | केरळ | ६५५४५ |
| १७ | लडाक | ४७ |
| १८ | मध्य प्रदेश | ४२९५७ |
| १९ | महाराष्ट्र | २२६१३४ |
| २० | मणिपूर | १०५२ |
| २१ | मेघालय | ८३ |
| २२ | मिझोरम | ७६ |
| २३ | नागालँड | ६० |
| २४ | ओडिसा | ४५५६२ |
| २५ | पुंडुचरी | ३३७६ |
| २६ | पंजाब | २५५९७ |
| २७ | राजस्थान | १४३२७३ |
| २८ | सिक्कीम | २१ |
| २९ | तमिळ नाडू | १२९१५३ |
| ३० | त्रिपुरा | १२२२९ |
| ३१ | दादर आणि नगर हवेली, दिव आणि दमन | ३०३ |
| ३२ | उत्तर प्रदेश | ४६५४३२ |
| ३३ | उत्तराखंड | ४२३०८ |
| ३४ | पश्चिम बंगाल | ५७५१२ |
| | एकूण | २१७०४५१ |

स्त्रोत : https://www.data.gov.in/

तक्ता क्र. १च्या अभ्यासावरून असे आढळून येते की, देशात इलेक्ट्रिक वाहनांच्या बाबतीत तीन चाकी वाहनांमध्ये लक्षणीय वाढ झाली असून, २ चाकी वाहने, ४ चाकी वाहने, मालवाहतूक आणि सार्वजनिक परिवहन वाहन पद्धतीमध्ये ही वाढ मंद आहे.

तक्ता क्र. २ मध्ये भारतातील नोंदणीकृत इलेक्ट्रिक वाहनांची राज्य/केंद्रशासित प्रदेशानुसार ०६/३/२०२३ रोजीच्या नोंदणीनुसार आकडेवारी दिलेली आहे. त्यानुसार सर्वाधिक इलेक्ट्रिक वाहनांची नोंदणी उत्तर प्रदेश राज्यात झाली असून ती ४,६५,४३२ एवढी आहे तर त्यानंतर अनुक्रमे दुसरा महाराष्ट्र (२,२६,१३४), तिसरा दिल्ली (२,०३,२६३), चौथा कर्नाटक (१,८३,५३६) आणि पाचवा राजस्थान (१,४३,२७३) याचा क्रमांक लागतो. तसेच सर्वात कमी इलेक्ट्रिक वाहनांची नोंदणी सिक्किम राज्यात झाली असून ती २१ एवढी आहे, त्यानंतर अरुणाचल प्रदेश(२४), लद्दाख (४७), नागालँड (६०), मिझोरम (७६), मेघालय (८३) या राज्यात आहे.

**भारतात इलेक्ट्रिक गतिशीलतेच्या मार्गावरील आव्हाने व उपाययोजना :**

भारत हा जागतिक स्तरावर तिसरा सर्वात मोठा ऑटोमोबाईल बाजार असून २-चाकी आणि ३-चाकी वाहन क्षेत्रात चीनसोबत स्पर्धा करत असताना दिसत आहे. देशाने ई-जुळवणूकतेला गती देण्यासाठी अनेक धोरणात्मक पावले उचलली आहेत; परंतु त्याच्या व्यापक स्वीकाराच्या मार्गात काही महत्त्वपूर्ण आव्हानेसुद्धा आहेत. या आव्हानांसह त्यावरील उपाययोजना पुढीलप्रमाणे स्पष्ट केले आहे.

**१) इलेक्ट्रिक वाहनांच्या प्रगतीतील मर्यादा:**

देशात सरकारद्वारे सकारात्मक धोरणे आणि उपक्रम असूनही इलेक्ट्रिक वाहनांची प्रगती अपेक्षेपेक्षा मंद आहे.

विशेषतः ग्रामीण भारतात चार्जिंग स्टेशनांची संख्या अत्यल्प आहे ही एक मूलभूत अडचण आहे.

त्यामुळे त्यावर उपाययोजना म्हणून भारत सरकारने २०३० पर्यंत नऊ प्रमुख शहरांमध्ये ४६,३९७ ईव्ही चार्जिंग स्टेशन उभारण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. याशिवाय, पीएसयू आणि खाजगी कंपन्यांच्या संयुक्त गुंतवणुकीमुळे राष्ट्रीय चार्जिंग नेटवर्कचा विस्तार वेगाने होत आहे. ग्रामीण भागात सौर-ऊर्जेवर आधारित चार्जिंग केंद्रे उभारणे हा शाश्वत उपाय ठरू शकतो.

**२) पारंपरिक वाहनांच्या तुलनेत ईव्हीची जास्त प्रारंभिक किंमत :**

EV च्या प्रमुख आव्हानांमध्ये इलेक्ट्रिक वाहनांची किंमत प्रामुख्याने बॅटरीच्या उच्च किमतीमुळे जास्त आहे. त्यामुळे सर्वसामान्य ग्राहकांना ईव्ही खरेदी करणे कठीण जाते. त्यासाठी सरकारद्वारे विविध योजनाच्या माध्यमातून प्रयत्न केले जात आहेत. PLI योजना बॅटरी उत्पादनाचा खर्च कमी करण्यासाठी महत्त्वाची ठरत आहे. FAME-I आणि FAME-II अंतर्गत सबसिडी, करसवलती आणि प्रोत्साहन दिल्याने ईव्हीची किंमत कमी होत आहे. नावीन्यपूर्ण वित्तीय मॉडेल, जसे की बॅटरी लीजिंग, बॅटरी-स्वॅपिंग, कमी व्याजदरावरील ईव्ही कर्ज उपलब्ध होत आहे.

**३) ग्राहक जागरूकता, बॅटरी सुरक्षितता आणि बॅटरी आयातीवरील अवलंबित्व:**

देशात ईव्हीचे फायदे, वाहनाचे ऑपरेटिंग खर्च, चार्जिंग आवश्यकता याबाबत लोकांमध्ये अपुरी माहिती आहे. तसेच देशातील बॅटरी उत्पादन कमी असल्यामुळे आयातीत बॅटऱ्यांवर अवलंबित्व वाढत आहे, त्याचा खर्च आणि पुरवठा साखळीवर परिणाम होतो. त्याचबरोबर थर्मल रनअवे, बॅटरीमध्ये आग लागण्याच्या घटना या सुरक्षिततेच्या दृष्टीने EV अधिक चिंताजनक आहेत.

त्यावर उपाययोजना म्हणून भारत सरकारने इलेक्ट्रिक मोबिलिटी प्रमोशन स्कीम २०२४ (रु ५०० कोटी) ग्राहक जागरूकता वाढवण्यासाठी आणि दुचाकींची

विक्री प्रोत्साहित करण्यासाठी सुरू केली आहे. तसेच भारतात राष्ट्रीय बॅटरी निर्माण नेटवर्क मजबूत करणे, लिथियम-आयन आणि पर्यायी बॅटरी तंत्रज्ञानाचा विकास करणे अत्यावश्यक आहे. BIS ने २०२४ मध्ये IS १८५९० आणि IS १८६०६ ही कडक सुरक्षा मानके जारी केली असून, ईव्ही आणि चार्जिंग उपकरणे अधिक सुरक्षित बनवण्यासाठी हे महत्त्वाचे पाऊल आहे.

**४) स्मार्ट ग्रिड उपाय, तांत्रिक नावीन्य आणि अक्षय ऊर्जा समाकलन:**

देशात ईव्हींची संख्या वाढल्यास विजेच्या मागणीत वाढ होईल आणि विद्यमान ग्रिडवर दबाव येऊ शकतो. ग्रिड स्थिरता, लोड मॅनेजमेंट आणि नूतनीकरणक्षम ऊर्जेच्या समाकलनाशी संबंधित तांत्रिक ह्या अडचणी आहेत.

त्यासाठी उपाययोजना म्हणून स्मार्ट ग्रिड तंत्रज्ञान, AI आधारित लोड व्यवस्थापन, V2G (Vehicle-to-Grid) प्रणाली भविष्यातील गरजा पूर्ण करण्यासाठी उपयुक्त ठरत आहेत. त्याचबरोबर सौर आणि पवन उर्जेचे मोठ्या प्रमाणावर ग्रिडमध्ये समाकलन केल्यास वाहतूक क्षेत्रातील उत्सर्जन कमी करण्यास मदत होईल. तसेच सरकारने संशोधन आणि विकासासाठी अनुदाने, करसवलती आणि सबसिडी उपलब्ध करून द्याव्यात.

**निष्कर्ष:**

भारतामध्ये ई-गतिशीलतेचा स्वीकार वाढत असला तरी बॅटरी चार्जिंग पायाभूत सुविधा, वाहनांची उच्च प्रारंभिक किंमत, ग्राहक जागरूकतेचा अभाव आणि बॅटरी सुरक्षेची आव्हाने अजूनही कायम आहेत. योग्य धोरणे, तांत्रिक नवोन्मेष, देशांतर्गत उत्पादनाची वाढ आणि अक्षय ऊर्जा वापराचा विस्तार यांद्वारे भारत २०३० पर्यंत ईव्ही स्वीकृतीत मोठी झेप घेऊ शकतो. या उपाययोजनांनी भारत शाश्वत, स्वच्छ आणि आर्थिकदृष्ट्या किफायतशीर वाहतूक प्रणालीच्या दिशेने निर्णायक पाऊल उचलू शकतो.

अशाप्रकारे शाश्वत विकास हा वाहतूक पद्धतींमध्ये, तंत्रज्ञानात बदल म्हणजेच हरित वाहतूक पद्धतींच्या माध्यामातून साध्य करता येईल.

**अ) संदर्भ ग्रंथसूची :**

1. World Commission on Environment and Development. (1987). Our common future. Oxford University Press.
2. United Nations. (2016). Mobilizing Sustainable Transport for Development. United Nations.
3. Ministry of Road Transport and Highways. (2021). Annual Report 2020–21. Government of India.
4. (NITI Aayog, 2021; World Bank, 2020).
5. Ministry of Petroleum and Natural Gas. (2023). Basic statistics on Indian petroleum & natural gas 2022–23. Government of India.
6. World Bank. (2020). Decarbonizing Transport in India: Pathways and Policies. The World Bank.
7. International Energy Agency. (2021). Global EV Outlook 2021: Accelerating Ambitions Despite the Pandemic. IEA.
8. Council on Energy, Environment and Water. (2024). How will Fuel Demand Grow for India's Road Transport Sector?
9. Observatory of Road Transport Energy in India / ORF. (2024). Energy transition in India's transport sector: Current policies, key challenges, and potential pathways. ORF
10. World Bank. (n.d.). Transport Overview. Retrieved from "Domestic and international transport already contribute 20% of global GHG emissions."
11. World Bank. (2021, November 7). The Global Facility to Decarbonize Transport (GFDT) Concept Note (Multi-donor trust fund). Retrieved from "Transport sector emissions currently comprise approximately 24 percent of total energy-related GHG emissions… almost all the

growth in global transport emissions since 2000 has occurred in low and middle-income countries."
12. World Bank. (2020, December 15). Transport Decarbonisation: How do we make the economics work? Retrieved from "A quarter of global energy-related greenhouse gas emissions come from transport … this could grow to a third by 2050 if nothing is done."

**ब) संदर्भ ग्रंथ सूची :**

1. Badami, M. G. (2005). Transport and urban air pollution in India.Environmental Management, 36(2), 195–204. https://doi.org/10.1007/s00267-004-4063-7
2. Khan, I. (2023, April 26). How smart mobility solution is paving the way for sustainable transportation in Indian cities. The Times of India.
3. Mohan, D., & Tiwari, G. (1999). Sustainable transport systems: Linkages between environmental issues, public transport, non-motorized transport and safety.Economic and Political Weekly, 34(25), 1589–1596.
4. Narayanan, S., & Chawla, R. (2017). Determinants of sustainable transportation in India. Journal of Transport Geography, 63, 232–241.
5. NITI Aayog. (2018). National electric mobility mission and EV roadmap for India. Government of India.
6. NITI Aayog. (2024). Electric Vehicles in India: The Road Ahead. Retrieved November 12, 2025
7. Olivier, J. G. J., Janssens-Maenhout, G., Muntean, M., & Peters, J. A. H. W. (2012). Trends in global CO2 emissions: 2012 report. PBL Netherlands Environmental Assessment Agency & European Commission, Joint Research Centre.
8. Press Information Bureau. (2024, February 6). 12,146 public EV charging stations operational across the country [Press release]. Ministry of Heavy Industries, Government of India.
9. Press Information Bureau. (2024, February 11). PM E-DRIVE scheme for electric vehicle adoption [Press release]. Ministry of Heavy Industries, Government of India.
10. Press Information Bureau. (2024, September 29). Government launches multiple initiatives to promote indigenous and comprehensive electric vehicle ecosystem in India [Press release]. Ministry of Heavy Industries, Government of India.
11. Singh, S. K. (2015). Electric vehicles and sustainable transport in India.International Journal of Energy Economics and Policy, 5(2), 411–419.
12. Singh, P., & Mercer, A. (2023). Assessing alternative fuel options for sustainable transportation. Institute for Sustainable Energy Studies, Eastern Technological University.

१३. इलेक्ट्रिक वाहन उद्योग अहवाल, नोव्हेंबर २०२४

१४. योजना नोव्हेंबर २०१५

◆

**निवेदन : अर्थसंवाद**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्या आजीव सदस्यांना अंक मिळत नसेल किंवा पत्त्यात बदल झाला असेल तर त्यांनी प्रमुख संपादक, अर्थसंवाद यांच्याकडे तशा आशयाचे पत्र पाठवून त्या पत्रात आपला नवीन पत्ता लिहून पाठवावा; मात्र या पत्रात आजीव सदस्य क्रमांकाचा उल्लेख असणे अत्यंत गरजेचे आहे.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# विकसित भारत @ २०४७ साठी आर्थिक सुधारणा

**राजकुमार आण्णासो वाईंगडे** †

**प्रास्ताविक**

विकसित भारत @ २०४७ हा एक ११ डिसेंबर २०२३ रोजी जाहीर करण्यात आलेला महत्त्वाकांक्षी उपक्रम असून ज्याद्वारे भारत सरकारमार्फत भारताला त्याच्या स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षांमध्ये विकसित राष्ट्र बनविण्याचा संकल्प सोडण्यात आलेला आहे.

सध्या भारतीय अर्थव्यवस्था ही जगातील सर्वात वेगाने विकास करणारी अर्थव्यवस्था म्हणून पुढे आलेली असली, तरी २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनण्याची महत्त्वाकांक्षा सत्यामध्ये उतरविणे हे एक डोंगराएवढे आणि अवघड काम असणार आहे. याचे कारण विकसित राष्ट्र बनण्यासाठी आवश्यक असलेल्या गोष्टी साध्य करणे हे प्रचंड आव्हानात्मक आहे. सदर लेखांमध्ये भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनविण्याच्या प्रक्रियेमध्ये आवश्यक असणाऱ्या महत्त्वाच्या बाबींचा आणि त्या साध्य करण्याच्या दृष्टीने राबवाव्या लागणाऱ्या महत्त्वाच्या आर्थिक सुधारणांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. सदर लेखासाठी आवश्यक माहिती ही साधनसामग्रीचे दुय्यम स्त्रोत वापरून संकलित करण्यात आलेली आहे.

**विकसित राष्ट्र बनण्यासाठीच्या प्रमुख आवश्यकता**

**१. राष्ट्रीय आणि दरडोई उत्पन्नातील वाढ**

विकसित राष्ट्र बनण्यासाठी ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्यातील पहिली सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे २०४७ पर्यंत भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नामध्ये आणि दरडोई उत्पन्नामध्ये भरीव वाढ घडवून आणणे. जागतिक बँकेच्या सध्याच्या वर्गीकरणानुसार उच्च उत्पन्न गटातील देश म्हणजेच विकसित देश म्हणून नावलौकिक मिळवावयाचा झाल्यास आपले दरडोई उत्पन्न १३,९३५ डॉलरपेक्षा जास्त असणे गरजेचे आहे. सध्या भारताचे दरडोई उत्पन्न २४०० ते २५०० डॉलरच्या जवळपास आहे. सध्याचे दरडोई उत्पन्न आणि दरडोई उत्पन्नामध्ये घडून येणारी वार्षिक वाढ ५% गृहीत धरल्यास भारताचे दरडोई उत्पन्न २०४७ मध्ये ७००० डॉलरच्या जवळ पोहोचेल. दुसऱ्या परिस्थितीमध्ये सध्याच्या दरडोई उत्पन्नामध्ये दरवर्षी ८.५% इतकी वाढ गृहीत धरल्यास भारताचे दरडोई उत्पन्न २०४७ पर्यंत १४,००० डॉलरपेक्षा जास्त होईल. याचाच अर्थ, भारताला जागतिक बँकेच्या वर्गीकरणांमध्ये सुचविल्याप्रमाणे विकसित किंवा उच्च

† प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग (पदवी व पदव्यूत्तर), देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर
आजीव सभासद क्र. १२००, भ्रमणध्वनी - ९९२२२७३९६६, ईमेल - rajwaingade@gmail.com

उत्पन्न गटातील देश बनावयाचे झाल्यास येणाऱ्या २२ वर्षांच्या काळामध्ये दरडोई उत्पन्नातील वाढ ही सातत्याने ८.५% पेक्षा जास्त राहील, याची काळजी घ्यावी लागेल. सध्याचा राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा वेग लक्षात घेता तो दोन अंकी म्हणजेच १०% पेक्षा जास्त पर्यंत वाढवावा लागेल, तरच आपल्याला दरडोई उत्पन्नातील वाढ ही ८.५% पर्यंत नेता येईल. महत्त्वाचे म्हणजे दरडोई उत्पन्नातील ही वाढ २२ वर्षांच्या दीर्घ कालावधीमध्ये सातत्यपूर्ण राखणे हे सर्वात मोठे आव्हान असणार आहे.

**कोष्टक क्रमांक १ : विकसित भारतासाठी आवश्यक दरडोई उत्पन्न वाढ**

| वर्ष | दरडोई उत्पन्न (डॉलरमध्ये) (वार्षिक ५% वाढीची परिस्थिती गृहीत धरल्यास) | दरडोई उत्पन्न (डॉलरमध्ये) (वार्षिक ८.५ % वाढीची परिस्थिती गृहीत धरल्यास) |
|---|---|---|
| २०२५ | २४०० | २४०० |
| २०३० | ३०६३ | ३६०९ |
| २०३५ | ३९०९ | ५४२६ |
| २०४० | ४९८९ | ८१५९ |
| २०४५ | ६३६८ | १२२६९ |
| २०४६ | ६६८६ | १३३१२ |
| २०४७ | ७०२१ | १४४४३ |

स्त्रोत: लेखकामार्फत परिगणित

सध्याचा राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा वेग ७% च्या जवळपास आहे. त्याचबरोबर ज्या गोष्टीचा आपण अभिमान बाळगतो ती म्हणजे भारत सध्या जगातली चौथी मोठी अर्थव्यवस्था बनलेला आहे. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाने ४ ट्रिलियन डॉलरचा टप्पा ओलांडलेला आहे. जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था आणि सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था या आधारावर आपण २०४७ मध्ये जे विकसित राष्ट्र होण्याचे स्वप्न पाहतो आहे त्यातील वास्तविकता तपासून पाहिल्यास आपल्यासमोरील आव्हानांचा अंदाज येतो. जरी सध्या भारत हा जगातील चौथी सगळ्यात मोठी अर्थव्यवस्था बनलेला असला आणि नजीकच्या काळातच म्हणजे अगदी २०३० पर्यंत जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनणार असला तरी आपल्यापुढे ज्या पहिल्या आणि दुसऱ्या क्रमांकाच्या दोन अर्थव्यवस्था आहेत, त्या म्हणजे अमेरिका आणि चीन या दोन अर्थव्यवस्थांचा आकार म्हणजेच त्यांचे राष्ट्रीय उत्पन्न आणि आपले राष्ट्रीय उत्पन्न यात खूप तफावत आहे. अमेरिका जी पहिल्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे, जी जगाच्या एक चतुर्थांश आहे. तिचा आकार हा सध्या ३०.६२ ट्रिलियन डॉलर इतका मोठा म्हणजेच आपल्या ४ ट्रिलियन डॉलरपेक्षा साडेसात ते आठ पट मोठा आहे. तसेच जगातील दुसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था जी चीन बनलेला आहे, तिचा आकार हा १९.४ ट्रिलियन डॉलर इतका म्हणजे आपल्यापेक्षा पाचपट मोठा आहे. या दोन्ही अर्थव्यवस्थेशी बरोबरी करावयाची झाल्यास आपल्याला खूप मोठे अंतर कापावे लागणार आहे. २०४७ पर्यंत आपण आपली अर्थव्यवस्था २५ ते ३० ट्रिलियन डॉलरपर्यंत नेऊ शकलो, तरी या काळामध्ये पहिल्या दोन अर्थव्यवस्था याही आणखी प्रगत होत राहातील आणि त्याही आकाराने मोठ्या होतील. जरी या दोन्ही अर्थव्यवस्थांचा सध्याचा वृद्धिदर हा तुलनेने कमी असला

तरी, सध्याच्या त्यांच्या राष्ट्रीय उत्पन्नाचा आकारच मोठा असल्यामुळे येणाऱ्या काळामध्ये त्यांच्या राष्ट्रीय उत्पन्नामध्ये होणारी निरपेक्ष वाढ ही मोठी आणि आपल्यापेक्षा तुलनेने अधिक असणार आहे.

उदाहरणादाखल अमेरिकन अर्थव्यवस्थेचा सध्याचा वृद्धिदर वार्षिक २.१ % इतका गृहीत धरल्यास त्यांच्या राष्ट्रीय उत्पन्नामध्ये घडून येणारी निरपेक्ष वाढ ही ०.६३ ट्रिलियन डॉलर्स इतकी मोठी असेल, तर त्याचवेळी भारतीय अर्थव्यवस्थेचा सध्याचा वृद्धिदर ७% आहे असे गृहीत धरल्यास आपल्या राष्ट्रीय उत्पन्नामध्ये घडून येणारी निरपेक्ष वाढ ही ०.२५ ट्रिलियन डॉलर इतकी म्हणजेच अमेरिकेच्या तुलनेमध्ये निम्मी असेल. थोडक्यात, २०४७ पर्यंत जरी आपण आपल्या अर्थव्यवस्थेचा आकार ३० ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्यामध्ये यशस्वी झालो तरी अमेरिका आणि चीन या दोन्ही अर्थव्यवस्था आपल्यापेक्षा आकाराने मोठ्या राहातील. भारतीय अर्थव्यवस्था आणि अमेरिका आणि चीन या पहिल्या दोन क्रमांकाच्या अर्थव्यवस्था यांच्या राष्ट्रीय उत्पन्नातील तफावत ही सध्या जशी आहे तशीच ती भविष्यातही राहील, यात शंका नाही. पण त्याचबरोबर अमेरिकेचे दरडोई उत्पन्न जे सध्या ८९,५९९ डॉलर इतके आणि चीनचे दरडोई उत्पन्न जे सध्या १३,८०६ डॉलर इतके आहे तेही येणाऱ्या काळामध्ये वाढणारच आहे व त्यामुळे आपण जरी आपले दरडोई उत्पन्न १४,००० डॉलरपर्यंत नेण्यामध्ये यशस्वी झालो, तरी या प्रथम आणि दुसऱ्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्थांचे दरडोई उत्पन्नही भविष्यात वाढणारच आहे व त्यामुळे त्यांच्या आणि आपल्या दरडोई उत्पन्नातील तफावतही भविष्यातही दिसून येणार आहे.

**कोष्टक क्रमांक २ : भारत आणि विकसित अर्थव्यवस्था यांच्या आर्थिक परिस्थितीतील तफावत**

| अ. न. | देश | राष्ट्रीय उत्पन्न (ट्रिलियन) | राष्ट्रीय उत्पन्नातील वृद्धिदर (%) | दरडोई उत्पन्न | मानव विकास निर्देशांक क्रमवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | युनायटेड स्टेट्स | ३०.६२ | २.० % | ८९,५९९ | १७ |
| २ | चीन | १९.४ | ४.८ % | १३,८०६ | ७८ |
| ३ | जर्मनी | ५.०१ | ०.२ % | ५९,९२५ | ५ |
| ४ | जपान | ४.२८ | १.१ % | ३४,७१३ | २३ |
| ५ | भारत | ४.१३ | ६.६ % | २,८१८ | १३० |
| ६ | युनायटेड किंग्डम | ३.९६ | १.३ % | ५६,६६१ | १३ |
| ७ | फ्रान्स | ३.३६ | ०.७ % | ४८,९८२ | २६ |
| ८ | इटली | २.५४ | ०.५ % | ४३,१६१ | २९ |
| ९ | रशिया | २.५४ | ०.६ % | १७,४४६ | ६४ |
| १० | कॅनडा | २.२८ | १.२ % | ५४,९३५ | १६ |

स्त्रोत: IMF, World Economic Outlook (October 2025)

थोडक्यात जरी आपण आपले राष्ट्रीय उत्पन्न १०% ने आणि दरडोई उत्पन्न ८.५% ने वाढवू शकलो, तरी आपण २०४७ मध्ये फक्त विकसित देश म्हणवून घेण्यासाठी निश्चित करण्यात आलेला उंबरठा ओलांडून त्यांच्या गटामध्ये प्रवेश करू शकेन. परंतु सध्या जे देश विकसित देश म्हणून ओळखले जातात त्यांचे दरडोई

उत्पन्न आणि त्या देशातील नागरिकांची राहणीमान पातळी विचारात घेतली तर ती मात्र आपण गाठू शकणार नाही.

**२. बचत आणि भांडवल निर्मितीचा दर**

दोन अंकी म्हणजेच १०% पेक्षा जास्त विकासदर साध्य करावयाचा झाल्यास गुंतवणुकीचा दर ही पुरेशा प्रमाणात वाढवावा लागेल. आर्थिक वृद्धिदर निर्धारणाचे साधे सूत्र विचारात घेतल्यास गुंतवणुकीचा दर हा राष्ट्रीय उत्पन्नाच्या ४०% पर्यंत वाढवावा लागेल. सध्याचा स्थूल देशांतर्गत बचतीचा आणि भांडवल निर्मितीचा दर लक्षात घेतल्यास तो स्थूल देशांतर्गत उत्पन्नाच्या ३० ते ३१% च्या जवळपास घिरट्या घालताना दिसून येतो. हा दर असाच राहिल्यास १०% विकासाचा दर साध्य करणे शक्य होणार नाही. थोडक्यात, बचतीचा आणि गुंतवणुकीचा दर दहा टक्क्यांनी वाढविणे ही मोठी आव्हानाची बाब असणार आहे.

**कोष्टक क्रमांक ३ : स्थूल देशांतर्गत बचत आणि स्थूल भांडवल निर्मिती**

**(चालू किमतीस स्थूल देशांतर्गत उत्पादनाशी टक्केवारी )**

| वर्ष | स्थूल देशांतर्गत बचत (%) | स्थूल भांडवल निर्मिती (%) |
|---|---|---|
| २०१९-२० | २९.६ | ३०.४ |
| २०२०-२१ | २९.१ | २८.२ |
| २०२१-२२ | ३१.२ | ३२.४ |
| २०२२-२३ | ३०.७ | ३२.६ |
| २०२३-२४ (1st RE) | ३०.७ | ३१.४ |

स्त्रोत : Economic Survey, GOI 2025-26

**३. भारतातील परदेशी थेट गुंतवणूक**

विकासाचा दर उंचाविण्याच्या अनुषंगाने आवश्यक असणारी देशांतर्गत बचत आणि गुंतवणूक पुरेशी नसल्यास भारतासारख्या विकसनशील देशांच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरणारा एक पर्याय म्हणजे परदेशी थेट गुंतवणूक होय. या परदेशी गुंतवणुकीच्या साहाय्याने दोन अंकी विकासाचा दर गाठण्यासाठी आवश्यक असणारी गुंतवणूक पातळी साध्य करता येऊ शकते. भारतासारख्या वेगाने विकास करणाऱ्या, जगातील सर्वात मोठी बाजारपेठ असलेल्या आणि स्वस्त मनुष्यबळ मुबलक प्रमाणात उपलब्ध असलेल्या देशांमध्ये परदेशी थेट गुंतवणूक ही सातत्याने वाढतच राहिलेली आहे. परंतु अलीकडील काळात असे निदर्शनास येत आहे की, भारतामध्ये होणाऱ्या परदेशी थेट गुंतवणुकीबरोबरच भारतीयांकडून इतर देशांमध्ये केल्या जाणाऱ्या थेट गुंतवणुकीमध्येही वेगाने वाढ होत आहे. खरे पाहाता, भारतामध्ये होणाऱ्या परदेशी थेट गुंतवणुकीतील वार्षिक वाढीच्या दरापेक्षा भारतीयांकडून इतर देशांमध्ये होणाऱ्या थेट गुंतवणुकीतील वार्षिक वाढ ही जास्त असल्याचे दिसून येते. परिणामतः भारतामध्ये होणारी निव्वळ परदेशी थेट गुंतवणूक ही २०२४-२५ मध्ये केवळ ९५९ दशलक्ष डॉलर इतकी नोंदविली गेली आहे. याचाच अर्थ, परदेशी थेट गुंतवणुकीच्या अंत:प्रवाहापेक्षा थेट गुंतवणुकीचा बाह्यप्रवाह वेगवान झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे देशांतर्गत गुंतवणुकीला सहाय्यभूत ठरेल अशी परदेशी थेट गुंतवणूक येणाऱ्या काळामध्ये भारताच्या दृष्टीने फारशी आशादायी राहील का नाही याबाबत शंका निर्माण होत आहे आणि हे विकसित राष्ट्र बनविण्याच्या मार्गातील एक फार मोठे आव्हान ठरणार आहे.

**कोष्टक क्रमांक ४ : भारतातील परदेशी थेट गुंतवणूक**

| वर्ष | भारतातील परदेशी थेट गुंतवणूक दशलक्ष डॉलरमध्ये | भारतामार्फत थेट गुंतवणूक दशलक्ष डॉलरमध्ये | भारतातील निव्वळ परदेशी थेट गुंतवणूक दशलक्ष डॉलरमध्ये |
|---|---|---|---|
| २००३-०४ | ४३२२ | १९३४ | २३८८ |
| २००४-०५ | ५९८७ | २२७४ | ३७१३ |
| २००५-०६ | ८९०१ | ५८६७ | ३०३४ |
| २००६-०७ | २२७३९ | १५०४६ | ७६९३ |
| २००७-०८ | ३४७२९ | १८८३५ | १५८९३ |
| २००८-०९ | ४१७३८ | १९३६५ | २२३७२ |
| २००९-१० | ३३१०९ | १५१४३ | १७९६६ |
| २०१०-११ | २९०२९ | १७१९५ | ११८३४ |
| २०११-१२ | ३२९५२ | १०८९२ | २२०६१ |
| २०१२-१३ | २६९५३ | ७१३४ | १९८१९ |
| २०१३-१४ | ३०७६३ | ९१९९ | २१५६४ |
| २०१४-१५ | ३५२८३ | ४०३१ | ३१२५१ |
| २०१५-१६ | ४४९०७ | ८८८६ | ३६०२१ |
| २०१६-१७ | ४२२१५ | ६६०३ | ३५६१२ |
| २०१७-१८ | ३९४३१ | ९१४४ | ३०२८६ |
| २०१८-१९ | ४३३०२ | १२५९० | ३०७१२ |
| २०१९-२० | ५६००६ | १२९९३ | ४३०१३ |
| २०२०-२१ | ५४९२७ | १०९७२ | ४३९५५ |
| २०२१-२२ | ५६२३१ | १७६४४ | ३८५८७ |
| २०२२-२३ | ४२००६ | १४०२० | २७९८६ |
| २०२३-२४ | २६८३० | १६६७८ | १०१५२ |
| २०२४-२५ | २९१३० | २८१७१ | ९५९ |

स्त्रोत : Handbook of Statistics on Indian Economy, RBI.

भारतीय अर्थव्यवस्थेने दोन अंकी विकास दर गाठणे हे विकसित भारताचे स्वप्न साकार करण्याच्या अनुषंगाने अत्यावश्यक आहे आणि दोन अंकी विकास दराचे उद्दिष्ट साध्य करणे आणि त्यामध्ये येणाऱ्या काळामध्ये सातत्य राखणे या दृष्टीने गुंतवणूक मग ती देशांतर्गत असो वा परदेशी, सरकारमार्फत केली जाणारी असो व खाजगी क्षेत्रामार्फत ती पुरेशा प्रमाणात वाढणे आणि त्यासाठी आवश्यक असे पोषक वातावरण निर्माण करणे गरजेचे आहे. १९९०-९१ नंतर आपण ज्याप्रमाणे आर्थिक सुधारणांच्या जोरावर गुंतवणुकीमध्ये भरीव वाढ

घडवून त्याआधारे आपला विकासदर उंचावू शकलो. त्याचप्रमाणे पुन्हा एकदा दोन अंकी विकासदराचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अपूर्ण आर्थिक सुधारणांची कास धरणे क्रमप्राप्त असल्याची परिस्थिती सध्या निर्माण झालेली आहे. २००९-१० नंतरच्या काळामध्ये उंचावलेला आणि २०२१-२२ मध्ये ९.९% पर्यंत पोहोचलेला विकासदर आपण चालू ठेवू शकलो नाही. आता बदललेल्या जागतिक परिस्थितीमध्ये, उत्पन्न करातील आणि वस्तू आणि सेवा करासंदर्भातील देशांतर्गत उपभोगास चालना देणारे महत्त्वाचे बदल लागू करूनही आपला विकासदर गती पकडू शकलेला नाही आहे. त्यामुळे देशांतर्गत गुंतवणुकीबरोबरच परदेशी गुंतवणुकीस चालना देणारे आणि बरेच वर्ष प्रलंबित असणाऱ्या आर्थिक सुधारणा राबविण्याचे कार्यक्रम हाती घेणे काळाची गरज बनलेली आहे. विकासदर आणि त्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या गुंतवणूक दरामध्ये वाढ घडवून आणण्याच्या अनुषंगाने महत्त्वाच्या मानल्या गेलेल्या आणि प्रलंबित असणाऱ्या काही महत्त्वाच्या आर्थिक सुधारणांचा परामर्श खालील भागामध्ये घेतलेला आहे.

## प्रलंबित आर्थिक सुधारणा

### १. थेट परदेशी गुंतवणूक

या अगोदर उल्लेख केल्याप्रमाणे भारतातील थेट परदेशी गुंतवणूक ही समाधानकारक पद्धतीने वाढताना दिसत नाही आहे. उलट भारतातून बाहेर जाणारी गुंतवणूक तुलनेने अधिक वेगाने वाढत आहे. ही बाब स्वागतार्ह नाही आहे. भारतामध्ये थेट परदेशी गुंतवणुकीचा ओघ वाढावा यासाठी थेट परदेशी गुंतवणुकी संदर्भातील एकत्रित धोरण (Consolidated FDI Policy) जे अलीकडे १५ ऑक्टोबर २०२० रोजी जाहीर करण्यात आलेले आहे त्यातील अपूर्णता दूर करून ते अधिक सुलभ करणे गरजेचे आहे. या धोरणानुसार काही क्षेत्रांमध्ये (जसे लॉटरी, जुगार, निधी कंपनी, चिटफंड, रियल इस्टेट व्यवसाय, सिगार आणि चिरूट इत्यादी) थेट परदेशी गुंतवणूक प्रतिबंधित आहे. ज्या क्षेत्रामध्ये मान्यता देण्यात आलेली आहे त्या क्षेत्रांना क्षेत्रनिहाय मर्यादा लागू आहेत (जसे, सार्वजनिक पेट्रोलियम शुद्धीकरण - ४९%, एफ. एम. रेडिओ - ४९%, वर्तमानपत्र प्रकाशन - २६%, बहुब्रँड किरकोळ व्यापार - ५१%), तसेच ज्या क्षेत्रामध्ये १००% थेट परदेशी गुंतवणूक मान्य केलेली आहे, तिथे काही कडक अटी लागू आहेत (जसे, एक ब्रँड किरकोळ व्यापार क्षेत्रामध्ये १००% गुंतवणूक मान्य असली तरी ३०% स्थानिक पातळीवर माल खरेदी करण्याची अट लागू आहे), बऱ्याच क्षेत्रांमध्ये मान्य गुंतवणुकीपैकी काही प्रमाण हे शासनाच्या परवानगीने (Government Approval Route) मान्य करण्यात आलेले आहे, ज्याबाबतीत विलंब आणि शेजारच्या देशांमधून गुंतवणुकीबाबतीत विशेष छाननी या गोष्टी संभवतात. जरी हे धोरण एकत्रित असले तरी काही क्षेत्राबाबतीतील बदलत्या नियमांमुळे (जसे विमा आणि दूरसंचार) त्याचे अनुपालन व्यवस्थित होण्यासाठी सातत्याने देखरेखीची गरज निर्माण झालेली दिसते. थेट परदेशी गुंतवणुकी संदर्भातील धोरणातील वरील अपूर्णताबरोबरच, अपुऱ्या पायाभूत सुविधा आणि कुशल मनुष्यबळाचा अभाव यासारख्या बाबींमुळेही भारतातील थेट परदेशी गुंतवणुकीचा ओघ हवा तितक्या प्रमाणात वाढताना दिसत नाही आहे. त्यामुळे थेट परकीय गुंतवणुकीच्या अंत:प्रवाहाला चालना देणारे आवश्यक ते बदल अगदी नजीकच्या काळात हाती घ्यावे लागतील.

### २. पोर्टफोलिओ गुंतवणूक

थेट परदेशी गुंतवणुकीबरोबरच ज्याला आपण पोर्टफोलिओ गुंतवणूक म्हणतो ती ही देशाच्या गतिमान विकासासाठी महत्त्वाची ठरते. अशा प्रकारची गुंतवणूक ही प्रामुख्याने परकीय संस्थात्मक गुंतवणूक आणि पात्र परकीय गुंतवणूक या दोन प्रकारात प्राप्त होते.

पोर्टफोलिओ गुंतवणूक ही जरी अल्पकाळासाठी आणि उच्च परताव्याच्या उद्देशाने केली जात असली आणि तिचा अर्थव्यवस्थेची उत्पादक क्षमता वाढविण्यामध्ये प्रत्यक्ष हातभार लागत नसला, तरी भारतासारख्या विकसनशील देशांच्या दृष्टीने अशा प्रकारच्या गुंतवणुकीचे खास महत्त्व आहे. भांडवल बाजारात मोठ्या प्रमाणात रोखता आणि स्थिरता राखणे, पारदर्शक व्यवस्थापन आणि सुशासन यांना चालना देणे, देशाच्या परकीय चलन साठ्यात भर घालणे या दृष्टीने या प्रकारची गुंतवणूक महत्त्वाची ठरतेच; परंतु सर्वात महत्त्वाचे म्हणजे एखाद्या देशातील अशा प्रकारच्या गुंतवणुकीच्या वाढत्या ओघामुळे त्या देशास गुंतवणुकीच्या दृष्टीने योग्य ठिकाण म्हणून नावलौकिकही प्राप्त होतो व त्याद्वारे देशातील परदेशी थेट गुंतवणुकीचा ओघ दीर्घकाळपर्यंत वाढत राहून आर्थिक विकासास चालना मिळू शकते. पोर्टफोलिओ गुंतवणुकीसंदर्भातील सेबीमार्फत राबविले जाणारे धोरण (SEBI (Foreign Portfolio Investors) Regulation 2019) हे बऱ्यापैकी उदार आणि गुंतवणूक वाढीसाठी पोषक बनविले जात असून त्याद्वारे सोपे केवायसी नियम आणि अनुपालना संदर्भातील त्रास कमी केलेला आहे. परंतु या संदर्भातील पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांना भेडसावणारी सर्वात महत्त्वाची अडचण म्हणजे एका परकीय संस्थात्मक गुंतवणूकदाराची गुंतवणूक ही कंपनीच्या वसूल भाग भांडवलाच्या १० % पर्यंत मर्यादित आहे, जी २०% पर्यंत वाढविण्याची गरज बरेच काळ अधोरेखित होत आलेली आहे. त्याचप्रमाणे एखाद्या कंपनीतील एकूण परकीय संस्थात्मक गुंतवणूक ही २४% (४९% पर्यंत बोर्डाच्या मान्यतेने वाढविणे शक्य आहे.) पर्यंत मर्यादित आहे आणि काही क्षेत्रांमध्ये (जसे गॅम्बलिंग, लॉटरी आणि किरकोळ व्यापार, इत्यादी) परकीय संस्थात्मक गुंतवणूक ही प्रतिबंधित आहे. या संदर्भात शिथिलता येण्याची आणि पोर्टफोलिओ गुंतवणुकीला योग्य असे पोषक वातावरण निर्माण होण्याची गरज आहे.

### ३. निर्गुंतवणूक

भारत सरकारचे निर्गुंतवणूक धोरण हे सातत्याने धक्के खात पुढे जाणाऱ्या गाडीसारखे बनलेले आहे. केंद्र सरकारच्या मालकीच्या चालू असणाऱ्या २५४ उद्योग उपक्रमांपैकी ५७ उद्योगांनी २०२२-२३ मध्ये २८ हजार ८२७ कोटी रुपये इतका तोटा नोंदविलेला आहे जो २०२१-२२ मधील १४,६१० कोटी रुपयेवरून वाढलेला आहे. तोट्यात चालणाऱ्या केंद्रीय उद्योगांचा संचित तोटा हा जवळपास १,५०,००० कोटी रुपयेपर्यंत पोहोचलेला आहे. अशा तोट्यात चालणाऱ्या उद्योगातील गुंतवणूक निर्गुंतवणुकीच्या माध्यमातून खुली करणे आणि त्याद्वारे सार्वजनिक क्षेत्राची उत्पादक कारणासाठीची गुंतवणूक वाढवणे हे शहाणपणाचे ठरणारे आहे. परंतु गेल्या दशकभराच्या काळामध्ये भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाच्या अखत्यारीतील दीपक विभागामार्फत राबविली जाणारी निर्गुंतवणुकीची प्रक्रिया अपेक्षेप्रमाणे पुढे जात नसल्याचे दिसून येते. दरवर्षी अर्थसंकल्पामध्ये निश्चित केलेले निर्गुंतवणुकीचे ध्येय साध्य करण्यामध्ये फारसे यश मिळालेले नसल्याचे तक्ता क्र. ५ वरून दिसते.

### ४. कामगार सुधारणा

अलीकडेच भारत सरकारमार्फत कामगार सुधारणांचा भाग म्हणून वेतन संहिता २०१९, सामाजिक सुरक्षा संहिता २०२०, औद्योगिक संबंध संहिता २०२० आणि व्यावसायिक सुरक्षा आरोग्य आणि कामकाजाच्या परिस्थिती संहिता २०२० या चार संहिता २१ नोव्हेंबर २०२५ पासून लागू करण्यात आलेल्या आहेत. यापैकी औद्योगिक संबंध संहिता ही कामगार संघटना आणि औद्योगिक कलह इत्यादीसाठीच्या नियमासंदर्भातील आहे. त्या अंतर्गत ज्यांची कामगार संख्या शंभरपेक्षा जास्त आहे अशा औद्योगिक आस्थापनांना ताळेबंदी, कामगार कपात आणि आस्थापना बंद करण्यासाठी

**कोष्टक क्रमांक ५ : निर्गुंतवणूक ध्येय आणि साध्य**

| वर्ष | ध्येय (अर्थसंकल्पीय अंदाज) | साध्य (कोटी रु. मध्ये) | साध्याची ध्येयाशी टक्केवारी | व्यवहारांची संख्या (कोटी रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| २०१४-१५ | ४३४२५ | २४३४९ | ५६.१ | ०८ |
| २०१५-१६ | ६९५०० | २३९९७ | ३४.५ | ०९ |
| २०१६-१७ | ५६५०० | ४६२४७ | ८१.९ | २१ |
| २०१७-१८ | ७२५०० | १०००५७ | १३८.० | ३६ |
| २०१८-१९ | ८०००० | ८४९७२ | १०६.२ | २८ |
| २०१९-२० | १०५००० | ५०३०० | ४७.९ | १५ |
| २०२०-२१ | २१०००० | ३२८८५ | १५.७ | १८ |
| २०२१-२२ | १७५००० | १३५३४ | ७.७ | १० |
| २०२२-२३ | ६५००० | ३५२९३ | ५४.३ | ०९ |
| २०२३-२४ | ५१००० | १६५०७ | ३२.४ | १५ |
| २०२४-२५ | ५०००० | १०१६३ | २०.३ | ०५ |
| २०२५-२६ | ४७००० | १५५६२ | ३३.१ | ०६ |

स्त्रोत : 1. Annual Report (2022-23), Ministry of Finance, GOI

2. https://dpiam.gov.in/disinvestmentRecepitsDtls

पूर्वी शासकीय परवानगीची गरज होती. परवानगीची ही तरतूद आता ३०० पेक्षा जास्त कामगार संख्या असणाऱ्या आस्थापनांना लागू करण्यात आलेली आहे. वास्तविक, पूर्वीच्या औद्योगिक कलह कायदा, १९४७ मध्ये १०० पेक्षा जास्त कामगार संख्या असलेल्या औद्योगिक आस्थापनांना लागू असलेल्या या तरतुदीतून १००० पर्यंत कामगार संख्या असलेल्या औद्योगिक आस्थापनांना वगळावे अशी मागणी असताना त्यातून फक्त ३०० पर्यंत कामगार संख्या असलेल्या औद्योगिक आस्थापनांना वगळण्यात आलेले आहे. बऱ्याच तज्ज्ञांमार्फत शासकीय परवानगीची ही तरतूद भारताच्या औद्योगिक विकासातील आणि औद्योगिक रोजगार वाढीतील एक महत्त्वाचा अडथळा मानला गेला आहे. भारतातील औद्योगिक आस्थापनांनी ही शासकीय परवानगीची तरतूद आपल्याला लागू होऊ नये यासाठी कामगारांची संख्या १०० पेक्षा कमी ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न केलेला आहे. ज्यामुळे औद्योगिक विस्ताराच्या संधीचा त्याग आणि भांडवल प्रधान उत्पादन तंत्राचा अधिकतम वापर यामुळे औद्योगिक क्षेत्रातून समाधानकारक रोजगार वृद्धी न होणे यासारख्या बाबी घडून आलेल्या आहेत. कामगारांना त्यांच्या रोजगाराची सुरक्षा देणे ही बाब जितकी महत्त्वाची आहे तितकीच औद्योगिक वृद्धी आणि रोजगारनिर्मिती याबाबीही महत्त्वाच्या आहेत. परंतु १०० कामगार संख्येच्या तरतुदीमुळे रोजगार सुरक्षेची बाब साध्य झाली. परंतु समाधानकारक औद्योगिक वृद्धी आणि औद्योगिक रोजगार वाढ याबाबी मात्र आपल्याला त्यागाव्या लागल्या. त्याउपर रोजगार सुरक्षेची बाब ही फक्त संघटित

क्षेत्रातील कामगार, ज्यांची टक्केवारी ही एकूण श्रमशक्तीच्या ८ ते ९% इतकी आहे त्यांच्यापुरतीच मर्यादित राहिलेली दिसून येते. म्हणजेच ज्या उद्देशाने ही तरतूद कायद्यामध्ये अंतर्भूत करण्यात आलेली होती तो उद्देश साध्य होण्याऐवजी, औद्योगिक वृद्धी आणि रोजगार वृद्धी या दोन्ही बाबीशी आपल्याला तडजोड करावी लागली. थोडक्यात, अनुभव लक्षात घेता औद्योगिक संबंध संहितेतील टाळेबंदी आणि कामगार कपात या संदर्भातील शासकीय परवानगीची तरतूद ही १००० पेक्षा जास्त कामगार संख्या असणाऱ्या औद्योगिक आस्थापनांना लागू करणे क्रमप्राप्त वाटते. ज्यातून औद्योगिक क्षेत्रातील खाजगी गुंतवणूक वाढवून रोजगार निर्मितीचेही उद्दिष्ट साध्य करता येईल आणि त्याद्वारे जलद आर्थिक विकासाबरोबरच विकासाची सर्वसमावेशकताही साध्य करता येईल.

### ५. नादारी आणि दिवाळीखोरी संहिता-२०१६

२०१६ मध्ये लागू करण्यात आलेला हा कायदा कर्जाची वसुली प्रक्रिया वेगवान करून दिवाळखोरीतील कंपन्यांची मालमत्ता विकून कर्जदार बँकांना न्याय देणे, बिगरदेय मत्तांचे प्रमाण कमी करणे, दिवाळखोर कंपन्यांमध्ये अडकून पडलेले भांडवल खुले करणे, विक्री करावयाच्या मालमत्तेसाठी अधिकतम मूल्य मिळविणे, उद्योजकतेला प्रोत्साहन देणे आणि सर्व भागधारकांच्या हिताचे संरक्षण करून भारतात व्यवसाय करण्याची प्रक्रिया अधिक सुलभ बनविणे, इत्यादी बाबतीत महत्त्वपूर्ण योगदान देणारा ठरला आहे. या कायद्याच्या कार्यवाहीचाच परिणाम म्हणून जागतिक बँकेच्या २०२० च्या अहवालानुसार भारताची दिवाळखोरी निराकरण आणि व्यवसाय करण्यातील सुलभता याबाबतीतील क्रमवारी १३६ वरून ५२ वर आलेली आहे.

या निर्विवाद यशानंतरही या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये अनेक दोष दिसून आलेले आहेत, ज्याचा परिणाम म्हणून या कायद्याचा उद्देश फारसा सफल होताना दिसत नाही. त्यामुळे या कायद्याच्या कार्यवाहीसंदर्भात आढावा घेण्यासाठी कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने नियुक्त केलेल्या स्थायी समितीने (डिसेंबर २०२५) या कायद्याच्या इष्टतम कामगिरीला लक्षणीयरीत्या कमकुवत करणाऱ्या आव्हानांबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली आहे. या समितीने म्हटल्याप्रमाणे या कायद्याच्या कार्यवाहीमध्ये होणारा लक्षणीय विलंब (जो सरासरी ७१३ दिवस म्हणजे सुचविलेल्या आणि अनिवार्य ३३० दिवसांपेक्षा खूप जास्त आहे), राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधीकरणांची अपुरी संख्या, रिक्त न्यायालयीन आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांची पदे, प्रलंबित खटल्यांची मोठी संख्या आणि प्रवर्तक आणि अयशस्वी निराकरण अर्जदाराकडून व्यापक क्षुल्लक खटले आणि अपील, त्यामुळे मालमत्तांच्या मूल्यामध्ये होणारी कपात, मालमत्तेच्या मूल्यांकन प्रक्रियेतील अपारदर्शकता, निराकरण प्रक्रियेमध्ये समाविष्ट होण्यासाठी कंपन्यांकडून होणारा विलंब, इत्यादी कारणांमुळे भारतातील या कायद्याच्या स्वरूपात अस्तित्वात आलेल्या दिवाळीखोरी निराकरण प्रक्रियेला म्हणावे तसे यश प्राप्त झालेले नाही आहे. परिणामत: औद्योगिक विकासाला गती देणाऱ्या भांडवलाची हालचाल अपेक्षेप्रमाणे न होऊन देशाच्या औद्योगिक विकासाला जबर फटका बसण्याची मोठी शक्यता निर्माण झालेली आहे. यासंदर्भात योग्य त्या सुधारणा करणारे नादारी आणि दिवाळीखोरी संहिता (सुधारणा) विधेयक २०२५ हे सादर झालेले असून, त्याबाबतीतील आपला अहवाल संसदेच्या सिलेक्ट कमिटीने डिसेंबर २०२५ मध्ये सादर केलेला आहे. हे विधेयक संसदेमध्ये संमत होऊन दिवाळखोरी निराकरण प्रक्रियेमध्ये आवश्यक ते बदल होणे अत्यावश्यक बनलेले आहे.

### समारोप

भारताने २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनण्याच्या प्रक्रियेमध्ये येणारे महत्त्वाचे अडथळे आणि काही

महत्त्वाच्या प्रलंबित सुधारणांचा आढावा सदर लेखामध्ये घेतलेला आहे. या सुधारणांबरोबरच इतरही सुधारणा ज्या प्रलंबित आहेत आणि ज्या आर्थिक विकासाची गती वाढविण्यामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडू शकतात त्यामध्ये जमीन अधिग्रहणामधील अडचणी दूर करणे, वस्तू आणि सेवा कराच्या बाबतीतील उलट्या शुल्क सरंचनेचा प्रश्न सोडविणे, वीज, तेल उत्पादने आणि रिअल इस्टेट इ. बाबी वस्तू आणि सेवा कराच्या अखत्यारीत आणणे, निर्यातदारांसाठी दस्तऐवज जमा करणे आणि मंजुरी मिळवण्यासाठी एकच पोर्टल तयार करणे, भारतीय कंपन्यांना इतर देशांच्या भाग बाजारामध्ये नोंदणी करून भांडवल उभे करण्याची परवानगी देणे इ. चा समावेश होतो. आर्थिक सुधारणांचे आर्थिक विकासाची प्रक्रिया गतिमान करण्यातील महत्त्व आपल्या देशाच्या संदर्भामध्ये नवीन सांगण्याची गरज नाही. कारण १९९०-९१ नंतरच्या भारतीय अर्थव्यवस्थेच्या कामगिरीवरून आर्थिक सुधारणा काय भूमिका पार पाडू शकतात हे सिद्ध झालेले आहे. या लेखांमध्ये उल्लेख केलेल्या आर्थिक सुधारणा या प्रातिनिधिक असून इतरही बरेच बदल जे भारताचा विकासदर उंचावू शकतात. ते येणाऱ्या काळामध्ये प्राधान्याने आणि वेगाने राबविणे गरजेचे आहे. सावधानता आणि हळुवारपणा ही भारतीय धोरणप्रक्रियेची आत्तापर्यंतच्या अनुभवावरून लक्षात आलेली महत्त्वाची वैशिष्ट्ये असली तरी २०४७ पर्यंत भारताला विकसित देश बनविण्याचे उद्दिष्ट साध्य करावयाचे झाल्यास ती काही प्रमाणात बाजूला ठेवून १९९० च्या दशकाच्या पहिल्या अर्धभागामध्ये आर्थिक सुधारणा राबविण्यामध्ये आपण दाखविलेली आक्रमकता पुन्हा एकदा दाखविणे ही काळाची गरज बनलेली आहे असे म्हटले तर चुकीचे होणार नाही.

**संदर्भ**


1. Center for Strategic and International Studies (CSIS), India's Economic Reform Agenda: A Scorecard 3.0 (https://indiareforms.csis.org)
2. Government of India, Economic Survey - 2025-26
3. Government of India, Ministry of Finance, Annual Report (2022-23)
4. Government of India, Ministry of Commerce and Industry, Consolidated FDI Policy
5. Government of India, Ministry of Finance, Department of Investment and Public Asset Management (DIPAM) (https://dipam.gov.in/disinvestmentReceiptsDtls)
8. Securities and Exchange Board of India, Operating Guidelines For Foreign Portfolio Investors And Designated Depository Participants (https://www.sebi.gov.in/sebi_data/commondocs/may-2019/Annexure-II_p.pdf)
7. Reserve Bank of India, Handbook of Statistics on Indian Economy (https://www.rbi.org.in/Scripts/Publications.aspxpublication=Annual)
6. IMF, World Economic Outlook (October 2025)


◆

वापरलेली नाहीत अशी यंत्रे भांडवल नाहीत.
चळवळ हा नफ्याचा घटक आहे.

**- कार्ल मार्क्स**

# जागतिक पातळीवरील बदलते आर्थिक संदर्भ आणि भारताची व्यापाररचना

**एम. एच. शिंदे** †

**प्रस्तावना :**

अलीकडील काळात जागतिक पातळीवर अनेक घडामोडी घडत आहेत. यामध्ये भौगोलिक-राजकीय तणाव, तंत्रज्ञानातील नवनवे शोध, हवामान बदल, प्रशुल्क युद्ध, लष्करी युद्ध इत्यादी घडामोडींचा समावेश होतो. या घडामोडींचे जागतिक अर्थव्यवस्था आणि व्यापारावर दूरगामी परिणाम होत आहे. यापैकी रशिया-युक्रेन, इस्राईल-हमास, अमेरिका/इस्राईल-इराण यांच्यातील युद्ध आणि मार्च २०२५ मध्ये अमेरिकेने टाकलेला टॅरिफ बॉंब यामुळे जागतिक पातळीवरील अर्थकारण ढवळून निघाले असून त्याचे जागतिक अर्थव्यवस्थेवर दूरगामी परिणाम होत आहेत. या घडामोडींचा सर्वच देशांना फटका बसलेला असला तरी, विकसित देशांच्या तुलनेत विकसनशील आणि अल्प विकसित देशांना जबर किंमत चुकवावी लागत आहे. भारतालाही या घडामोडींचे परिणाम भोगावे लागत आहेत. रशिया-युक्रेन युद्धामुळे खाद्यतेल आणि इतर उत्पादनांचा तुटवडा निर्माण होऊन भारतीय बाजारपेठेत भाववाढीची स्थिती निर्माण झाली होती. तर अमेरिकन 'टॅरिफ बॉंबमुळे' अमेरिकेला होणाऱ्या निर्यातीत घट होऊन भारतातील कापड आणि तयार कपडे, इलेक्ट्रिकल वस्तू, यंत्रे, या उद्योगांबरोबरच कृषी व्यवसायावर विपरित परिणाम झाला आहे. आज सुरू असलेल्या अमेरिका-इराण युद्धामुळे भारताच्या निर्यातीवर विपरित परिणाम झाला असून, इंधन पुरवठा साखळी विस्कळीत होऊन त्याचे खाद्य पदार्थ व्यवसायाबरोबरच वाहतूक व्यवसायावरही विपरित परिणाम दिसून येत आहेत. याव्यतिरिक्त या सर्व घडामोडींचे देशातील रोखे बाजारामध्ये तीव्र पडसाद उमटल्याने गुंतवणूकदारांचे लाखो कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. याचा एकत्रित परिणाम भारतातील लोकांचे उत्पन्न आणि रोजगारावर होत आहे. अशा प्रकारच्या वातावरणात जागतिक व्यापारामध्ये झालेल्या बदलांचे विश्लेषण होणे गरजेचे आहे.

**आंतरराष्ट्रीय व्यापाराची सैद्धांतिक पार्श्वभूमी:**

मुळात विविध आर्थिक घडामोडींपैकी व्यापार ही प्रत्येक देशासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आर्थिक घडामोड मानली जाते. १६ आणि १७ व्या शतकापासून ते

† प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, अहमदनगर महाविद्यालय, अहिल्यानगर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

आजीव सभासद क्रमांक : १४३२, भ्रमणध्वनी : ९४२०४७०५३४, ईमेल : madhav.shinde@aca.edu.in

१८व्या शतकापर्यंत जगाच्या आर्थिक विचारांवर व्यापारवादी विचारसरणीचा मोठा पगडा राहिलेला आहे. या विचारसरणीला अनुसरून कमीतकमी आयात आणि जास्तीत जास्त निर्यात करत राष्ट्राच्या संपत्तीत वाढ करण्याचा प्रयत्न युरोपसह पाश्चिमात्य देशांमध्ये झालेला पाहायला मिळतो. मात्र १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात ॲडम स्मिथ (१७७६) यांनी मांडलेल्या विचारांनी व्यापारवादी विचारसरणीला सुरुंग लागला. ॲडम स्मिथ यांनी व्यापार हा प्रतिबंधमुक्त असावा असे सांगून तो केवळ एका देशासाठी नाही, तर दोन्ही देशांसाठी लाभदायक ठरला पाहिजे, असे प्रतिपादन करत आंतराष्ट्रीय व्यापाराची सैद्धांतिक मांडणी केली. तिथून पुढे व्यापार हा प्रतिबंधमुक्त आणि दोन्ही देशांना अथवा बाजूंना लाभदायक राहाण्यासाठी प्रयत्न होण्यास सुरुवात झाली. नंतरच्या कालखंडात या व्यापार सिद्धांतांमध्ये उत्पादन घटक, तंत्रज्ञान, भौगोलिक स्थान यांसारख्या घटकांचा समावेश होऊन त्यामध्ये वेळोवेळी सुधारणा झालेली पाहावयास मिळते. मात्र, ॲडम स्मिथ, डेव्हिड रिकार्डो आणि तत्कालीन व्यापार सिद्धांतांचा आढावा घेता, त्यांचे विश्लेषण हे आंतरराष्ट्रीय व्यापार हा बंधनमुक्त असावा व तो दोन्ही बाजूंना लाभदायक राहील या अनुषंगाने झालेले आहे. आज या सिद्धांतांची परिणामकारकता राहिली आहे का? असा प्रश्न पडतो.

**जागतिक व्यापाराचे नियमन:**

जागतिक व्यापाराचे नियंत्रण आणि नियमन करण्यासाठी १९४४ साली व्यापार आणि प्रशुल्काचा सामान्य करार (GATT) या संस्थेची स्थापना करण्यात आली. त्यानंतर या संस्थेचे १९९५ साली जागतिक व्यापार संघटनेत (WTO) झालेले रूपांतर आणि WTO चे अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांना सामावून घेणारे व्यापार करार यामाध्यमातून विकसित देशांच्या भांडवलवादी व्यापार धोरणांमुळे विकसनशील अथवा अल्प विकसित देशांच्या आर्थिक हिताला बाधा येणार नाही याची काळजी घेणारी आणि जगातील व्यापाराचे पारदर्शक नियमन करणारी यंत्रणा अस्तित्वात आली. त्यादृष्टीने जागतिक पातळीवर व्यापार उदारीकरणाच्या धोरणाचा स्वीकार विविध देशांनी केल्याचे दिसून येते. मात्र GATT अथवा WTO च्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय व्यापाराचे नियंत्रण आणि पारदर्शक नियमन करण्याचा प्रयत्न होत असला, तरी त्यावर विकसित देशांचे असलेले वर्चस्व विकसनशील आणि अल्प विकसित देशांपर्यंत व्यापाराचे लाभ पोहचण्यामध्ये बाधा निर्माण करत राहिले आहेत, असेच म्हणता येईल. जगातील बहुतेक राष्ट्रांनी जागतिकीकरण आणि उदारीकरण स्वीकारत व्यापार आणि अर्थव्यवस्थेवरील बंधने कमी करत अधिक खुले धोरण राबविण्याचे प्रयत्न केले असले, तरी वर्चस्ववादी भूमिका मात्र सोडलेली दिसत नाही, हे तितकेच सत्य. त्याच भूमिकेतून जागतिक व्यापारावर आणि संसाधनांवर आपले वर्चस्व कायम ठेवण्यासाठी विकसित देशांचा सातत्याने प्रयत्न राहिलेला पाहायला मिळतो. याचे उदाहरण म्हणजे अमेरिकेने स्वीकारलेले प्रतिबंधात्मक व्यापार धोरण आणि मध्य आशियातील तेल संसाधनांच्या बाजारपेठेवर वर्चस्व ठेवण्यासाठी इराणसोबत सुरू केलेले युद्ध हे होय. अमेरिकेसारख्या विकसित राष्ट्रांच्या अशा वर्चस्ववादी व्यापारधोरणांमुळे आज जागतिक व्यापार संघटनेच्या कार्यप्रणालीसमोर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अशा स्थितीत जागतिक पातळीवर विविध देशांच्या व विशेषतः भारताच्या परकीय व्यापाराची स्थिती आणि त्यावर होणाऱ्या परिणामांची चर्चा करण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखात करण्यात आला आहे. त्यासाठी वाणिज्य मंत्रालयाद्वारे प्रकाशित व्यापार आकडेवारी, भारतीय रिजर्व्ह बँकेचे अहवाल, भारतीय आर्थिक पाहणी अहवाल यांचा आधार घेण्यात आला आहे.

### जागतिक घडामोडींचे विविध देशांच्या व्यापारावरील परिणाम

जागतिक पातळीवर घडत असलेल्या विविध घडामोडींमुळे जागतिक अर्थव्यवस्था आणि व्यापारावर मोठा परिणाम होताना दिसून येतो. हा परिणाम विविध निकषांच्याआधारे मोजला जातो. यामध्ये महत्त्वाचा निकष म्हणजे व्यवस्थापक खरेदी निर्देशांक (PMI) होय. या निर्देशांकाचे गणन हे विविध देशांच्या अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांत कार्यरत उद्योग अथवा व्यवसाय संस्थांच्या व्यवस्थापकांनी वस्तू आणि सेवांच्या जागतिक पातळीवर दिलेल्या खरेदी ऑर्डर्सच्याआधारे केले जाते. व्यवस्थापकांनी दिलेल्या खरेदी ऑर्डर्सचे मासिक सर्वेक्षणावर आधारित आकडेवारी गोळा करून या निर्देशांकाचे गणन करण्यात येते. या निर्देशांकाचे मूल्य ५० ते १०० यामध्ये असते. जेव्हा निर्देशांकाचे मूल्य ५० च्या वर असेल, तर त्या देशाच्या निर्यातीमध्ये विस्तार होत असल्याचे समजले जाते आणि निर्देशांकाचे मूल्य जेव्हा १०० च्या जवळ असते तेव्हा त्या देशाची अर्थव्यवस्था जागतिक पातळीवर अधिक बळकट अर्थव्यवस्था असल्याचे निदर्शक समजले जाते. तक्ता क्र. ०१ मध्ये जाने. २०२५, ऑगस्ट २०२५ आणि डिसें. २०२५ या कालखंडासाठी जागतिक पातळीवर वस्तुनिर्माण व सेवांच्या नवीन निर्यात नोंदींचे मापन करण्यासाठी PMI चे गणन करण्यात आले आहे. फेब्रुवारी २०२५ मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी प्रशुल्क वाढीचे धोरण स्वीकारल्यानंतर त्याचे परिणाम जगभर दिसून आले आहेत. ऑगस्ट २०२५ महिन्याच्या व्यवस्थापक खरेदी निर्देशांकाच्या मूल्यावरून तो परिणाम ठळकपणे समोर येतो.२०२५ या वर्षातील तीनही कालखंडासाठी PMI निर्देशाकांचे भारतासाठीचे मूल्य हे सर्वाधिक असल्याचे दिसून येते. असे असले तरी, त्यामध्ये जानेवारी ते डिसेंबर २०२५ या कालखंडात ५८.६ टक्क्यांवरून ५५.७ टक्क्यांपर्यंत घट झालेली पाहायला मिळते. तक्ता क्र. ०१ मधील इटली हा देश वगळता सर्व देशांच्या PMI निर्देशांकामध्ये जानेवारी ते ऑगस्ट २०२५ या कालखंडात घट अनुभवास येते. अमेरिकेने स्वीकारलेल्या प्रतिबंधात्मक व्यापारधोरणाचा तो परिणाम मानता येईल. त्यानंतर बहुतेक देशांच्या सदर निर्देशांकाच्या मूल्यात वाढ होताना दिसत असली तरी, मेक्सिको, इटली आणि भारत हे देश मात्र त्यासाठी अपवाद राहिलेले आहेत. या देशांच्या PMI निर्देशांकाच्या मूल्यात डिसेंबर २०२५ मध्ये घट झालेली अनुभवास येते. यावरून जागतिक पातळीवर विविध देशांच्या व्यवस्थापक खरेदी ऑर्डर्समध्ये वाढ होत असताना मेक्सिको, इटली, भारत यासारख्या देशांसाठी मात्र ती झालेली नसल्याचेच म्हणता येईल. याचाच अर्थ, अमेरिकेतील ट्रम्प सरकारने प्रशुल्क वाढीच्या घेतलेल्या निर्णयाचा या देशांच्या निर्यातीवर मोठा परिणाम झाला असल्याचे स्पष्ट होते.

### भारताच्या आयात आणि निर्यात व्यापाराची रचना

भारत हा जगातील प्रमुख उदयोन्मुख अर्थव्यवस्था म्हणून ओळखला जातो. देशाची अर्थव्यवस्था ही विकसनशील असल्याने विविध वस्तूंच्या मागणीत निर्माण होणारी वाढ पूर्ण करण्यासाठी आयात करावी लागते. भारताच्या आजपर्यंतच्या परकीय व्यापाराची स्थिती पाहाता, त्यामध्ये आयात ही निर्यातीपेक्षा नेहमीच अधिक राहिलेली आहे. भारत आयात आणि निर्यात करत असलेली प्रमुख उत्पादने तक्ता क्र. ०२ मध्ये दर्शविण्यात आली आहेत.

तक्ता क्र. ०२ वरून भारताच्या आयातीमध्ये खनिज तेल इंधनाचा सर्वाधिक वाटा असल्याचे दिसून येते. भारतातील एकूण खनिज तेल इंधन उपभोगाच्या जवळपास ८८% इंधन आयात केले जाते. त्यामुळे या पदार्थांचा आयातीमध्ये सर्वाधिक वाटा राहिलेला आहे. त्याखालोखाल इलेक्ट्रिक यंत्रे, नैसर्गिक मोती, आण्विक

**तक्ता क्र. ०१ : प्रमुख देशांसाठी व्यवस्थापक खरेदी निर्देशांक (PMI), २०२५**

| देश | जानेवारी | ऑगस्ट | डिसेंबर |
|---|---|---|---|
| कॅनडा | ५०.३ | ४४.८ | ४८.६ |
| मेक्सिको | ४९.१ | ४८.५ | ४६.१ |
| अमेरिका | ४९.७ | ४९.२ | ५१.६ |
| ब्रिटन | ४५.८ | ४१.८ | ५१.२ |
| इटली | ४२.५ | ४९.२ | ४७.९ |
| भारत | ५८.६ | ५६.१ | ५५.७ |
| चीन | ४९.९ | ४९.४ | ५१.३ |
| जपान | ४९.७ | ४४.७ | ४९.७ |
| दक्षिण कोरिया | ५१.० | ४७.३ | ५०.१ |
| जग | ४९.४ | ४८.७ | ५२.७ |

स्त्रोत: एस.पी. ग्लोबल.


**तक्ता क्र. ०२ भारताच्या आयात आणि निर्यातीची रचना, २०२५ (%)**

| अ. क्र. | वस्तू | निर्यातीतील वाटा | वस्तू | आयातीतील वाटा |
|---|---|---|---|---|
| १ | खनिज तेल इंधन | १९.९६ | खनिज तेल इंधन | ३५.२५ |
| २ | इलेक्ट्रिक यंत्रे | ८.६८ | इलेक्ट्रिक यंत्रे | ११.११ |
| ३ | आण्विक यंत्रसाधने | ७.३० | नैसर्गिक मोती | ९.६२ |
| ४ | नैसर्गिक मोती | ६.६३ | आण्विक यंत्रसाधने | ८.४९ |
| ५ | औषधे | ५.२९ | सेंद्रिय रसायने | ३.८७ |
| ६ | रेल्वेव्यतिरिक्त वाहने | ४.९३ | प्लास्टिक व प्लास्टिक वस्तू | ३.१२ |
| ७ | सेंद्रिय रसायने | ४.५० | पशु किंवा वनस्पती तेल | २.४६ |
| ८ | धान्ये | २.६१ | लोह व पोलाद | २.२५ |
| ९ | लोह व पोलादाचे घटक | २.१४ | विमान व अंतराळ साधने | २.१० |
| १० | लोह व पोलाद | २.१३ | ऑप्टिकल व फोटोग्राफी | १.८९ |

स्त्रोत: वाणिज्य मंत्रालय, भारत सरकार.

यंत्रसाधने यासह इतरही वस्तूंचा समावेश होतो. तर दुसरीकडे भारताच्या एकूण निर्यातीमध्येही खनिज तेल इंधनाचा वाटा सर्वाधिक असून २०२५ च्या निर्यात आकडेवारीनुसार तो जवळपास २०% एवढा असल्याचे दिसून येते. त्याखालोखाल भारताच्या निर्यातीमध्ये इलेक्ट्रिक यंत्रे, आण्विक यंत्रसामुग्री नैसर्गिक मोती, औषधे या वस्तूंचा वाटा अनुक्रमे ८.६८, ७.३०, ६.६३ आणि ५.२९% एवढा राहिलेला आहे. जागतिक पातळीवर घडणाऱ्या घडामोडींचा मोठा फटका भारतातून निर्यात होणाऱ्या या वस्तूंवर झाला आहे.

## आलेख क्र. ०१ भारताची आयात आणि निर्यात रचना (को.रु.)




स्त्रोत : भारतीय रिजर्व्ह बँक अहवाल.

भारताच्या आयात आणि निर्यातीचे प्रामुख्याने इंधन तेल आणि इंधन तेलविरहित आयात-निर्यात असे दोन भागात वर्गीकरण केले जाते. १९९१-९२ ते २०२४-२५ या कालखंडात देशातील आयात-निर्यातीचे विश्लेषण आलेख क्र. ०१ मध्ये करण्यात आले आहे. त्यानुसार भारतामध्ये इंधन तेल आणि इंधन तेलाव्यतिरिक्त वस्तूंच्या आयातीचे प्रमाण हे निर्यातीपेक्षा अधिक असून या वस्तूंच्या भारतातून होणाऱ्या निर्यातीच्या तुलनेत आयातीचे प्रमाण वाढत असल्याचे स्पष्ट होते. भारताची आयात अधिक आणि निर्यात कमी असल्याने व्यापारतोलामध्ये सातत्याने असंतुलनाची स्थिती राहिलेली आहे. आलेख क्र. ०२ मध्ये भारताच्या व्यापार संतुलनाची स्थिती दर्शविण्यात आली आहे. १९९१-९२ ते २०२४-२५ या कालखंडासाठी देशाच्या व्यापार संतुलनाची प्रवृत्ती लक्षात घेता, त्यामध्ये लक्षणीय घट होत असल्याचे आढळून येते. १९९१-९२ ते २००९-२० पर्यंत देशातील इंधन तेल आणि बिगर-इंधन तेल व्यापार संतुलन कमी-अधिक प्रमाणात समान असल्याचे दिसून येते. २००९-१० ते २०१९-२० या कालावधीत बिगर-इंधन तेल व्यापार असंतुलनामध्ये वाढ तर इंधन तेल व्यापारतोल असंतुलानामध्ये घट झालेली आढळून येते. २०१९ नंतरच्या कालखंडात मात्र बिगर-इंधन तेल व्यापार असंतुलानामध्ये मोठी वाढ झाली असून, त्यामुळे देशाच्या एकंदर व्यापारतोलातील असंतुलानामध्ये मोठी वाढ होण्यास कारणीभूत ठरल्याचे स्पष्ट होते. याचाच अर्थ, सदर कालखंडात देशातील बिगर-इंधन तेल वस्तूंच्या उत्पादन आणि निर्यातीमध्ये लक्षणीय घट झाली आहे, असेच म्हणता येईल. अलीकडील काळात जागतिक पातळीवर घडणाऱ्या घडामोडींमुळे भारताच्या निर्यातीवर परिणाम होऊन व्यापार संतुलन आणखी ऋणात्मक होण्याची शक्यता आहे.

### अलीकडील काळातील भारताच्या आयात - निर्यातीत झालेले बदल

अलीकडील काळात जागतिक पातळीवर घडणाऱ्या घडामोडींमुळे जागतिक पातळीवर आणि भारताच्या

**आलेख. क्र. ०२ भारताचे व्यापार संतुलन (को.रु.)**




स्त्रोत: स्त्रोत:भारतीय रिजर्व्ह बँक अहवाल.

**तक्ता क्र. ०३ भारतातून प्रमुख देशांना होणारी निर्यात (दशलक्ष डॉलर)**

| अ. क्र. | देश | एप्रिल -२४ ते फेब्रु.-२५ | एप्रिल-२५ ते फेब्रु.-२६ | शेकडा बदल (%) |
|---|---|---|---|---|
| १ | अमेरिका | ७६३६४.९० | ७९२९५.०० | ३.८४ |
| २ | संयक्त अरब अमी. | ३३२४२.६८ | ३६०७३.९७ | ८.५२ |
| ३ | नेदरलँड | २०९७१.४२ | १६६५९.९१ | -२०.५६ |
| ४ | चीन | १२७४०.६२ | १७५३९.२२ | ३७.६६ |
| ५ | ब्रिटन | १३१६५.९२ | १२२४६.७५ | -६.९८ |
| ६ | सिंगापूर | १२०८९.२३ | ९५९२.९६ | -२०.६५ |
| ७ | सौदी अरब | १०७८५.२४ | ९७५५.९८ | -९.५४ |
| ८ | ऑस्ट्रेलिया | ७७७८.७४ | ६५७९.९० | -१५.४१ |
| ९ | फ्रान्स | ७२४२.८९ | ६४५९.३० | -१०.८२ |

स्त्रोत: वाणिज्य मंत्रालय, भारत सरकार

व्यापारावर झालेला परिणाम अभ्यासणे आवश्यक आहे. तक्ता क्र. ०३ मध्ये भारतातून प्रमुख देशांना होणाऱ्या निर्यात आणि केल्या जाणाऱ्या आयातीची एप्रिल २०२४ ते जानेवारी २०२५ आणि एप्रिल २०२५ ते जानेवारी २०२६ या दोन कालखंडासाठी आकडेवारी देण्यात आली आहे.

तक्ता क्र. ०३ मधील आकडेवारीनुसार फेब्रुवारी २०२५ मध्ये अमेरिकेने प्रशुल्क वाढीचा निर्णय घेतला.

त्यामुळे भारतातून अमेरिकेला होणाऱ्या निर्यातीवर काहीअंशी परिणाम झालेला असला, तरी एप्रिल २०२५ ते फेब्रु. २०२६ या काळात भारतातून अमेरिकेला होणाऱ्या निर्यातीमध्ये ३.८४% वाढ झाली आहे. याबरोबरच, याच कालखंडात चीनला होणाऱ्या निर्यातीमध्येही ३७.६६% एवढी लक्षणीय वाढ झाली आहे. असे असले तरी, भारताच्या एकूण निर्यातीमध्ये महत्त्वाचा वाटा असलेल्या नेदरलंड, ब्रिटन, सिंगापूर, ऑस्ट्रेलिया, फ्रान्स, सौदी अरब या देशांना होणाऱ्या निर्यातीत घट अनुभवास येते. दुसरीकडे, याच कालखंडात तक्ता क्र. ०४ मध्ये भारताच्या आयातीत मोठी वाढ होताना दिसते. भारताच्या एकूण आयातीमध्ये चीनचा सर्वाधिक वाटा आहे. या कालखंडात चीनमधून येणाऱ्या आयातीमध्ये १५.२१ टक्क्यांनी वाढ झाली आहे. तसेच अमेरिकेतून येणाऱ्या आयातीमध्येही या कालखंडात १५.६५% एवढी महत्त्वपूर्ण वाढ झालेली पाहावयास मिळते. हाँगकाँग, ब्रिटन, सिंगापूर, जपान, सौदी अरब या देशातून येणाऱ्या आयातीमध्येही लक्षणीय वाढ झाल्याचे आकडेवारीवरून दिसून येते. महत्त्वाचे म्हणजे रशियाकडून होणाऱ्या इंधन तेल आयातीत घट करण्याची अमेरिकेने भारताला घातलेली अट लक्षात घेता, भारताच्या रशियाकडील आयातीमध्ये मोठी घट अनुभवास येते. एप्रिल २०२५ ते फेब्रु. २०२६ या कालखंडात रशियाकडून होणाऱ्या आयातीमध्ये १२.२३%नी घट झाली आहे (तक्ता क्र. ०४). अमेरिकेने सुरू केलेल्या प्रशुल्क युद्धाचे परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर आणि व्यापारावर झाले असून, भारतातून अमेरिकेला होणाऱ्या निर्यातीचे प्रमाण कमी झाले असल्याचे तर आयातीचे प्रमाण वाढल्याचे आकडेवारीवरून दिसून येते.

**तक्ता क्र. ०४ भारतामध्ये प्रमुख देशांतून होणारी आयात (दशलक्ष डॉलर)**

| अ. क्र. | देश | एप्रिल -२४ ते फेब्रु.-२५ | एप्रिल-२५ ते फेब्रु.-२६ | शेकडा बदल (%) |
|---|---|---|---|---|
| १ | चीन | १०३७७१.८६ | ११९५५७.३० | १५.२१ |
| २ | संयुक्त अरब अमी. | ५५७२७.११ | ६१३०१.१४ | १०.०० |
| ३ | रशिया | ५८३०३.०४ | ५११७१.६० | -१२.२३ |
| ४ | अमेरिका | ४१८६०.३८ | ४८४०९.९२ | १५.६५ |
| ५ | सौदी अरब | २६८२८.९३ | २८७३०.९८ | ७.०९ |
| ६ | सिंगापूर | १९४७२.८४ | २२१६०.२२ | १३.८० |
| ७ | जपान | १७०८५.०२ | १९५९६.०३ | १४.६९ |
| ८ | हाँगकाँग | १७६५७.९५ | २२०७३.७६ | २५.०१ |
| ९ | ब्रिटन | ७८७१.६१ | १०८१२.६२ | ३७.३६ |

स्त्रोत: वाणिज्य मंत्रालय, भारत सरकार

जागतिक पातळीवर घडणाऱ्या घडामोडींचा मोठा फटका भारताला बसल्याचे भारताच्या आयात आणि निर्यातीच्या नुकत्याच जाहीर झालेल्या आकडेवारीवरून स्पष्ट होते. तक्ता क्र. ०५ मध्ये फेब्रुवारी, २०२५ आणि फेब्रुवारी, २०२६ या दोन कालखंडासाठी भारताच्या आयात आणि निर्यात आणि व्यापार संतुलनाची आकडेवारी देण्यात आली आहे. त्यानुसार फेब्रुवारी २०२५ च्या तुलनेत फेब्रुवारी २०२६ या महिन्यात

**तक्ता क्र. ०५ भारताचे व्यापार संतुलन ( दशलक्ष)**

| व्यापार | फेब्रुवारी २०२५ | फेब्रुवारी २०२६ | % बदल |
|---|---|---|---|
| निर्यात | ३६९६०.२५ | ३६६०९.२९ | -०.८२ |
| आयात | ५१३२५.९३ | ६३७१३.४९ | २४.१३ |
| व्यापार संतुलन | -१४४१८.०१ | -२७१०४.२० | -८८.०० |

स्त्रोत: वाणिज्य मंत्रालय, भारत सरकार.

भारताच्या निर्यातीत घट झाल्याचे तर आयातीत मोठी वाढ झाल्याचे पाहायला मिळते. या दोन कालखंडादरम्यान भारताच्या निर्यातीत ०.८२% एवढी घट तर आयातीत तब्बल २४.१३%नी वाढ झाल्याचे स्पष्ट होते. याचा परिणाम देशाच्या व्यापार संतुलानामध्ये घट होण्यावर झाला आहे. फेब्रुवारी २०२५ या महिन्यातील व्यापार संतुलनाच्या तुलनेत फेब्रुवारी २०२६ या महिन्यात भारताच्या व्यापार संतुलनात तब्बल ८८%नी घट झाल्याचे आकडेवारीवरून दिसून येते. जागतिक पातळीवर घडणाऱ्या विविध घडामोडींचा हा परिणाम म्हणता येईल.

**द्विपक्षीय करार आणि संभाव्य परिणाम**

**अमेरिकची प्रशुल्क वाढ आणि द्विपक्षीय करार**

अमेरिकेने ०२ एप्रिल २०२५ पासून भारतीय वस्तूंवरील प्रशुल्क २५% करण्याचा निर्णय घेतला होता. तर भारत रशियाकडून खनिज तेल खरेदी करत असल्याने भारतीय वस्तूंवर अतिरिक्त २५% एवढे प्रशुल्क आकारले. अशा प्रकारे भारतीय वस्तूंवर एकूण ५०% प्रशुल्क आकारण्यास सुरुवात झाली. त्याचा मोठा फटका भारतीय उद्योग, व्यवसायाला बसला. याचा परिणाम अमेरिकेत भारतीय वस्तू महाग झाल्याने त्यांची मागणी कमी होण्यावर झालेला दिसून येतो. त्यामुळे भारतातून अमेरिकेला होणाऱ्या निर्यातीमध्ये मोठी घट होऊन भारतीय व्यावसायिकांना त्याचा फटका सहन करावा लागला आहे. याबाबत समोर आलेल्या आकडेवारीनुसार भारताच्या निर्यातीमध्ये जवळपास ३८%ची घट अनुभवास आली. यामध्ये कापड आणि तयार कपडे, चामड्याची उत्पादने, रत्ने आणि जडजवाहिरे, सागरी उत्पादने आणि चहा यांसारख्या वस्तूंच्या निर्यातीवर मोठा परिणाम झाला असल्याचे आकडेवारीवरून दिसून येते. अमेरिकेने प्रशुल्क कमी करावे यासाठी भारताने व्यापार तडजोडी सुरू केल्या. या व्यापार तडजोडीतून आज भारत-अमेरिका यांच्यातील द्विपक्षीय व्यापार कराराची बोलणी अंतिम टप्प्यात पोहचली आहे. या व्यापार करारानुसार भारत अमेरिकेतून येणाऱ्या शुष्क मद्यार्क धान्ये, पशुखाद्यासाठीची लाल ज्वारी, काजू, बदाम, पिस्ता, अक्रोड, ताजी आणि प्रक्रिया केलेली फळे, सोयाबीन तेल, वाईन आणि स्पिरीट यावरील प्रशुल्क कमी अथवा काढून टाकणार असून, भारत येत्या पाच वर्षांत अमेरिकेतून तब्बल ५०० अब्ज डॉलर्सची आयात करणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे, तर दुसरीकडे भारतीय वस्तूंवर अमेरिका १८% आयात शुल्क आकारणार असल्याचे निश्चित करण्यात आले होते. मात्र अमेरिकन सर्वोच्च न्यायालयाने ट्रम्प सरकारला केलेल्या सूचनेनुसार हे आयात शुल्क १०%पर्यंत कमी होऊ शकते. या व्यापार तरतुदींचा विचार करता, भारतातील मका, सोयाबीन, द्राक्षे आणि इतर फळांच्या उत्पादकांसमोरील आर्थिक संकट अधिक गडद होण्याची शक्यता असून सोयाबीनसह विविध कृषी उत्पादनांच्या बाजार दरात झालेल्या घसरणीवरून त्याचा प्रत्यय येण्यास सुरुवात झाली आहे. भारताने या व्यापार वाटाघाटीमधून मका, कापूस, पोल्ट्री धान्ये

यांना बाहेर ठेवल्याचे म्हटले असले तरी, शुष्क मद्यार्क धान्याच्या आयातीमध्ये मक्क्यापासून बनवलेल्या पदार्थांचा समावेश केला गेल्यास देशातील अमेरिकन मका भारतीय बाजारपेठेत येऊ शकते. त्याचा फटका मका उत्पादकांना बसणार हे निश्चित. याबरोबरच अमेरिकेतून आयात केल्या जाणाऱ्या सोयाबीन तेलामुळे भारतातील सोयाबीनच्या किमती कमी होऊन सोयाबीन उत्पादक शेतकरी वर्गासोमोरील आर्थिक समस्या आणखी वाढू शकतात. तर बांगलादेशमधून येणाऱ्या कपड्यांवरील आयात शुल्क रद्द करण्याचा अमेरिकेचा निर्णय भारतातील कापड उद्योजक आणि कापूस उत्पादकांना अडचणीत आणणारा ठरू शकतो. भारत-अमेरिका व्यापार करारातील या तरतुदींचा विचार करता, त्या भारतीय शेती आणि उद्योग व्यावसायिकांसाठी प्रतिकूल राहाण्याचीच संभाव्यता आहे.

**भारत-युरोपीय संघ द्विपक्षीय व्यापार करार**

भारत आणि युरोपीय संघ यांच्यामध्ये द्विपक्षीय व्यापार होत असून, या कराराची बोलणी अंतिम टप्प्यात असून २७ जानेवारी २०२५ रोजी याबाबतची द्विपक्षीय व्यापार बैठक पार पडली आहे. त्याचे लवकरच करारात रूपांतर होणार आहे. मुळात भारत आणि युरोपीय संघ यांच्यामध्ये द्विपक्षीय व्यापार कराराच्या अनुषंगाने २००७ साली बोलणीला झालेली सुरुवात मोठ्या खंडानंतर आज ती अंतिम टप्प्यात पोहचली आहे. हा व्यापार करार दोन्ही बाजूंसाठी महत्त्वपूर्ण असून तो भारतासाठी अधिकाधिक लाभदायक कसा राहील यादृष्टीने विचार होणे आवश्यक आहे. २०२४-२५ च्या आकडेवारीनुसार भारतातून युरोपीय संघाला ६,४१,३००.३६ को.रु. एवढ्या किमतीची निर्यात तर युरोपीय संघाकडून ५,१३,३८९.४१ को.रु. एवढ्या किमतीची आयात झाली आहे. सध्यातरी या व्यापारामध्ये भारताला अधिक्य लाभत असल्याचे दिसत असले तरी, द्विपक्षीय व्यापार करारानंतर हे अधिक्य लाभेल का? हा खरा प्रश्न आहे. याचे कारण म्हणजे या करारातील तरतुदी होय. या तरतुदींनुसार युरोपीय संघ भारतातील सागरी उत्पादने, चामडी उत्पादने, अभियांत्रिकी, रसायने, कापड आणि तयार वस्त्रे, वैद्यकीय आणि संबंधित उत्पादने, यांसारख्या वस्तूंच्या आयातीवरील प्रशुल्कात घट करणार आहे. त्याचा भारताला लाभ होणार असून त्याबदल्यात भारत युरोपीय संघाकडून आयात केल्या जाणाऱ्या कारवरील आयात शुल्कात ११०%वरून १०%पर्यंत, रसायने, औषधे यांच्या आयातीवरील शुल्कात ०%पर्यंत, तर वाईनच्या आयात शुल्कात १५०%वरून ७५% आणि नंतर २०%पर्यंत घट करणार असून, प्रक्रिया केलेल्या अन्नपदार्थावरील आयात शुल्कातही ५०% घट करणार असल्याचे कराराच्या बोलणीत निश्चित करण्यात आले आहे. करारातील या तरतुदींचा विचार करता, कार आणि वाईनवरील शुल्कात होणाऱ्या कपातीमुळे भारतातील कार आणि वाईनरी उद्योगासोबतच ऑटोमोबाईल उद्योग आणि द्राक्ष उत्पादकांनाही मोठा फटका बसेल हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. तसेच औषधांवरील प्रशुल्कात होणारी घट औषधनिर्माण उद्योगासाठी तोट्याची ठरू शकते. युरोपीय संघासोबतच्या या व्यापार करारामुळे भारताच्या कृषी उत्पादनांच्या निर्यातीत वाढ होईल असे सांगितले जात असले तरी, भारतातून येणारी कृषी उत्पादने आणि अन्नपदार्थ हे आरोग्य आणि अन्नसुरक्षा नियमांशी बांधील राहातील, असे युरोपीय संघाने नमूद केले असल्याने युरोपीय संघाने आयातीवरील अप्रत्यक्ष बंधने मात्र कायम ठेवलेले दिसतात. त्यामुळे युरोपीय संघासोबत होणारा व्यापार करार भारतासाठी कितपत लाभदायक ठरेल, हे येणारा काळच ठरवेल.

**सारांश:**

थोडक्यात, जागतिक पातळीवर घडणाऱ्या घडामोडींचा जागतिक व्यापारावर विपरित परिणाम झाला असल्याचे आकडेवारीवरून दिसून येते. यामध्ये

प्रामुख्याने भारताच्या निर्यातीवर विपरित परिणाम झाला असून, देशाच्या आयातीत मोठी वाढ होताना आढळून येते. यादरम्यान भारताने अमेरिका, युरोपीय संघ यांच्यासोबत द्विपक्षीय व्यापार करारही निश्चित केले असून ते करार अंतिम टप्प्यात आले आहेत. हे व्यापार करार भारतासाठी लाभदायक ठरतील असे म्हटले जात असले, तरी त्यामुळे भारतीय शेतीक्षेत्राला तोटा होण्याची अधिक शक्यता असून त्यामुळे सोयाबीन, कापूस, फळे याबरोबरच इतरही पिकांचे उत्पादन घेणारे शेतकरी आर्थिक संकटात येणार असल्याची स्थिती आहे. तसेच या व्यापार करारांमुळे भारतीय उद्योगक्षेत्राला; लाभ होणार असल्याचे बोलले जात असले, तरी प्रत्यक्षात तो कितपत होईल, हे येणारा काळच ठरवेल.

**संदर्भ ग्रंथ सूची तथा संकेत स्थळ यादी :**


1) https://www.commerce.gov.in/whats-new/Date-22/02/25
2) https://www.niti.gov.in/sites/default/files/2024-12/Trade-Watch.pdf Date 18/02/26
3) https://www.rbi.org.in/Scripts/AnnualPublications.aspxhead=Handbook%20of%20Statistics%20on%20Indian%20Economy Date- 15/02/26
4) https://www.indiabudget.gov.in/ Date - 15/02/26
5) https://www.pmi.spglobal.com/ Date - 15/02/26


◆

मी बाँड नाही तर मी एक चालता बँकर आहे.

**- रघुराम राजन**

समस्या अशी आहे की उत्सर्जन उत्पादीत करणारे लोक त्या विशेषाधिकारांसाठी पैसे देत नाहीत आणि ज्यांचे नुकसान झाले आहे त्यांना मोबदला मिळत नाही.

**- विल्यम डी. बॉर्डहॉस**

# महाराष्ट्रातील मंदिरामुळे होणाऱ्या विकसित अर्थव्यवस्थेचे अध्ययन

**मृणालिनी नरेन्द्र तापसे**†

**प्रस्तावना**

परमात्मा जिथे राहातो ते स्थान म्हणजे मंदिर. मंदिर या संकल्पनेला आध्यात्मिक वारसा लाभला आहे. अर्थशास्त्र आणि मंदिर यांचा संबंध म्हणजे मंदिरांमुळे रोजगार मोठ्या प्रमाणात प्राप्त होतो. देणग्या, मालमत्ता आणि व्यावसायिक क्रियाकलपांमधून संपत्ती निर्माण होते. कोणत्याही आर्थिक क्रियाकलपांच्या तुलनेत मंदिरातून मिळणारी प्राप्ती ही सर्वात मोठी रक्कम आहे. मंदिरामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते. स्थानिक व्यवसाय वाढतात. पर्यटन वाढते. तसेच सामाजिक व सांस्कृतिक देवाणघेवाण सुलभ होते.

**संपत्ती आणि व्यवस्थापन**

राजे, राण्या आणि सामान्य लोकांनी दान केलेले सोने, चांदी मौल्यवान दगडांसारख्या मालमत्तांचा मंदिराकडे मोठा साठा असतो. देणग्या व्यतिरिक्त मंदिरांना मालमत्ता भाड्याने देणे आणि इतर व्यावसायिकांना उपक्रमामधूनही स्थिर उत्पन्न मिळते. या सर्व आर्थिक स्त्रोतांचा योग्य वापर करण्यासाठी मंदिराचे पद्धतशीर व्यवस्थापन आवश्यक आहे. जेणेकरून अर्थव्यवस्थेचा विकास होईल. देश-विदेशातील मंदिरे ही केवळ धर्म जागरणाचे पवित्र स्थानच नाही, तर स्थानिक अर्थव्यवस्थेचा कणाही मानली जातात. त्याच अनुषंगाने मंदिराचे महत्त्व तीर्थक्षेत्रांचा पर्यटनाच्या दृष्टिकोनातून विकास आणि अर्थव्यवस्थेचे सक्षमीकरण यांचा विचार केला आहे.

**मंदिराचे विविध स्तरावरील महत्त्व**

महाराष्ट्रातील मंदिरे देशातील समृद्ध धार्मिक मंदिरांपैकी आहे. भारतामध्ये २० लाखांहून अधिक मंदिरे आहेत. ज्यापैकी अनेक मंदिरे महान, श्रद्धा आणि चमत्कार यांची ठिकाणे मानली जातात. ती देशातीलच नव्हे तर जगभरातील भाविकांना आकर्षित करतात. त्यामुळे पर्यटनामुळे अर्थव्यवस्थेला बळ निर्माण होते. पर्यटकांमुळे हॉटेल, वाहतूक, स्थानिक वस्तूंची विक्री व इतर सेवा-व्यवसायांना गती मिळते. ज्यामुळे रोजगाराच्या संधी निर्माण होतात. मंदिरे ही केवळ धार्मिक स्थळे नसून ती एक मोठी अर्थव्यवस्था म्हणून काम करतात. जिथे देणग्या, पर्यटन स्थानिक अर्थव्यवस्थेचे पैलू एकमेकांशी जोडलेले असतात. मंदिराच्या आसपास स्थानिक व्यवसाय वाढतात. भाविकांना लागणाऱ्या वस्तू अन्ननिवास आणि स्थानिक

† अर्थशास्त्र विभाग प्रमुख, श्री निकेतन आर्ट्स, कॉमर्स कॉलेज, नागपूर

आजीव सभासद क्र. १०२८, भ्रमणध्वनी : ९९२१०२११८०, ईमेल : mrunalinitapase@gmail.com

कलाकुसर यांचा व्यापार वाढतो. देणग्या आणि ऑनलाईन दर्शनासारख्या डिजिटल उपक्रमामुळे मंदिराचे आर्थिक व्यवहार अधिक सुलभ होतात. यामुळे आर्थिक पारदर्शकता वाढते आणि व्यवसायाचा विस्तार होतो.

**मंदिराची अर्थव्यवस्था ही संकल्पना**

मंदिराची अर्थव्यवस्था ही प्राचीन संकल्पना आहे. जी मंदिराभोवती फिरणाऱ्या आर्थिक व सामाजिक व्यवस्थेला सूचित करते. ही संकल्पना मंदिरांना केवळ प्रार्थना स्थळे म्हणून नव्हे, तर आर्थिक व सामाजिक संस्था म्हणूनदेखील पाहाते. ज्या स्थानिक बाजारपेठा व्यापार, कला, कौशल्य आणि रोजगारांना चालना देतात. या व्यवस्थेत दान, देणग्या मंदिराच्या कामकाजातून निर्माण होणारे उत्पन्न यांचा समावेश होतो. मंदिरामुळे अर्थव्यवस्थेला गती मिळते आणि ती देशाच्या राष्ट्रीय उत्पादनामध्ये योगदान देते. यालाच टेंपल इकॉनॉमी म्हणतात. थोडक्यात, मंदिरे ही धार्मिक व सांस्कृतिक केंद्रे असून ती स्थानिक आणि राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावतात.

**मंदिराच्या अर्थव्यवस्थेचे स्वरूप**

आर्थिक केंद्रे-मंदिरे ही यात्रेकरू आणि व्यापारांसाठी आर्कषणाचे केंद्रे असतात. ज्यामुळे स्थानिक बाजारपेठा वाढतात आणि परिसराचा विकास होतो. भाविक मंदिरात मोठ्या प्रमाणात देणग्या देतात. सोने, चांदी, धान्य, इतर वस्तू दान करतात. हा निधी मंदिराच्या विकासासाठी वापरला जातो.

रोजगारनिर्मिती-मंदिरामुळे अनेक लोकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार मिळतो. मंदिरांना भेट यात पूजेचे साहित्य, हस्तकला, धार्मिक वस्तू, वाहतूक, व्यवसायिक हॉटेलमधील कामगार आणि इतर सेवा पुरविणाऱ्या अनेक लोकांसाठी ही मंदिरे रोजगाराचे साधन आहेत.

कला व संस्कृतीचा विकास-मंदिराच्या माध्यमातून कला व हस्तकलांना प्रोत्साहन मिळते. अनेक कारागीर मंदिरासाठी लागणाऱ्या वस्तू तयार करून आपला उदरनिर्वाह करतात. मंदिरांच्या धार्मिक विधी आणि उत्सवामुळे नृत्य, संगीत, नाटक, चित्रकला यांसारख्या कलाप्रकारांना प्रोत्साहन मिळते.

सामाजिक व आर्थिक आधार-मंदिराच्या माध्यमातून जमा झालेला निधीचा उपयोग सामाजिक कार्यासाठी केला जातो. यात गोशाळा, धर्मशाळा, शिक्षण, आरोग्यविषयक सुविधा उभारणे अशा उपक्रमांचा समावेश होतो. प्राचीन काळात मंदिरे, राजे व प्रजा यांच्यातील संबंधांना आधार देत होती. तसेच समाजात सामाजिक आणि आर्थिक स्थैर्य राखण्यात मदत करीत होती.

**आधुनिक काळातील महत्त्व**

आजही अनेक मंदिरांमुळे अर्थव्यवस्था विकसित झाली आहे. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण कार्यालयाच्या मते भारताच्या जीडीपीमध्ये मंदिराचे योगदान सुमारे २.३२% आहे. धार्मिक यात्रेला जाणारे ५५% हिंदू मध्यम आणि लहान आकाराच्या हॉटेलमध्ये राहातात. त्यापासून खूप मोठ्या प्रमाणात उत्पन्न प्राप्त होते. प्रवास आणि पर्यटन उद्योगाने भारतात ८० दशलक्ष लोकांना रोजगार दिला आहे. ज्याचा वार्षिक वृद्धिदर १९%पेक्षा जास्त आहे. गेल्या वर्षात २३४ अब्जपेक्षा जास्त महसूल सरकारी तिजोरीत आले आहेत. सरकारी अंदाजानुसार भारतातील सुमारे ८७% पर्यटक देशी आहेत. उर्वरित १३% पर्यटक विदेशी आहेत. या विभागाकडून केंद्र सरकारचा महसूल २०२२-२३ मध्ये १९,३४,७०६ कोटी रुपये आहे.

**शोधनिबंधाचा उद्देश**

१) अर्थव्यवस्थेत मंदिराचे महत्त्व अभ्यासणे.
२) नैतिकता, नीतिमत्ता, तात्त्विक मूल्ये याबाबी अर्थशास्त्राच्या विश्लेषणात अध्ययन करणे.
३) महाराष्ट्राच्या आध्यात्मिक, सामाजिक, सांस्कृतिक विकासाबाबत अध्ययन करणे.
४) मंदिरात होणाऱ्या आर्थिक व्यवहामुळे विकासाचे अध्ययन करणे.

५) महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेतील मंदिरांच्या भूमिकेचे अध्ययन करणे.

**संशोधनाची आवश्यकता व महत्त्व**

ह्या विषयावर संशोधनाची आवश्यकता आहे. देशातील मंदिरांचा लोकांशी भावनिक, आध्यात्मिक, सामाजिक, सांस्कृतिक असा संबंध असल्यामुळे, देशाची अर्थव्यवस्था बळकट होण्यामागे मंदिरांची भूमिका पाहाण्याची जिज्ञासा निर्माण झाली. त्यामुळे मंदिराची आणि देशाची अर्थव्यवस्था ह्याचे अध्ययन करणे महत्त्वाचे आहे.

**गृहीतके**

१) मंदिराची अर्थव्यवस्था विकसित झाल्यास देशाची अर्थव्यवस्था विकसित होईल.

२) मंदिराच्या अर्थव्यवस्थेमुळे लोकांना रोजगार प्राप्त होतो.

३) मंदिरामुळे आधारभूत संरचनेचा विकास झाला.

**संशोधन पद्धती**

सदर संशोधन हे वर्णनात्मक व विश्लेषणात्मक स्वरुपाचे आहे. अभ्यासामध्ये निवडलेल्या घटकांचे सद्यस्थितीतील आर्थिक परिणाम, प्रवृत्ती व त्यामागील कारणमीमांसा यांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. या संशोधनासाठी सन २०२५-२०२६ एक वर्षाचा कालावधी विचारात घेतला आहे. या कालावधीत उपलब्ध असलेल्या अद्ययावत माहितीच्या आधारे विश्लेषण केले आहे.

सदर संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम माहितीचे स्त्रोत वापरले आहेत. प्राथमिक माहिती स्त्रोतामद्ये सर्वेक्षण प्रत्यक्ष भेटी तर दुय्यम माहिती स्त्रोतामध्ये शासकिय अहवाल, मासिके, वृत्तपत्रे, संकेतस्थळे, वार्षिक अहवाल आणि संशोधन निबंध इत्यादी माहिती स्त्रोत वापरले आहेत.

**महाराष्ट्राच्या सात मंदिरांमुळे अर्थव्यवस्थेचा होणारा विकास**

महाराष्ट्राच्या सात मंदिरामुळे अर्थव्यवस्थेचा होणारा विकास मोठ्या प्रमाणात झालेला आहे. कोणत्याही आर्थिक क्रियाकलपांच्या तुलनेत मंदिरातून मिळणारी प्राप्ती ही सर्वात मोठी रक्कम आहे. मंदिराची एक वेगळी अर्थव्यवस्था आहे. मंदिरावर पूर्ण शहराचा विकास अवलंबून आहे. या शोधनिबंधात महाराष्ट्रातील मोठ्या सात मंदिरांचा समावेश केला आहे. १) नागपूरचे टेकडी गणपती मंदिर २) कोराडीचे जगदंबा मंदिर ३) पंढरपूरचे विठ्ठल-रूक्मिणी मंदिर ४) कोल्हापूरचे महालक्ष्मी मंदिर ५) तुळजापूरची तुळजाभवानी मंदिर ६) शिर्डीचे साईबाबा मंदिर ७) शेगावचे गजानन महाराज मंदिर या शोधनिबंधात महाराष्ट्रातील मंदिर संस्कृती इतकी अद्वितीय आहे हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. ती सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक आणि एकात्मिक पैलूंचे संतुलित मिश्रण आहे. मंदिर आधारित अर्थव्यवस्था ही मंदिराशी संबंधित असलेल्या सर्व लोकांच्या कल्याणाबल कार्य करीत आहे. काही मंदिरांचे सर्वाधिक उत्पन्न हे शैक्षणिक कार्यासाठी वापरले जातात. मंदिराच्या अर्थव्यवस्थेला कर्मचारी, सफाई कामगार, पुजारी, गायक व संगीतकार यांसारख्या मानवी संसाधनांची आवश्यकता असते. कामावर देखरेख करण्यासाठी, मंदिरातील कर्तव्ये पार पाडण्यासाठी मानवी संसाधने गरजेची आहेत. निधी, अन्न, फुले, वस्त्रे इत्यादी वस्तुसाठी आर्थिक संसाधनांची आवश्यकता असते. विधी, मंत्र, धर्माचे ज्ञान इत्यादींसाठी आध्यात्मिक संदर्भ यांसारख्या उपभोग्य वस्तूंची आवश्यकता असते. मंदिर हे केवळ पूजास्थळ नाही, तर ते लोकांच्या सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक जीवनाशी निगडित आहे. मोठ्या मंदिराच्या विशेषत: दैनंदिन दिनचर्येमुळे संगीतकार नर्तक, फुलवाले, स्वयंपाकी व इतर अनेकांना सतत रोजगार मिळतो. मंदिरांमध्ये फुलांना एक विशेष

स्थान आहे. मंदिरातील निर्माल्यापासून उद्‌बत्ती तयार केली जाते. चमेलीच्या फुलांना मंदिरामध्ये प्रचंड मागणी असल्यामुळे ते एक व्यावसायिक पीक बनले आहे. ज्यामुळे शेकडोहून अधिक लोकांना रोजी-रोटी मिळते. तसेच चरकसंहितेनुसार चमेलीचा सुगंध मन आणि शरीर शांत करण्यासाठी आणि निद्रानाश इत्यादी अनेक मानसिक समस्या दूर करण्यासाठी वापरला जातो. जी पर्यावरणपूरक, सौंदर्यात्मक, आनंददायी असतात. खजूर आणि केळी पिकविणाऱ्यांना उपजीविका देतात. ह्या सर्व विधी अर्थव्यवस्थेशी जोडले जातात.

चित्रकला, वास्तुकला, नृत्य, संगीतकार इत्यादी कला व संस्कृतीच्या प्रत्येक पैलूंचा समावेश मंदिराच्या अर्थव्यवस्थेत केला जातो. भारतात असे बरेच लोक आहेत ज्यांचे प्राथमिक उत्पन्न हस्तकला विकण्यापासून आहे. या मंदिरांना भेट देणारे लोक या हस्तकलांकडे आकर्षित होतात, हस्तकला निर्यातीत गुंतलेल्या व्यक्तींना बरीच प्राप्ती होते. ज्यामुळे चांगले जीवनमान निर्माण होते. २०२१-२२ या वर्षात २.१ अब्ज डॉलर्सची संधी होती. याचा एक महत्त्वाचा भाग मंदिर हस्तकलांना देण्यात आला. जे हिंदू धर्म प्रेरित डिझाईन प्रदर्शित करतात. मंदिर आधारित अर्थव्यवस्थेमध्ये योगदान देण्यात ही हस्तकला महत्त्वाची भूमिका बजावतात. भारतातील मंदिरे अर्थव्यवस्था बळकट करण्याचा प्रयत्न करीत आहे. पर्यटन वाढवून भारतात ७.५ लाख मंदिर आहेत. यापासून वार्षिक उत्पन्न २.५० लाख करोड उत्पन्न आहे.

### १. नागपुरातील टेकडी गणपती मंदिर

नागपूरचे हे मंदिर प्रसिद्ध आणि ऐतिहासिक ठिकाण आहे. ही गणपतीची मूर्ती एका शमीच्या झाडाखाली सापडली. त्यानंतर ती पिंपळाच्या झाडाखाली स्थापित करण्यात आली. जे सुमारे २५० वर्षांपूर्वी भोसले राज्यांच्या काळात बांधले गेले. हे मंदिर विदर्भातील अष्टविनायकापैकी एक मानले जाते. हे मंदिर नागपूर रेल्वे स्थानकाच्याजवळच सीताबर्डी टेकडीवर आहे. सुमारे १८व्या शतकात नागपूरच्या भोसले राज्याच्या काळात या मंदिराची स्थापना झाली. हे एक जागृत देवस्थान मानले जाते. जिथे गणपती देवता सतत जागृत आणि उपस्थित असते म्हणून हे मंदिर महत्त्वाचे व लोकप्रिय व धार्मिकदृष्टीने महत्त्वाचे स्थान मानले जाते. प्रसिद्ध व भोसलेकालीन टेकडी मंदिराला राज्य शासनाने 'अ' दर्जाचे पर्यटन स्थळ घोषित केले आहे. भोसले आणि ब्रिटिशांची लढाई ज्या ठिकाणी झाली त्याच ठिकाणी हे गणपतीचे मंदिर आहे. सुरुवातीला हे मंदिर खूपच लहान होते. त्यानंतर हळूहळू हे मंदिर मोठे करण्यात आले. आता त्यांचा विकास झाला आहे. येथे रोज हजारो भाविक दर्शनासाठी येतात. येथे भेट देणाऱ्या भाविकांच्या संख्येमुळे या मंदिराला 'अ' दर्जाचे पर्यटनस्थळ घोषित करण्यात आले. २०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस यांनी मंदिराला 'अ' दर्जाचे पर्यटन स्थळ घोषित करावे, अशा सूचना दिल्या. परंतु त्याची अंमलबजावणी ११ मार्च २०२४ ला झाली आणि या मंदिर विकासाचा मार्ग मोकळा झाला. या मंदिराच्यासमोर रोजगार प्राप्त करणाऱ्या लोकांची मुलाखत घेतली असता त्यांनी सांगितले की, रोजची उत्पन्न पातळी ही वेगवेगळी असते. सामान्यत: चतुर्थीच्या दिवशी व इतर विशिष्ट दिवशी उत्पन्न पातळीत वृद्धी होते; परंतु त्याचा स्पष्ट आकडा त्यांनी सांगितला नाही.

### २. श्री महालक्ष्मी जगदंबा मंदिर, कोराडी

कोराडी मंदिर हे नागपूर जिल्ह्यातील एक प्रसिद्ध आणि महत्त्वाचे महालक्ष्मी जगदंबा मंदिर आहे. जे शक्तिपीठापैकी एक मानले जाते. हे मंदिर नागपूर शहरापासून सुमारे १८.०६ किलोमीटर अंतरावर आहे आणि दरवर्षी लाखो भाविक दर्शनासाठी येतात. नवरात्रीत या मंदिराला विशेष महत्त्व आहे. देवी सतीच्या उजव्या खांद्याचा येथे एक भाग पडला असा एक समज आहे. कोराडी मंदिर हे भारतातील ५१ शक्तिपीठांपैकी

एक मानले जाते. नवरात्रीच्या काळी मंदिरात विशेष उत्साह असतो. पूर्वी या गावाला जाखापूर म्हणून ओळखले जात असे. मंदिरात देवीचे तीन रूपात दर्शन होते असा एक समज आहे. या मंदिरात विदर्भातून आणि लगतच्या राज्यातून भाविक येथे दर्शनासाठी येतात. नवसाला पावणारी देवी म्हणून भाविकांची अपार श्रद्धा आहे.

**मंदिराचे आर्थिक पैलू**

मंदिराच्या आर्थिक स्थितीबाबत व्यवस्थापनास विचारपूस केली असता त्यांनी देणग्या म्हणजे मंदिराच्या उत्पन्नाचा मुख्य स्रोत आहे. नवरात्रीत या देणग्यामध्ये भरपूर प्रमाणात वाढ होते. मंदिरांद्वारे प्रदान केल्या जाणाऱ्या काही सेवांमधूनही उत्पन्न मिळते. या सेवाशुल्कात पूजादर्शन आणि विशेष व्यवस्था केली जाते. सरकारी व सामाजिक योगदान मंदिर परिसर जिल्हा नियोजन समिती आणि महिला आर्थिक विकास महामंडळ यासारख्या संस्थांच्या सहकार्याने प्रकल्पावर काम केले जाते. हे मंदिर इतर वैद्यकीय शिबिरे आणि इतर सामाजिक उपक्रम राबविते. ज्यामध्ये देणग्यांचा वापर केला जातो. हे मंदिर आर्थिक व्यवस्थापनासाठी जबाबदार आहे. ज्यामध्ये देणग्या आणि खर्चाचा हिशेब ठेवला जातो. याबाबतची आकडेवारी देण्यास व्यवस्थापक इच्छुक नव्हते.

**३. पंढरपूरच्या विठ्ठल-रुक्मिणी मंदिराची अर्थव्यवस्था**

या मंदिराची अर्थव्यवस्था मुख्यत्वे धार्मिक पर्यटनावर अवलंबून आहे. या मंदिराला भेट देण्यासाठी देशभरातून भाविक येतात. ज्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते.

**पंढरपूरच्या मंदिराच्या अर्थव्यवस्थेचे घटक**

धार्मिक पर्यटन-आषाढी आणि कार्तिक एकादशीला येथे मोठी यात्रा भरते. या काळात भाविकांची मोठी गर्दी होते. ज्यामुळे हॉटेल, रेस्टॉरंट, दुकाने आणि वाहतूक क्षेत्राला फायदा होतो. मंदिरातील पूजा-अर्चा आणि भाविकांनी दिलेल्या दानातून मंदिराला उत्पन्न मिळते. मंदिराच्या परिसरातील स्थानिक व्यवसाय पुजेचे साहित्य, प्रसाद, स्थानिक वस्तू आणि इतर धार्मिक वस्तुच्या विक्रीतून स्थानिक व्यवसाय चालतात व यातूनच स्थानिक लोकांना रोजगार मिळतो. पंढरपूर शहराच्या आसपासच्या भागातून येणारे शेतकरी आणि व्यापार यांचाही अर्थव्यवस्थेशी संबंध येतो. पंढरपूरच्या वारीला १५ लाख वारकरी येतात. वर्षभरात ३ कोटी भाविक पर्यटक पंढरपुरात येतात. त्यामुळे या काळात इथल्या अर्थकारणाला मोठी चालना मिळते. इथे येणारा प्रत्येक वारकरी सरासरी ३०० ते ४०० रुपये खर्च करतो, त्यामुळे आषाढी वारी काळात पंढरपुरात ६० ते ७० कोट्यावधींची आर्थिक उलाढाल होते. आषाढी वारीत फूल व्यवसायिकांची एकूण आर्थिक उलाढाल ही जवळपास २५ लाख रुपये तसेच आषाढी वारी काळात प्रसाद विक्रीचा व्यवसाय तेजीत चालतो. यात साधारण १५० ते ५०० रुपयापर्यंत प्रतिकिलोप्रमाणे विक्री केली जाते. आषाढी वारी काळात ५० लाख रुपयांहून अधिक आर्थिक उलाढाल फक्त प्रसाद विक्रीतून होत असते. मंदिराच्या भक्त निवासामध्ये १२०० भाविक मुक्काम करू शकतात. यासाठी १००० ते १५०० रुपये दर आकारले जाते. या सर्व माध्यमातून या काळात मंदिर समितीला ९ ते १० कोटींचे उत्पन्न मिळते.

**प्रवासी वाहतुक सुविधा-**

आषाढी वारी काळात अनेक लोक तीर्थटन करीत असतात. पंढरपुरात जवळपास १२०० मठ आहेत. या काळात अनेक गावचे भाविक आपापल्या दिंडींच्या माध्यमातून मुक्कामी जातात. त्याचबरोबर आसपासच्या तीर्थस्थळांना भेटी देतात. त्यामुळे पंढरपुरात प्रवासी वाहतुकीच्या माध्यमातूनदेखील वारी काळात मोठ्या प्रमाणात म्हणजे १२ लाखांची आर्थिक उलाढाल होते. यामध्ये रिक्षा, टांगा, कार, जलप्रवास यांचा समावेश

होतो. घोडागाडीसाठी ३० ते १०० रुपये व जलप्रवासासाठी ५० ते १०० रुपये आकारले जातात. रिक्षा व इतर प्रवासी वाहनांचे दर प्रवासाच्या अंतरावर ठरलेले असतात.

**वारकरी निवासस्थाने**

आषाढी वारी काळात मोठ्या प्रमाणात पावसाची शक्यता असते. त्यामुळे प्रत्येक दिंड्या, पालख्या आपापल्या मठात निवाऱ्याची व्यवस्था करतात. जवळपास १७ लाख भाविक पंढरपुरात दाखल होत असल्याने भक्त निवास, हॉटेल्स, राहाण्यासाठी सुसज्ज केली जातात. पण यामध्ये सर्व वारकऱ्यांची सोय होऊ शकत नाही. अशा वेळी ज्या वारकऱ्यांना पंढरपुरात राहाण्याची आवश्यकता भासते. त्यांच्यासाठी स्थानिक नागरिक २०० रुपये घेऊन निवासाची सोय उपलब्ध करून देतात. या माध्यमातूनदेखील पंढरपुरातील अर्थकारणाला चालना मिळते. तीन दिवसांत पंढरपुरात ५० लाखांची आर्थिक उलाढाल होते.

**तुळशीच्या माळा**

आषाढी वारी काळात तुळशीच्या माळांना मोठ्या प्रमाणात मागणी असते. किमान ही माळा ३० रुपयापासून तर १०० रुपयापर्यंत किंमत असते. या माध्यमातून जवळपास ८ लाखांचे उत्पन्न प्राप्त होते.

**भजन, पूजन, अर्चा, साहित्य विक्री**

आषाढी वारी काळात अनेक वारकरी भजनाचे साहित्य खरेदी करतात. त्यामध्ये टाळ, मृदुंग, वीणा, ध्वनिक्षेपक यांची मोठ्या प्रमाणात खरेदी केली जाते. तसेच कुंकू, बुक्का, अष्टगंध, लाखेचे चुडे, बांगड्या, लाकडी देवघरे इत्यादी साहित्यांची देखील मोठ्या प्रमाणात विक्री केली जाते. या माध्यमातून पंढरपुरातील अर्थकारणात २५ लाखांची भर पडते.

**फोटो, पितळी आणि दगडी मूर्ती, तुळशी वृंदावन**

आषाढी वारी काळात पंढरपुरात पितळेच्या विठ्ठल रखुमाईच्या व इतर देवतांच्या मूर्तीला मोठ्या प्रमाणात मागणी असते. पंढरपुरात दगडी मुर्त्या बनविण्याचे कारखानेदेखील आहे. ४००० पासून १ लाखापर्यंत दगडी मूर्ती तसेच तुळसी वृंदावन यांची विक्री होते. थोडक्यात, ७० ते ८० लाखांपर्यंतची आर्थिक उलाढाल पंढरपूरच्या अर्थव्यवस्थेत होत असते.

**४. कोल्हापूरचे महालक्ष्मी मंदिरामुळे निर्माण होणाऱ्या अर्थव्यवस्थेचा विकास**

महालक्ष्मी मंदिर हे महाराष्ट्रातील कोल्हापूर शहरातील एक शक्तीपीठ आहे. हे मंदिर भारतातील प्रमुख देवी मंदिरापैकी एक असून अंबाबाई मंदिर म्हणून ओळखले जाते. या मंदिराला सुमारे १२०० वर्षांचा इतिहास आहे. येथे दरवर्षी लाखो भाविक दर्शनाला येत असतात. मंदिराची भव्य स्थापत्य कला प्राचीन इतिहास व धार्मिक महत्त्व यामुळे हे मंदिर भाविकांसाठी विशेष आर्कषणाचे केंद्र आहे. हे मंदिर केवळ धार्मिकच स्थळ नाही, तर ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा आहे.

कोल्हापूरच्या श्री महालक्ष्मी मंदिराच्या परिसरातील अर्थव्यवस्थेचा विकास मुख्यतः पर्यटनावर आधारित आहे. मंदिराला भेट देणाऱ्या भाविकांमुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते. यात हॉटेल रेस्टॉरंट, छोटे-मोठे व्यवसाय आणि स्थानिक कला वस्तुंच्या विक्रीतून रोजगार आणि उत्पन्न वाढते. पर्यटन, रोजगार, अन्न आणि पेय या व्यवसायामुळे कोल्हापूरचा विकास होत आहे. पर्यावरणाचे संर्वधन करणे व स्वच्छता राखणे आवश्यक आहे. यातूनच आधारभूत संरचनेचा विकास होत आहे.

**५. महाराष्ट्राची तुळजापूरच्या तुळजाभवानी मंदिरामुळे होणाऱ्या अर्थव्यवस्थेचा विकास**

तुळजाभवानी मंदिर विकासासाठी १८६५ कोटी रुपयांचा आराखडा नियोजन विभागाने मंजूर केला असून, यासंबंधीच्या भूसंपादनासाठी १८.८९ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहे. राज्यातील तीर्थक्षेत्राचा विकास करण्यात येत असून यासाठी निधी उपलब्ध करण्यात

आला आहे. त्याची अंमलबजावणी धाराशिव जिल्हाधिकाऱ्याच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वात नियोजन विभागाने तुळजापूर येथील श्री क्षेत्र तुळजाभवानी देवी मंदिर विकासासाठी एक हजार आठसे पासष्ट कोटी रुपयांच्या आराखड्यास प्रशासकीय मान्यता दिली होती. महाराष्ट्राची कुलस्वामिनी म्हणून ओळख असलेल्या श्री तुळजाभवानी देवीचे साडेतीन शक्तिपीठांपैकी आदिशक्तीचे मूळस्थान उस्मानाबाद जिल्ह्याच्या तुळजापूर शहरात आहे. जे सोलापूरपासून ४६ किलोमीटर आणि लातूरपासून ७६ किलोमीटर अंतरावर आहे. देवीच्या दर्शनासाठी वर्षभर भाविक मोठ्या संख्येने येतात. छत्रपती शिवाजी महाराज येथे वारंवार दर्शनासाठी येत होते. शिवाजी महाराजांना तलवार देणारी आणि हिंदवी स्वराज्यासाठी आशीर्वाद देणारी देवी मानली जाते. या देवीला महिषासूरमर्दिनी, तुकाई, रामवरदायिनी आणि जगदंबा अशा नावांनी ओळखले जाते. मंदिराचा काही भाग हेमाडपंती आहे. हे मंदिर यादवकालीन मानले जाते. मंदिराच्या धार्मिक पूजेचे व्यवस्थापन व पुरोहितांचे अधिकार फक्त अणे भोपे कुळाकडे आहेत. नवरात्रीच्या काळात मोठा उत्सव असतो तसेच भक्तांची गर्दी असते. ऐतिहासिक, आध्यात्मिक, सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाच्या तुळजाभवानी देवस्थानच्या विकासाच्या दृष्टीने हा शासन निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

**तुळजाभवानी मंदिरामुळे निर्माण होणारे व्यवसाय**

तुळजाभवानी मंदिरामुळे बरेच व्यवसाय निर्माण झाले. हे स्थळ हिंदूंचे धार्मिक स्थळ म्हणून महत्त्वाचे मानले जाते. यात पुजा-अर्चा, धार्मिक अनुष्ठान दर्शनामुळे अनेक व्यवसाय अस्तित्वात आहेत. याशिवाय दुकाने, हॉटेल, धर्मशाळा निर्माण झाल्या आहेत. पौरोहित्य, फूलविक्रेता, प्रसाद विक्रेता, भोजन व पेय पदार्थ, गाईड, अन्य सेवांमध्ये परिवहन, फोटोग्राफी इत्यादी व्यवसायांपासून १०० करोड रुपये पर्यटकांकडून व्यवसायिकांना प्राप्त होतात.

**६. शिर्डीचे साईबाबा मंदिर**

शिर्डी महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध धार्मिक स्थळ आहे. जेथे साईबाबा मंदिर आहे तेथे साईबाबांनी आपले आयुष्य याच गावी व्यतीत केले आणि भक्तांमध्ये 'सबका मालिक एक' हा संदेश दिला. शिर्डीचे साईबाबा मंदिर मुख्य आकर्षण आहे आणि येथे देशभरातून भाविक दर्शनासाठी येतात. साईबाबांनी शिर्डीमध्ये ६० वर्षे राहून मानव जातींची सेवा केली आहे. येथूनच जगाला मानवता कल्याण, एकात्मतेची अमूल्य शिकवण साईबाबांनी दिली. श्रद्धा व सबुरीचा महामंत्र दिला. साईबाबांच्या मुख्य मंदिरातील गाभारा हा सोन्याने मढविला आहे. या मंदिरात सोने, चांदी, पैसा खूप मोठ्या प्रमाणात प्राप्त होतो. या मंदिराच्या प्राप्तीमुळे जी.एस.डी.पी.मध्ये १.३ ने वृद्धीही होत असते. प्रत्येक व्यक्तीच्या उत्पन्नात २६% वृद्धी झालेली दिसून येते. ३५० करोड रुपये दरवर्षी प्राप्त होतात. शिर्डी साईबाबा मंदिराचे उत्पन्न २०२३-२४ या आर्थिक वर्षात सुमारे ९०० कोटी रुपये होते. असे एका अहवालानुसार टाइम्स ऑफ इंडिया श्री साईबाबा संस्थान ट्रस्टने सांगितले आहे. २०२०-२१ च्या कोरोना महामारीमुळे उत्पन्नावर परिणाम झाला होता. परंतु त्यानंतर ते पुन्हा वाढले आहे. महामारीच्या पूर्वीच्या स्तराला मागे टाकले आहे. आर्थिक वर्ष २०१९-२० या वर्षी उत्पन्न कमी झाले होते, ज्यात १७४ कोटी रुपयांची घट झाली होती. आर्थिक वर्ष २०२०-२१ या वर्षी हे उत्पन्न ८०० रुपये कोटींच्या आसपास होते. जे कोविड पूर्वकालावधीपेक्षा जास्त होते. आर्थिक वर्ष २०२३-२४ यावर्षी ९०० कोटी रुपये उत्पन्न प्राप्त झाले. दैनंदिन उत्पन्न ४५ लाख रुपयापर्यंत पोहचले आहे. ५वर्षांपूर्वी ते २० लाख रुपये होते. २०२४-२५ यावर्षी ९०० कोटी रुपये उत्पन्न नोंदविले आहे. या मंदिरात २०२२-२३ मध्ये दररोज भाविकांची संख्या सुमारे ६०,००० होती. सणांना ह्या

संख्येत वाढ होत आहे. गेल्या आर्थिक वर्षात भाविकांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली. कारण साथीच्या काळात बरेच लोक शिर्डीला जाऊ शकले नव्हते. २०२४-२५ मध्ये मंदिर परिसरात ठेवलेल्या दानपेट्यांमध्ये २०० कोटी रुपयांची रोकड जमा झाली. शिवाय मंदिराला ऑनलाईन देणग्याही मिळाल्या. अनेक भाविकांनी सोने, चांदीच्या दागिन्यांचे दान केले. मंदिराकडे एका वर्षाच्या कालावधीसाठी वेगवेगळ्या बँकांमध्ये २५०० कोटी रुपयांच्या मुदत ठेवी आहेत. त्यामुळे मोठे व्याज मिळते. प्रसादालयाचा मोठा खर्च हा व्याजदरातूनच होत असतो. ७००० कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांना पगार दिला जातो. त्यांना चार शैक्षणिक संस्थांच्या व्यवस्थापनावर व निवासस्थानाची योग्य देखभाल करण्यासाठी खर्च करावा लागतो.

**७. शेगावचे गजानन महाराज मंदिरामुळे निर्माण झालेला विकास**

शेगावचे गजानन महाराज मंदिर हे महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे. जे श्री संत गजानन महाराजांच्या समाधीस्थळी बांधले आहे. हे मंदिर विदर्भातील सर्वात मोठे मंदिर ट्रस्ट असलेल्या श्री संत गजानन संस्थानद्वारे चालविले जाते. दररोज सुमारे ४५००० भाविकांना महाप्रसाद दिला जातो. विदर्भाचे पंढरपूर म्हणून ओळखले जाते. हजारो भाविक दर्शनासाठी येतात. श्रींचा प्रगट दिन २३ फेब्रुवारी १८७८ रोजी आहे. शेगावमध्ये एका भव्य वटवृक्षाखाली प्रगट झाले. महाराज १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २० व्या शतकाच्या सुरुवातीला वास्तव्य करीत होते. त्यांनी त्यांचे आयुष्य शेगावमध्ये घालविले होते. जिथे त्यांना ८ सप्टेंबर १९१० रोजी समाधी मिळाली. श्रींचे स्मारक व्हावे म्हणून दिनांक १२/०९/१९०८ रोजी १२ विश्वस्तांची विश्वस्त संस्था एकमताने श्रींच्या समक्ष स्थापन झाली. या संस्थेचे विशेष म्हणजे श्री हयात असताना शेगावच्या मंदिराची निर्मिती झाली. गजानन महाराज मंदिरामुळे १५० करोड रुपये दरवर्षाला प्राप्त होतात. भक्तनिवास आनंद विहारात १५० रूम्स ७२ डॉमेंट्रिज असून टेंट देखील उपलब्ध आहेत. तसेच ५००० बेडची क्षमता आहे. त्यापासूनसुद्धा संस्थेला मोठ्या प्रमाणात प्राप्ती होते. मंदिर संस्थानकडून पंढरपूरसाठी १९६८ पासून पायी दिंडी काढली जाते. जी भक्ती आणि ज्ञानाचा प्रसार करते. मंदिर अर्थव्यवस्था आणि संशोधन क्षेत्र या दोन्हीमध्ये विकास होत आहे, परंतु त्याची दिशा व परिणाम वेगळे आहेत. मंदिराच्या आसपासच्या अर्थव्यवस्थेत सुधारणा होत असून, संशोधनात नवीन तंत्रज्ञान आणि दृष्टिकोन यांचा समावेश होत आहे. शेगावच्या व्यवस्थापनाला देणग्या ऑनलाईनही व इतर स्वरूपात दिल्या जातात. यातून या संस्थानांना मोठ्या प्रमाणात महसूल प्राप्त होतो. दरवर्षाला करोडो रुपये प्राप्त होतात.

**निष्कर्ष**

मंदिरे आता केवळ धार्मिक स्थळे न राहाता पर्यटन स्थानिक व्यवसाय सांस्कृतिक कार्याचे केंद्र बनत आहेत. मंदिराशी संबंधित अर्थव्यवस्था मोठी आहे आणि ती रोजगार व्यवसाय आणि उत्पन्नाचे साधन बनत आहे. मंदिराच्या परिसरात छोटे-मोठे व्यवसाय, हॉटेल्स, उपहार गृहे, हस्तकला केंद्रे आणि स्थानिक बाजारपेठा विकसित होत आहेत. तसेच आधारभूत संरचनांचा विकास होत आहे. या मंदिरांमुळे महाराष्ट्राचा विकास निश्चितच होईल.

**संदर्भ ग्रंथसूची**


१. अर्थव्यवस्था ऑफ मंदिर (Temple Ebonyom)- Dr. Porf.Poornima Tapar-19 Feb 2024- https://www.newrbharati.bom

२. कोल्हापूर विकिपीडीया https://mr.wikipedia.org

३. गजानन महाराज मंदिर शेगाव-जानकारी तथ्य

आणि इतिहास.
https:// The templeguru.com

४. जाग्रण- अर्थव्यवस्था मे मंदिरों का योगदान रोजगार सृजन में भी अहम् योगदान-१५ जून २०२३, httpr://WWW.jagran.bom

५. तुळजाभवानी टेंपल विकिपीडीया- https://en.wikipedia.org

६. पंढरपूर विकिपीडीया
https:// www.newsbharati.com

७. भारताची मंदिर अर्थव्यवस्था किती मोठी? अनेक देशांचा जीडीपी यासमोर कमी-३० Debember 2023- P.M. Modi यांचे भाषण

८. मंदिरे, तीर्थक्षेत्राचा पर्यटन विकास व अर्थव्यवस्थेला बळ - १७ मार्च२०२३, mahamtb.bom Mumbai Tarun Bharat

९. मंदिर व्यवस्थेभोवती गुंफलेली हिंदू जीवनपद्धती -२२ मार्च २०२४ -by team NB Marathi

१०. मंदिर व भारतीय अर्थव्यवस्था : एक चिंतन - ४ मे २००९ प्रावक्ता ब्युरो
https :// www.Pravakta.bom

११. शिर्डी विकिपीडीया-. https://en.wikipedia.org

◆

## निवेदन : अर्थसंवाद वर्गणी

अर्थसंवाद अंकाचे वर्गणीदार होऊ इच्छिणाऱ्या महाविद्यालय / शैक्षणिक संस्था / व्यावसायिक संस्था/ग्रंथालये यांच्यासाठी **त्रैवार्षिक वर्गणी रु. २०००/- तर पंचवार्षिक वर्गणी रु. ३०००/-** आहे. ही वर्गणी कृपया 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने राष्ट्रीयीकृत बँकेच्या डिमांड ड्राफ्टद्वारे किंवा संपादकांशी संपर्क साधून NEFT (मराठी अर्थशास्त्र परिषद, बँक ऑफ इंडिया, राजारामपुरी, कोल्हापूर. खाते क्र. : 094720110000368, IFSC : BKID0000947) द्वारे पाठवावी. **मनिऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.** सदर वर्गणी कृपया प्रमुख संपादकाच्या पुढील पत्त्यावर कव्हरिंग लेटरसह पाठवावी.

**डॉ. राहुल शं. म्होपरे**
'सर' निवास, री.स.नं. ३३/क/२, प्लॉट नं. १८, लेक व्ह्यू कॉलनी, दीपा गॅस गोडावूनच्या पाठीमागे, उजळाईवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर - ४१६ ००४ भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# AI आणि भारताचा लोकसंख्यात्मक लाभ : रोजगारातून सर्वसमावेशक विकासाकडे

**नारायण नामदेव राऊत** [†]

**प्रस्तावना**

भारत जगातील सर्वात तरुण लोकसंख्यापैकी एक देश असून मध्यम वय सुमारे २७-२८ वर्षे आहे. ही रचना लोकसंख्यात्मक लाभ म्हणून ओळखली जाते. भारतासाठी हे आर्थिक संधीचे महत्त्वाचे लक्षण असू शकते. जेव्हा कार्यक्षम वयोगटातील लोकसंख्या अवलंबित लोकसंख्येपेक्षा वेगाने वाढते आणि उत्पादन प्रक्रियेत अधिक प्रमाणात सहभागी होते, तेव्हा निर्माण होणाऱ्या आर्थिक संधींना 'लोकसंख्यात्मक लाभ' म्हणतात. अलीकडील कामगार बाजारातील प्रवृत्ती दर्शवते की, रोजगाराची एकूण पातळी काही प्रमाणात सुधारली असली तरी नव्याने निर्माण होणाऱ्या रोजगारसंधीचा मोठा भाग हा अनौपचारिक व कमी उत्पादकतेचा दिसून येतो.

भारतात दरवर्षी सुमारे १० ते १२ दशलक्ष लोक कार्यक्षम लोकसंख्येत जोडले जातात. त्यामुळे रोजगारनिर्मिती ही केवळ धोरणात्मक प्राधान्य नसून ती व्यापक आर्थिक आवश्यकता बनली आहे. ही लोकसंख्यात्मक संक्रमण प्रक्रिया केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पामध्ये अधोरेखित होत असलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ता व डिजिटल तंत्रज्ञानावरील नव्या धोरणाशी समांतर घडत असून, ज्यात डिजिटल क्षमताना भविष्यातील आर्थिक विकासाचा प्रमुख चालक मानले जाऊ शकते.

AI आणि डिजिटल तंत्रज्ञान हे अर्थव्यवस्थेला अधिक कार्यक्षम बनवत असून उत्पादन, सेवा आणि प्रशासनाच्या पद्धतीमध्ये वेगाने बदल घडवत आहेत. या तांत्रिक परिवर्तनाचा वेग लोकसंख्यात्मक लाभाच्या टप्प्याशी जुळवून घेण्यासाठी मानवी कौशल्ये आणि संस्थात्मक क्षमता यांच्यावर नव्या प्रकारचा दबाव निर्माण होत आहेत. AI हे लोकसंख्यात्मक लाभाला बळकटी देईल की त्याला मर्यादित करेल, हे आज घेतल्या जाणाऱ्या धोरणात्मक निर्णयावर अवलंबून आहे. त्यामुळे मूलभूत प्रश्न असा उभा राहातो की, भारत हा लोकसंख्यात्मक संधीच्या कालखंडात तांत्रिक परिवर्तन व श्रमशक्ती यांचे प्रभावी समन्वयन साधू शकतो का? तांत्रिक परिवर्तन रोजगारनिर्मिती आणि कौशल्यविकासाशी जोडले गेले नाही, तर लोकसंख्यात्मक लाभ आर्थिक संधी न ठरता संरचनात्मक बेरोजगारीचे कारण ठरू शकते. या लेखाचा मुख्य हेतू

[†] एम.एस्सी. अर्थशास्त्र, गोखले अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र संस्था, पुणे
आजीव सभासद क्र. २१७३, भ्रमणध्वनी : ८०१०२२९२२८, ईमेल : rautnarayan4141@gmail.com

भारताचा लोकसंख्यात्मक लाभ आणि AI आधारित आर्थिक संरचनेतील परस्परसंबंधाचे विश्लेषण करणे हा आहे. तसेच मानवी भांडवल, कौशल्यविकास व ग्रामीण परिवर्तन यांच्या माध्यमातून विकास धोरणाचा पुनर्विचार करण्याचा प्रयत्न यात करण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर पुढील प्रश्न विचारात घेता भारताचा लोकसंख्यात्मक लाभ व AI आधारित तांत्रिक प्रगती यांचे रूपांतर रोजगारसमृद्ध आणि सर्वसमावेशक अशा आर्थिक विकासात कशा प्रकारे करता येऊ शकतो? तसेच या प्रक्रियेत मानवी भांडवल, कौशल्यधोरणे व शासकीय हस्तक्षेप याची नेमकी भूमिका काय असावी?

**भारतातील श्रमबाजारातील संरचनात्मक परिवर्तन**

१९९१ नंतरच्या आर्थिक उदारीकरणामुळे भारतात सेवाक्षेत्राचा वेगाने झालेल्या विस्तारामुळे GDP वाढीस महत्त्वपूर्ण चालना मिळाली. तथापि, उत्पादन क्षेत्राने वाढत्या श्रमशक्तीला सामावून घेईल इतक्या प्रमाणात रोजगार निर्माण केला नाही, ज्यामुळे Jobless growth स्वरूपाची प्रवृत्ती दिसून आली. परिणामी, मोठ्या प्रमाणावर कामगार असंघटित क्षेत्र व स्वयंरोजगाराकडे वळले, ज्यात कमी वेतन, सामाजिक सुरक्षेचा अभाव व अस्थिर उत्पन्न ही वैशिष्ट्ये आढळतात. आज भारतात जवळपास ८०-८५ टक्के कामगार असंघटित क्षेत्रात सहभागी आहेत. ज्यात उत्पादकता व उत्पन्न स्थिरता मर्यादित राहते. महिलाचा श्रमशक्तीतील सहभागात काही प्रमाणात सुधारणा झाली असली तरी अनेक महिला अजूनही अल्पउत्पादक, असुरक्षित रोजगारकेंद्रित आहेत. आंतरराष्ट्रीय अनुभव दर्शवितो की, केवळ लोकसंख्यात्मक लाभ आपोआप आर्थिक वाढ घडवत नाही. पूर्व आशियातील देशांनी शिक्षण, आरोग्य आणि तंत्रज्ञान स्वीकृती यात दीर्घकालीन गुंतवणुक करून लोकसंख्यात्मक बदलाचे उत्पादक आर्थिक वाढीत रूपांतर केलेले आहे. त्यांच्या यशामागे मानवी भांडवलातील सतत गुंतवणूक,औद्योगिक धोरण आणि बदलत्या तंत्रज्ञानानुसार कौशल्यविकास प्रणालीत सातत्याने केलेले सुधार हे घटक निर्णायक ठरते. त्यामुळे भारताने केवळ तंत्रज्ञान स्वीकारण्यावर भर न देता मानवी भांडवल, कौशल्य संरचना आणि रोजगारनिर्मिती यांना तंत्रज्ञान धोरणाशी एकत्रित करणारा मार्ग स्वीकारणे आवश्यक आहे.

**AI आणि रोजगार; स्वयंचलन, पूरकता आणि रोजगारनिर्मिती**

या लेखात AI चा रोजगारावरील परिणाम स्वयंचलन, पूरकता आणि नव्या रोजगारनिर्मिती या तीन सैद्धांतिक चौकटीत विश्लेषित केला आहे. आधुनिक अर्थव्यवस्थेत उत्पादन प्रक्रिया, श्रमवाटप आणि कौशल्य संरचनेत मूलभूत बदल घडवून आणणारी क्रांती म्हणून उदयास येत आहे. रोजगारावरील AI चा परिणाम समजून घेण्यासाठी नोकऱ्या जातील की वाढतील हा पुरेसा ठरणारा प्रश्न नाही. कारण AI एकाच वेळी स्वयंचलन, मानवी क्षमतेची पूरक वाढ आणि नव्या प्रकारच्या रोजगाराची निर्मिती या तिन्ही प्रक्रिया घडविते. नीती आयोगाच्या विश्लेषणानुसार, योग्य धोरणात्मक हस्तक्षेप न झाल्यास २०२९ पर्यंत सुमारे १.५ दशलक्ष रोजगारावर तांत्रिक दबाव येऊ शकतो. परंतु कौशल्यविकास, AI शिक्षण आणि तंत्रज्ञानाचा परिणाम, कारण, स्वीकार यांची सांगड घातल्यास त्याच कालावधीत सुमारे ४ दशलक्ष नवीन रोजगारनिर्मितीची क्षमता AI मध्ये आहे. (नीती आयोग) यावरून स्पष्ट होते की, AI चा परिणाम केवळ तंत्रज्ञानाच्या स्वरूपावर अवलंबून नसून मानवी भांडवल, शिक्षण प्रणालीतील बदल, कौशल्यविकासाची गती आणि स्वीकारल्या जाणाऱ्या सार्वजनिक धोरणाच्या प्रभावीतेवर अवलंबून असतो.

**स्वयंचलन** (Automation)

AIचा पहिला परिणाम म्हणजे कामाचे स्वयंचलन. ज्या कार्यात नियमितता आणि पुनरावृत्ती असते जसं की माहिती प्रक्रिया, प्राथमिक विश्लेषण,

दस्ताऐवजीकरण व ग्राहकांच्या चौकशा ही कामे आता यंत्राकडे वळली आहेत. एका अभ्यासानुसार, भारतातील IT क्षेत्रात सुमारे ६९% विद्यमान नोकऱ्या पुढील दोन दशकात स्वयंचलन धोका (Automation Risk) ला सामोरे जाऊ शकतात. (नीती आयोग) तथापि, याचा अर्थ नोकऱ्या पूर्णत: नाहीशा होणार नसून, नोकऱ्यातील कामाचे पुनर्वितरण होणार आहे. उदाहरणार्थ, पूर्वी बँक कर्मचारी फॉर्म तपासणी आणि माहिती नोंदणी करायचे. परंतु आता ग्राहकांना आर्थिक सल्ला देणे आणि जोखमीचे विश्लेषण करणे अशी अधिक कौशल्याची कामे बँकेतील कर्मचारी करत आहेत.

AI मुळे सॉफ्टवेअर विकास क्षेत्रातील कामाच्या पद्धतीत मोठ्या प्रमाणावर बदल झालेला असून त्यामुळे उत्पादकतेत सुमारे १०-२०% वाढ दिसून येते. इतर काही क्षेत्रामध्ये १५ ते २५% पर्यंत कार्यक्षमता वाढल्याचे दिसते, तर काही प्रकरणांमध्ये उत्पन्ननिर्मितीचा वेग ५०%पर्यंत वाढल्याची नोंद आहे. (नीती आयोग) परिणामी, तेच काम कमी वेळात आणि कमी श्रमात पूर्ण होऊ लागते यालाच उत्पादकतेचे संकुचन (Productivity Compression) असे संबोधले जाते. लॉजिस्टिक्स, वित्तीय सेवा, आरोग्य क्षेत्रात AI आधारित निर्णयप्रक्रियेमुळे खर्चात घट, अचूकतेत वाढ आणि संसाधनाचा अधिक परिणामकारक वापर होत असल्याचे दिसून येते.

**पूरकता** (Augmentation)

AI चा दुसरा आणि दीर्घकालीन परिणाम म्हणजे मानवी श्रमाची क्षमता वाढवणे हा आहे. अनेक उद्योगामध्ये AI नियमित आणि डेटा आधारित प्रक्रिया हाताळतो, तर मानव विश्लेषण निर्णयप्रक्रिया आणि देखरेख यावर लक्ष केंद्रित करतो. AI मुळे कामगाराची भूमिका केवळ कार्य करणाऱ्यापासून निर्णयाधारित व्यवसायिकाच्या भूमिकेकडे बदल होत आहे. त्यामुळे ग्राहकाच्या सेवाक्षेत्रात लक्षणीय बदल झाला असून सामान्य प्रश्न तात्काळ हाताळणे अधिक सुलभ झाले. परिणामी, मानवी कर्मचारी अधिक गुंतागुंतीच्या आणि विश्लेषणाधारित समस्यांवर लक्ष केंद्रित करू लागले. AI च्या सहकार्यामुळे उत्पादकता व सेवा गुणवत्ता या दोन्ही वाढल्या असून, त्यातून संस्थात्मक कार्यक्षमता वाढली आणि नव्या प्रकारच्या कौशल्याची मागणी निर्माण झाली. अर्थशास्त्रीय भाषेत हे मानव-यंत्रणा पूरकता (Human-Machine Complementarity) चे उदाहरण मानले जाते. जिथे तंत्रज्ञान श्रमाची जागा घेत नाही, तर त्याचे सीमांत उत्पादन वाढवते.

**रोजगारनिर्मिती** (Job Creation)

स्वयंचलन आणि पूरकता यांच्या संयुक्त परिणामातून नवीन उद्योग आणि रोजगारनिर्मितीच्या संधी निर्माण होतात. २०३० पर्यंत डिजिटल अर्थव्यवस्था भारताच्या GDP मध्ये ५०० अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक योगदान देईल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या प्रक्रियेत माहिती विश्लेषण, सायबर सुरक्षा, डेटा व्यवस्थापक, क्लाऊड सेवा, स्मार्ट पायाभूत सुविधा आणि प्रगत संशोधन क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा दिसते.

IT क्षेत्रातील आकडेवारी या संक्रमणाचे चित्र स्पष्ट करते. सध्या या क्षेत्रात सुमारे ७.५ ते ८ दशलक्ष लोक कार्यरत आहेत. परंतु तांत्रिक बदलांना योग्य प्रतिसाद न दिल्यास ही संख्या सुमारे ६ दशलक्षपर्यंत कमी होऊ शकते. परंतु AI संबंधित सेवांचा प्रभावी विस्तार, पुनर्प्रशिक्षण व योग्य धोरणात्मक हस्तक्षेप स्वीकारल्यास रोजगारसंख्या १० दशलक्षपर्यंत वाढण्याची दाट शक्यता आहे. ग्राहक सेवा आणि BPO क्षेत्रात सध्या २ ते २.५ दशलक्ष रोजगार आहेत, योग्य डिजिटल धोरण राबविल्यास ही संख्या सुमारे ३.१ दशलक्षपर्यंत वाढू शकते. (नीती आयोग) यावरून असे स्पष्ट होते की, AI रोजगार पूर्णत: नष्ट करत नसून कमी मूल्यवर्धित कामाऐवजी उच्च मूल्यवर्धित सेवा निर्माण करण्याकडे

अर्थव्यवस्थेला वळवतो. जर कौशल्यविकासाची गती तंत्रज्ञानाच्या वेगाशी जुळली, तर उत्पादकतावाढ वेतनवाढ आणि सर्वसमावेशक रोजगारनिर्मितीत रूपांतरित होऊ शकते. परंतु शिक्षणव्यवस्था आणि कौशल्यधोरणात सुधारणा झाली नाही, तर हीच वाढ उच्च कौशल्य क्षेत्रापुरतीच मर्यादित राहाण्याचा धोका संभवतो.

**AI उपभोगत्यापासून ते AI उत्पादकाकडे; तंत्रज्ञान आणि लोकसंख्यात्मक लाभ यांचे संलग्निकरण**

AI च्या विकासासाठी भारत पायाभूत सुविधा, डेटा सेंटर आणि इतर पूरक क्षेत्रात गुंतवणूक करत आहे, ही केवळ तांत्रिक गुंतवणूक नसून ती भारताच्या दीर्घकालीन विकास धोरणाशी निगडित आहे. भारत केवळ AI तंत्रज्ञानाचा ग्राहक राहिला, तर डिजिटल अवलंबित्वाचा धोका निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. लोकसंख्यात्मक लाभाचा पूर्ण उपयोग करण्यासाठी देशाने AI उपभोगत्यापासून उत्पादकाकडे संक्रमण करणे आवश्यक आहे. भारतीय भाषामध्ये आणि सामाजिक-आर्थिक वास्तवावर आधारित AI विकसित करणे अत्यावश्यक ठरेल. महानगराच्या पलीकडे संशोधन प्रयोगशाळाचा विस्तार आणि विद्यापीठांमध्ये AI आधारित शिक्षण समाविष्ट केल्यास विद्यार्थी तंत्रज्ञानाचे निर्माते बनू शकतात. त्यामुळे भारताने जर स्वतःचे AI मॉडेल विकसित केले नाही, तर तांत्रिक वसाहतवादाचा धोका निर्माण होऊ शकतो. परकीय तंत्रज्ञावर वाढते अवलंबित्व दीर्घकालीन आर्थिक आणि धोरणात्मक जोखमी निर्माण करू शकते.

**अर्थसंकल्पातील AI कौशल्यविकास आणि अंमलबजावणीचे आव्हान**

यंदाच्या अर्थसंकल्पात अर्थमंत्र्यांनी जाहीर केलेल्या टॅक्स हॉलिडे (Tax Holiday) आणि तंत्रज्ञानासाठीच्या प्रोत्साहात्मक उपाययोजना या केवळ उद्योगांना दिलेल्या सवलती नसून भारताच्या भविष्यातील AI वर आधारित अर्थव्यवस्थेची पायाभरणी करण्याचा प्रयत्न आहे. या धोरणाच्या माध्यमातून AI आणि डिजिटल तंत्रज्ञानाला सार्वजनिक पायाभूत सुविधांचा दर्जा देण्याचा सरकारचा दृष्टिकोन दिसून येतो. आतापर्यंत AI मुळे रोजगार घटण्याची भीती विविध स्तरावर व्यक्त केली जात होती, त्यामुळे केवळ तंत्रज्ञानात गुंतवणूक न करता मानवी कौशल्यविकासाला समांतर प्राधान्य देणेही तितकेच आवश्यक ठरते. सरकारने शालेय स्तरावर AI लॅब स्थापन करण्याची तरतूद केली असून, डिजिटल साक्षरतेसंबंधी विविध योजना यावर्षी सुरू केल्या आहेत. विशेषतः ग्रामीण भागात डिजिटल साक्षरता तुलनेने कमी असल्याने ग्रामीण युवकांना तंत्रज्ञानाधारित रोजगारासाठी सक्षम करणे ही एक महत्त्वाची धोरणात्मक गरज आहे. सध्या सरकार या दिशेने प्रयत्नशील असल्याचे दिसून येते. AI मुळे निर्णयप्रक्रिया वेगवान होते, विविध क्षेत्रातील खर्च कमी होतो, लघुउद्योग अधिक कार्यक्षम बनतात, कृषीविज्ञानातील अचूकता वाढण्यास मदत होते. तसेच शिक्षण आणि आरोग्यसेवा सुधारतात. परिणामी, उत्पादकतेत वाढ होऊन आर्थिक वाढीला अप्रत्यक्ष पण मजबूत चालना मिळते आणि ही वाढ दीर्घकालीन स्वरूपाची असते. म्हणून AI हा स्वतः विकास घडवणारा घटक नसून विकासाला गती देणारा प्रेरक आणि सर्वात महत्त्वाचा संरचनात्मक घटक ठरतो.

**डिजिटल सार्वभौमत्वः गुंतवणूक, रोजगार आणि अर्थसंकल्प २०२६ -२७**

भारतीय अर्थसंकल्प २०२६-२७ मध्ये AI व डेटा सेंटर यांना मुख्य पायाभूत सुविधा म्हणून मान्यता देण्यात आली असून गुंतवणूक प्रोत्साहनासाठी दीर्घकालीन उपाययोजना सुचवल्या आहेत. याचा मुख्य उद्देश हा भारताला क्लाऊड सेवा, जागतिक डेटा आणि डिजिटल पायाभूत सुविधांचे केंद्र म्हणून उभे करणे हा आहे. यामुळे परकीय तंत्रज्ञानावरील अवलंबित्व कमी होऊन

डिजिटल सार्वभौमत्व बळकट होण्यामध्ये मदत होईल. तसेच इलेक्ट्रॉनिक्स व सेमीकंडक्टर उत्पादनातील सार्वजनिक गुंतवणूक देशांतर्गत तांत्रिक क्षमता वाढण्यास व उच्च कौशल्याधारित रोजगारनिर्मितीस चालना मिळेल. या गुंतवणुकीमुळे केवळ उत्पादन क्षेत्रच नव्हे तर संशोधन, डेटा व्यवस्थापन, डिझाईन, सेवाक्षेत्रामध्येही नवीन संधी निर्माण होतील. तथापि, डेटा सेंटर आणि औद्योगिक प्रकल्पासाठी पाणी व जमिनीचा मोठा प्रमाणात वापर होणार असल्याने पर्यावरणीय तडजोड (Environmental Trade-off) स्वीकारावा लागण्याची शक्यता आहे.

आपण अर्थसंकल्पात काही क्षेत्रांना मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करूनही त्या क्षेत्रांमध्ये अपेक्षित तो विकास दिसून येत नाही, याचे मुख्य कारण म्हणजे अंमलबजावणीच्या बाबतीत आपण कमी पडतो. त्यामुळे केवळ आर्थिक तरतूद करून बदल घडत नाही, त्यासाठी प्रभावी अंमलबजावणी करणे अनिवार्य ठरते. त्यामुळे AI साठी केवळ मोठी आर्थिक तरतूद करून किंवा खर्च वाढवून विकास साध्य होणार नाही, मानवी क्षमता, संस्थात्मक बांधणी आणि तंत्रज्ञान यांच्या प्रभावी समन्वयातूनच विकास साध्य होऊ शकतो.

### AI वर आधारित विकासाचा पाया: मानवी भांडवल

AI वर आधारित परिवर्तनाचा केंद्रबिंदू मानवी क्षमता आहे. बहुतांश देशांनी आरोग्य आणि शिक्षणाला केवळ कल्याणचा विषय न मानता, उत्पादकता, उत्पन्न, आणि दीर्घकालीन आर्थिक क्षमतेत वाढ करणारा गुंतवणूक गुणक म्हणून पाहिले पाहिजे. कारण निरोगी व्यक्ती अधिक उत्पादक आणि अधिक वेळ कार्य करू शकतो. AI वर आधारित अर्थव्यवस्थेत परिस्थितीनुसार जुळवून घेण्याची क्षमता आणि सतत शिक्षण घेणे अधिक महत्त्वाचं ठरते. भारतात कौशल्य, प्रशिक्षण आणि मानसिक आरोग्य याबाबतीत अजूनही तफावत दिसून येते. या संदर्भात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि असमानता याविषयीचा अलीकडील शैक्षणिक व धोरणात्मक वाद महत्त्वाचा ठरतो. याच अनुषंगाने प्रोफेसर अभिषेक कुमार यांनी पुणे इंटरनॅशनल सेंटर आयोजित आशिया इकॉनॉमिक डायलॉगमध्ये नमूद केले की, आर्थिक विकास साध्य करायचा असेल, तर आरोग्य आणि पोषण क्षेत्रातील गुंतवणूक ही मूलभूत पूर्वअट आहे. त्यांच्या मते, आरोग्य व पोषणावरील गुंतवणुकीमुळे सुमारे २५ टक्क्यांपर्यंत उत्पादकतेत वाढ घडू शकते. कारण निरोगी मानवी भांडवल हेच दीर्घकालीन आर्थिक विकासाचे खरे आधारस्थान आहे.

डॉ. नीरज हत्तेकर यांनी त्यांच्या 'विकसित भारत आणि अर्थसंकल्प २०२५-२६' या पुस्तकातील 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि असमानता' या लेखात कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे आर्थिक असमानता वाढण्याची शक्यता अधोरेखित केली आहे. त्यांच्या मते, AI तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर प्रामुख्याने संशोधन, व्यवस्थापन आणि उच्च कौशल्यधारित क्षेत्रामध्येच केंद्रित राहातो. कारण या क्षेत्रातील कामगाराकडे आवश्यक ती तांत्रिक कौशल्य, विश्लेषण क्षमता आणि निर्णयक्षमता उपलब्ध असते. परंतु इतर क्षेत्रातील कामगारांकडे ही क्षमता तुलनेने कमी असल्याने तंत्रज्ञानाचा लाभ समान रीतीने वितरित होत नाही. परिणामी, आधीपासूनच कुशल असलेल्या घटकांचे उत्पन्न आणि उत्पादकता अधिक वेगाने वाढते, तर इतर घटक मागे राहातात आणि उत्पन्नातील दरी वाढण्याचा धोका निर्माण होतो. म्हणूनच AI मुळे आर्थिक विषमता वाढण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे.

तसेच, २०२३ मध्ये Brynjolfsson, Li आणि Raymond (2023) यांच्या अभ्यासानुसार (स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटी येथे) काही प्रमाणात भिन्न निष्कर्ष आढळले. त्या संशोधनानुसार शासकीय कामासाठी CSC केंद्रामध्ये AI साधनाचा वापर सुरू केल्यानंतर नव्याने या क्षेत्रात

प्रवेश केलेल्या कामगाराची उत्पादकता सुमारे ३४% वाढल्याचे दिसून आले. तर आधीपासून कुशल असलेल्या कामगाराच्या उत्पादकतेत तुलनेने मर्यादित बदल आढळला. या निष्कर्षावरून असे सूचित होते की, योग्य प्रशिक्षण व प्रभावी वापराच्या माध्यमातून AI कमी कौशल्य असलेल्या कामगाराची कार्यक्षमता वाढवून कौशल्यातील दरी काही प्रमाणात कमी करण्यास मदत करू शकतो. तथापि, अपुरे कौशल्य आणि चुकीचा वापर यामुळे लाभाचे वितरण असमान राहाण्याची शक्यता आहे.

**जेंडर बजेटिंग आणि महिलांचा आर्थिक सहभाग: लोकसंख्यात्मक लाभाची किल्ली**

(Gender Budgeting and Women's Economic Particpiation: The Key to the Demographic Dividend)

लोकसंख्यात्मक लाभाचा पूर्ण उपयोग होण्यासाठी केवळ कार्यक्षम वयोगटातील लोकसंख्या जास्त असणे पुरेसे नसते, तर महिलांचा प्रभावी आर्थिक सहभाग अधिक असणे ही तेवढेच महत्त्वाचे ठरते. भारतात पुरुष-महिला असमानता अजूनही मोठ्या प्रमाणात आहे आणि ही दरी कमी करण्यासाठी सार्वजनिक अर्थसंकल्पाचा वापर धोरणात्मक साधन म्हणून केला जातो; यालाच लैंगिक अर्थसंकल्प (जेंडर बजेटिंग) असं म्हटलं जातं. याचा उद्देश वित्तीय धोरण आणि सार्वजनिक खर्चाच्या माध्यमातून महिलांचे सशक्तीकरण करणे आणि त्यांचा सर्वांगीण विकास घडवणे हा आहे.

भारतात जेंडर बजेटिंगची अंमलबजावणी २००५-०६ पासून सुरू झाली असून, त्यामध्ये महिलांच्या शिक्षण, आरोग्य, कौशल्यविकास आणि सामाजिक संरक्षणासाठी विविध तरतुदी करण्यात येतात. मागील काही वर्षापासून अर्थसंकल्पातील जेंडर बजेटिंगमध्ये वाढ दिसून येते. २०२३-२४ मध्ये ५.२९% असलेली तरतूद २०२५-२६ मध्ये सुमारे ८.८६%पर्यंत वाढवण्यात आली आहे. परंतु अंमलबजावणीतील तफावत अत्यंत गंभीर आहे. डॉ.रूपा रेंगे यांच्या मते, उपलब्ध माहितीनुसार नियोजित निधीपैकी सुमारे ७४% रक्कम प्रत्यक्ष उद्दिष्टित योजनांवर खर्चच होत नाही. यावरून धोरणात्मक तरतूद आणि परिणामकारण अंमलबजावणी यातील दरी स्पष्ट होते, जी भारताच्या संस्थात्मक क्षमतेवरील मर्यादा दर्शवते. त्यामुळे या धोरणाचा अपेक्षित परिणाम साध्य होत नाही आणि लोकांचा विश्वास कमी होताना दिसतो. लैंगिक समानतेच्या आंतरराष्ट्रीय निर्देशांकातही भारताची स्थिती काही समाधानकारक नाही. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या 'ग्लोबल जेंडर गॅप' अहवालानुसार, १४८ देशांमध्ये २०२५ मध्ये भारताचा क्रमांक सुमारे १३१ वा नोंदवला गेला आहे. यावरून आर्थिक सहभाग, वेतनसमानता आणि संधीच्याबाबतीत मोठी दरी कायम असल्याचे दिसते. गोल्डमॅन सच्या Womenomics: 25 Years and the Quiet Revolution या अहवालानुसार, गेल्या २५ वर्षांत अनेक देशामध्ये महिलांचा कामगार सहभाग मोठ्या प्रमाणात वाढला असताना भारतात मात्र याउलट प्रवृत्ती दिसून येते; महिलांचा कामगार सहभाग तुलनेन अल्प दिसतो. (Goldman Sachs Research, 2024) यामागे विविध कारणे असू शकतात. जसे की, यांत्रिकीकरण, तांत्रिक बदल, डिजिटलायझेशन आणि AI आधारित उत्पादन संरचनेमुळे कमी कौशल्य क्षेत्रातील संधीमध्ये घट झाल्याचे निरीक्षण नोंदवले गेले आहे.

सामाजिक व संरचनात्मक अडथळे ही तितकेच महत्त्वाचे आहेत. डॉ.रूपा रेंगे यांनी त्याच्या जेंडर बजेटिंगचा लेखाजोखा या लेखात नमूद केले आहे की, शहरी भागातील एका सर्वेक्षणानुसार सुमारे ९१% महिलांना प्रवासादरम्यान असुरक्षित वाटते, ज्याचा थेट परिणाम त्यांच्या रोजगार सहभागावर होतो. असुरक्षिततेमुळे अनेक महिला घराबाहेर पडताना संकोच

करतात. तर ग्रामीण भारतात जवळपास ८०% महिला कृषिक्षेत्रात कार्यरत असल्या तरी केवळ १३.९% महिलांकडे जमिनीचे मालकीहक्क आहेत, म्हणजेच उत्पादनात सहभाग असूनही संपत्तीवरील नियंत्रणात महिला मर्यादित आहेत. याशिवाय महिलांकडून मोठ्या प्रमाणावर विनामूल्य, काळजी अर्थव्यवस्थेत (केअर इकॉनॉमी) श्रम दिले जातात, ज्यांचे संभाव्य आर्थिक मूल्य हे जीडीपीच्या सुमारे १७ ते १८% इतके असू शकते. त्यामुळे महिलांचा श्रमबाजारातील सहभाग वाढवायचा असेल, तर बालसंगोपन सेवा, प्रवासात सुरक्षिततेची हमी, कौशल्य विकास, कामाच्या शिथिल अटी आणि सामाजिक व आर्थिक पायाभूत सुविधा यांसारख्या पूरक धोरणांची आवश्यकता आज भासते. यावरून स्पष्ट होते की, जेंडर बजेटिंग हे केवळ सामाजिक कल्याणाचे साधन नसून लोकसंख्यात्मक लाभाचे आर्थिक रूपांतर घडवण्यासाठी आवश्यक असलेले संरचनात्मक धोरण आहे. महिलांच्या शिक्षण, आरोग्य, सुरक्षितता आणि आर्थिक संधीमध्ये परिणामकारक गुंतवणूक केल्याशिवाय भारताचा लोकसंख्यात्मक लाभ दीर्घकालीन आर्थिक वाढीत परिवर्तित होऊ शकणार नाही.

**AI, शेती आणि ग्रामीण भारत**

भारतात जवळपास ५०% लोकसंख्या अजूनही शेती व शेतीवर आधारित व्यवसायात अवलंबून आहे. कृषिक्षेत्र देशाच्या सुमारे ४५% श्रमशक्तीला रोजगार देते; पण त्याचे जीडीपीमधील योगदान २०% हून कमी आढळते. यावरून उत्पादकता आणि उत्पन्नातील दरी स्पष्ट होते. अशा परिस्थितीत AI हे केवळ तांत्रिक नव्हे, तर संरचनात्मक परिवर्तनाचे प्रभावी साधन ठरू शकते. पीक नियोजन, हवामानाचा अचूक अंदाज, मातीचे परीक्षण, रोगाची ओळख, कृषिक्षेत्रातील नावीन्यकरण तसेच पुरवठा साखळीचे व्यवस्थापन हे AI च्या वापराद्वारे अधिक परिणामकारणपणे करता येऊ शकते. उदा. शेतकऱ्याने AI प्रणालीचा वापर करून मोबाईलवर पिकाचा फोटो अपलोड केल्यास त्या पिकावरील रोग ओळखून योग्य उपाययोजना त्वरित करू शकतो. संबंधित माहिती त्याला घरबसल्या मिळू शकते, त्यामुळे वेळेवर उपाय केल्यामुळे नुकसान टाळण्याची शक्यता वाढते. ही साधने तुलनेने महाग असल्यामुळे अल्पभूधारक शेतकऱ्यासाठी ती वैयक्तिक स्तरावर विकत घेणे कठीण जाते. त्यामुळे ग्रामपंचायत, शेतकरी उत्पादक संस्था किंवा सहकारी संस्थांच्या माध्यमातून सामूहिक खरेदी करून त्याचा सामूहिक वापर करणे अधिक व्यवहार्य आणि सर्वांसाठी उपयुक्त ठरू शकते. पण त्यासाठी अगोदर डिजिटल साक्षरता वाढणे गरजेचे आहे, अन्यथा, शेतकरी या साधनांचा योग्य वापर करू शकणार नाहीत. यासाठी सरकारने AI आधारित प्रशिक्षण कार्यशाळा ग्रामपंचायत पातळीवर आयोजित करून शेतकऱ्याना योग्य ती माहिती आणि मदत उपलब्ध करुण देणे आवश्यक आहे. AI चा वापर फक्त संशोधन आणि व्यवस्थापनापुरते मर्यादित न राहाता कृषिसंशोधन, ग्रामीण आरोग्य, ग्रामीण शिक्षण आणि स्थानिक उद्योजकतेतही विस्तारू शकतो. प्राथमिक आरोग्यसेवेत AI प्रणालीचा वापर काही आजाऱ्यांच्या प्रथमोपचारासाठी केला तर दुर्गम भागातील नागरिकांना योग्य आरोग्यसेवा वेळेत उपलब्ध होऊ शकते. त्यामुळे अनेक आजारांचे वेळेत निदान होऊन जीवितहानी वाचू शकते. आरोग्यसेवा मिळवण्यासाठी होणारी धावपळ कमी होऊन वेळ व पैसा दोन्हींची बचत होईल.

शैक्षणिक क्षेत्रात AI चा नियोजित आणि परिणामकारक वापर केल्यास अध्यापन-अध्ययन प्रक्रियेत नावीन्य येऊन विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची रुची वाढवता येते. तसेच जागतिक स्तरावर टिकून राहाण्यासाठी आवश्यक असलेली कौशल्याधारित शिक्षणपद्धत आणि आधुनिक तंत्रज्ञान विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्यास ते अधिक स्पर्धात्मक बनतील आणि त्यातून सक्षम व

गुणवत्तापूर्ण मानवी भांडवलाची निर्मिती होईल. ज्यामुळे देशाच्या लोकसंख्यात्मक लाभात भर पडेल. तसेच स्थानिक कारागीर, महिला बचत गट आणि सूक्ष्म उद्योग AI प्रणालीचा वापर बाजारपेठेचे विश्लेषण, किंमत निर्धारण, तसेच ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून जागतिक बाजारपेठेत प्रवेश करण्यासाठी करू शकतात. यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेतील स्थानिक उत्पादनात वाढ होऊन भारत अधिक सक्षम निर्यातदार देश बनू शकतो. तसेच AIच्या माध्यमातून मानसिक आरोग्यविषयक उपक्रम राबवून शेतकरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांच्या मानसिक आरोग्याच्या समस्या कमी करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करता येऊ शकतात.

AI चा वापर करून परिवर्तन करण्याची संधी प्रत्यक्षात सर्वांनाच शक्य असते असे नाही. कारण अनेक गावांमध्ये अजूनही इंटरनेटची सुविधा नाही, रस्ते अपुरे आहेत, डिजिटल साक्षरता मर्यादित आहे, तसेच प्राथमिक आरोग्य सुविधा अपुऱ्या आहेत. सामाजिक स्तरावर जातीयता, लिंगभेदभाव अजूनही व्यापक प्रमाणात आहे. रोजगाराची कमतरता, शेतीतील जोखीम यासारख्या संरचनात्मक समस्या अजूनही ग्रामीण भागात कायम आहेत. विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशातील काही भागात कृषिक्षेत्र आजही संकटात आहे. उदाहरणार्थ, महाराष्ट्रात २०२४ मध्ये २६३५ शेतकरी आत्महत्यांची नोंद अधिकृत अहवालांमध्ये करण्यात आली आहे, म्हणजेच दररोज सरासरी किमान पाच शेतकरी आत्महत्या करत आहेत. याची प्रमुख कारणे म्हणजे कर्जबाजारीपणा, पिकांचे अतोनात नुकसान, शेती उत्पादनातील कमी किमती हे आहेत. तर यावर्षीच्या सुरुवातीलाच जानेवारी २०२६ महिन्यात फक्त एकट्या यवतमाळ जिल्ह्यात २२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद झाली आहे. या आकडेवारीचे विश्लेषण करताना हवामान बदल, कर्जव्यवस्था आणि बाजाररचना यांसारख्या व्यापक संरचनात्मक घटकांचा विचार करणे आवश्यक आहे. यावरून कृषिक्षेत्रातील संरचनात्मक संकटाची तीव्रता स्पष्ट होते. म्हणून AIच्या माध्यमातून ग्रामीण समस्यांचे समाधान साधायचे असेल, तर पूरक घटकाची जोड आवश्यक आहे. त्यामध्ये मूलभूत सुविधा, वित्तीय समावेशन, शिक्षण आणि स्थानिक संस्थाची उत्पादन क्षमता बळकट करणे याचा समावेश होतो. त्यामुळे AI आणि ग्रामीण भारत याचा संबंध हा केवळ तंत्रज्ञानाचा प्रश्न नसून सर्वसमावेशक विकासाच्या धोरणाशी निगडित आहे. नवीन उपक्रमासोबत सामाजिक व आर्थिक मूलभूत पायाभूत सुविधांचा संतुलित विकास होणे आवश्यक आहे; त्यामुळे ग्रामीण भागासह संपूर्ण देशाच्या विकासाची शक्यता अधिक जास्त होऊ शकते.

**जोखीम व्यवस्थापन: जबाबदार AI शासनाची गरज** (Managing risk: The need for responsible AI governance)

AI च्या विस्तारामुळे सायबर फसवणूक, डीपफेक, अल्गोरिदमिक पक्षपात आणि डेटाचा गैरवापर आणि डेटाचोरी यांसारख्या जोखमी निर्माण होण्याची शक्यता वाढली आहे. योग्य सुरक्षा उपायांशिवाय तांत्रिक स्वीकार हा अधिक संस्थात्मक क्षमतेपेक्षा वेगाने होऊ शकतो. त्यामुळे नवकल्पना आणि नियमन यांच्यात संतुलित चौकट निर्माण करणे आवश्यक आहे. अशा प्रकारे AI आणि डिजिटल तंत्राचा गैरवापर होऊ नये, यासाठी कडक व स्पष्ट नियामक चौकट तयार करणे गरजेचे आहे. अन्यथा, या तंत्रज्ञानाचा दुरुपयोग होण्याची शक्यता लक्षात घेऊन योग्य कायदे आणि उत्तरदायित्व यंत्रणा पूर्वतयारीने लागू करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते.

**लोकसंख्यात्मक संधीचे विकासात रूपांतर करण्यासाठी धोरणात्मक प्राधान्यक्रम;** (Policy priorities for converting demography into growth)

भारताने पुढील बाबींवर लक्ष केंद्रित केले पाहिजे:

- कौशल्यविकासासाठी ठोस धोरणात्मक उपाययोजना आणि प्रभावी अंमलबजावणी.
- लहान शहरांमध्ये आणि ग्रामीण भागात डिजिटल पायाभूत सुविधांचा व्यापक विस्तार.
- श्रमांना पूरक ठरणाऱ्या तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देणे.
- आरोग्य आणि शिक्षणक्षेत्रात मोठी गुंतवणूक आणि प्रभावी अंमलबजावणी.
- आरोग्य आणि शिक्षणक्षेत्रात AI-आधारित सुधारणा
- स्वदेशी AI संशोधनाला प्रोत्साहन आणि संस्थात्मक पाठबळ देणे.
- गुन्हे आणि डिजिटल फसवणूक रोखण्यासाठी स्पष्ट व कडक नियामक चौकट तयार करणे.

**निष्कर्ष**

भारताचा लोकसंख्यात्मक लाभ स्वयंचलित नसून तो मानवी भांडवल आणि तंत्रज्ञानाच्या प्रभावी संलग्नतेवर अवलंबून आहे. त्याचा अंतिम परिणाम कौशल्यविकास, शिक्षण, आरोग्य पायाभूत सुविधा आणि सर्वसमावेशक धोरणामध्ये किती नियोजनपूर्वक गुंतवणूक करतो आणि त्याची किती प्रभावी अंमलबजावणी करतो यावर अवलंबून राहातो.

महिलांचा आर्थिक सहभाग, ग्रामीण डिजिटल सक्षमीकरण तसेच लघुउद्योग, कृषिक्षेत्र आणि त्यावर आधारित व्यवसाय यांचा तांत्रिक घटकांची जोड दिल्याशिवाय लोकसंख्यात्मक संधीचा पूर्ण लाभ मिळू शकत नाही. जेंडर बजेटिंग, आरोग्य व पोषणातील गुंतवणूक आणि कौशल्याधारित अंमलबजावणी या माध्यमातून प्रभावी व सक्षम श्रमशक्ती निर्माण होऊ शकते. अन्यथा, ही संधी मर्यादित राहाण्याचा धोका आहे. त्यामुळे विकासाचा प्रश्न केवळ निधी किंवा खर्चाचा नसून ते प्रभावी अंमलबजावणी, संस्थात्मक क्षमता आणि तंत्रज्ञानाच्या लोकाभिमुख वापराशी संबंधित आहे.

AI ही जादूची काठी नाही; ती एक शक्तिशाली साधन आहे. जे योग्य वापरल्यास विकासाला गती देते. AI वर आधारित प्रभावी कौशल्य आणि समावेशक धोरण हे मानवी कार्याला गती देणारा प्रेरक घटक म्हणून स्वीकारल्यास भारत लोकसंख्यात्मक लाभाचे शास्वत, सर्वसमावेशक आणि ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेत रूपांतर करू शकतो. अन्यथा, तंत्रज्ञान आणि श्रमबाजार यातील विसंगतीमुळे हीच संधी संरचनात्मक बेरोजगारीत परिवर्तित होऊन लोकसंख्या देशावर ओझं ठरण्याची शक्यत नाकारता येत नाही.

**संदर्भसूची**


१. Aggarwal, T. (2024, April 18). Empowering MSMEs: The role of AI literacy. Observer Research Foundation.

२. Brynjolfsson, E., Li, D., & Raymond, L. R. (2023). Generative AI at work. National Bureau of Economic Research.

३. Government of India. (2025). Economic Survey 2024–25: Artificial Intelligence and Workforce Development. New Delhi: Ministry of Finance.

४. Grossman, M. (1972). On the concept of health capital and the demand for health. Journal of Political Economy, 80(2), 223–255.

५. हातेकर, नीरज. (२०२५). कृत्रिम बुद्धिमत्ता आणि विषमता. विकसित भारत आणि अर्थसंकल्प २०२५-२६. पुणे: युनिक फाऊंडेशन.

६. International Labour Organization. (2021). World employment and social outlook: The role of digital labour platforms in transforming the world of

work. Geneva: ILO.

७. McKinsey Global Institute. (2017). Jobs lost, jobs gained: Workforce transitions in a time of automation.

८. Ministry of Electronics and Information Technology. (2023). India AI mission: Making AI in India and AI work for India. Government of India.

९. NITI Aayog. (2018). National strategy for artificial intelligence. Government of India.

१०. Observer Research Foundation. (2023). Preparing India's workforce for an AI future.

११. Press Information Bureau. (2025). Economic survey highlights on artificial intelligence and workforce development. Government of India.

१२. रेगे-नित्सूरे, रुपा. (२०२५). जेंडर बजेटिंगचा लेखाजोखा. विकसित भारत आणि अर्थसंकल्प २०२५-२६. पुणे: युनिक फाऊंडेशन.

१३. World Bank. (2019). Demographic dividend: Operational tool for pre-dividend countries. Washington, DC: World Bank.

१४. World Economic Forum. (2025). Global Gender Gap Report 2025. Geneva: World Economic Forum.

◆

''प्रत्येक समाजाला दुर्मिळतेच्या प्रश्नाशी सामना द्यावा लागतो आणि हाच दुर्मिळतेचा प्रश्न समाजापुढे सर्व मूलभूत आर्थिक प्रश्न निर्माण करतो. त्यामुळे दुर्मिळतेचा प्रश्न हा समाजापुढे निर्माण होणाऱ्या सर्व मूलभूत आर्थिक प्रश्नांची जननी आहे.

**- मॅक्ना**

माझी सर्वाधिक प्राथमिकता म्हणजे महत्त्वाच्या सामाजिक आणि आर्थिक समस्या सोडविणे ज्यामुळे दीर्घकालीन गरिबी, अज्ञान आणि रोगराईवर फारच कमी कालावधीत मात करता येऊ शकेल.

**- मनमोहन सिंग**

# मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४८ वे वार्षिक अधिवेशन : २०२५-२६ कार्यवाहांचा अहवाल

श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथे मराठी अर्थशास्त्र परिषदचे ४८ वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन दिनांक २ ते ४ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत अत्यंत उत्साही आणि शैक्षणिक वातावरणात पार पडले. या अधिवेशनात महाराष्ट्रातून अर्थशास्त्र विषयातील प्राध्यापक, अर्थतज्ज्ञ, संशोधक विद्यार्थी आणि परिषदेमधील पदाधिकारी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहभाग नोंदवला. या तीन दिवसीय अधिवेशनाचे अध्यक्ष प्रा. डॉ. विलास खंदारे हे होते.

**अधिवेशन उद्‌घाटन सोहळा :**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४८ व्या राष्ट्रीय वार्षिक अधिवेशनाचे उद्‌घाटन रविवार, दिनांक २ नोव्हेंबर २०२५ रोजी श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथे मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. विलास खंदारे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. महाराष्ट्र राज्याचे माजी कृषिमंत्री तथा श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. हर्षवर्धनजी देशमुख हे अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष होते. अकोला पूर्व विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. रणधीर सावरकर यांच्या हस्ते अधिवेशनाचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी मंचावर परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. विकास सुकाळे, कार्यवाहक-खजिनदार डॉ. मारोती तेगमपुरे, अर्थसंवादचे संपादक डॉ. राहुल म्होपरे, परिषदेचे मावळते अध्यक्ष प्रा.डॉ. अनिलकुमार वावरे, आ. किरण सरनाईक, संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. गजानन पुंडकर, केशवराव मेतकर, प्राचार्य केशवराव गावंडे, सुरेशदादा खोटरे, प्रा. सुभाष बनसोड, ४८ व्या वार्षिक अधिवेशनाचे स्थानिक कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. रामेश्वर भिस, स्थानिक कार्यवाह प्रा. धनंजय काळे आदींची उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांचे स्मृतिचिन्ह व रोपटे देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी शोधनिबंधाच्या स्मरणिकेचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. महादेव रिठे व डॉ. संतोष कुटे यांच्या मुद्रा, उत्पन्न आणि रोजगार, डॉ. सुभाष गुर्जर यांच्या भारतीय कृषी अर्थव्यवस्था, डॉ. जयवंत इंगळे यांच्या कृषी विपणन, डॉ. मारोती तेगमपुरे यांच्या अर्था-अर्थी : जागतिकीकरणानंतरचे पेच या पुस्तकांचे प्रकाशन मान्यवरांनी केले. मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने कार्याध्यक्ष डॉ. विकास सुकाळे यांनी परिषदेच्या स्थापनेमागील प्रयोजन आणि कार्यातील प्रगती यावर आपल्या मनोगतात भर दिला. यावेळी कार्यवाह - खजिनदार डॉ. मारोती तेगमपुरे यांनी परिषदेचा गौरवशाली इतिहास, परिषदेची उद्दिष्ट्ये, विस्तार आणि ध्येय याविषयी संक्षिप्त आढावा घेत असताना परिषदेच्या विविध उपक्रमांची व कार्याची माहिती दिली. श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांनी सातत्याने मराठी अर्थशास्त्र परिषदेचे दहावे, अडतिसावे

आणि अठ्ठेचाळीसावे अधिवेशन आयोजित केल्याबद्दल महाविद्यालयाचे कार्यवाहांनी आभार व्यक्त केले / अभिनंदन केले. परिषदेचे मावळते अध्यक्ष प्रा. डॉ. अनिलकुमार वावरे यांनीही यावेळी त्यांच्या कार्यकाळात केलेल्या कामाच्या अनुषंगाने मनोगत व्यक्त केले.

परिषदेच्या ४८ व्या अधिवेशनाचे उद्घाटक मा.आ. रणधीर सावरकर यांनी आपल्या उद्घाटकीय भाषणात अधिवेशाचे उद्घाटन झाल्याचे घोषित केले. अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष महाराष्ट्र राज्याचे माजी कृषिमंत्री तथा श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. हर्षवर्धनजी देशमुख यांनी अधिवेशनास उपस्थित सर्वांचे आपल्या भाषणात स्वागत केले. याबरोबरच भविष्यात मराठी अर्थशास्त्र परिषदेने पुन्हा एकदा अधिवेशन आयोजित करण्याची संधी दिल्यास आम्ही नक्की अधिवेशन आयोजित करू आणि त्यावेळी आपण पुन्हा यावे याचे आमंत्रण मी आपणास आजच देत असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्थानिक कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. रामेश्वर भिसे यांनी केले तर प्रा. अनिता दुबे यांनी सूत्रसंचलन आणि स्थानिक कार्यवाह प्रा. धनंजय काळे यांनी उद्घाटन सत्रातील पाहुण्यांचे आभार व्यक्त केले.

**चर्चासत्र**

४८ व्या अधिवेशन कालावधीत प्रतिवर्षीप्रमाणे एकूण चार चर्चासत्रे संपन्न झाली. रविवार, दिनांक २ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी उद्घाटन सत्रानंतर 'धोके व परताव्याचे सिद्धांतन' या विषयावरील पहिल्या सत्राचे सत्राध्यक्ष म्हणून डॉ. सुभाष सावंत (नाशिक) यांनी कामकाज पार पाडले. या सत्रात सूत्रसंचालक डॉ. संभाजी काळे (भेंडा), तर वृत्तलेखक म्हणून डॉ. दीपक सोनटक्के (पारनेर) यांनी काम केले. सोमवार, दिनांक ३ नोव्हेंबर २०२५ रोजी दुसरे सत्र 'डॉ. मनमोहन सिंग यांचे आर्थिक विचार' याविषयावरील सत्राचे सत्राध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. सुनील नरवडे (छत्रपती संभाजीनगर), सूत्रसंचालक डॉ. जयवंत इंगळे (इस्लामपूर), वृत्तलेखक म्हणून डॉ. विश्वनाथ कोक्कर (वाळूज) यांनी जबाबदारी पार पाडली. त्याच दिवशी तिसरे सत्र 'महाराष्ट्रातील व्यसनाधीनतेचे सामाजिक व आर्थिक पैलू' या विषयांवर पार पडले. या सत्राचे सत्राध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. बाळासाहेब पाटील (पनवेल), सूत्रसंचालक डॉ. सागर कोंडेकर (लातूर), वृत्तलेखक डॉ. वनिता बनकर (छत्रपती संभाजीनगर) यांनी कामकाज यशस्वीपणे पार पाडले. अधिवेशन काळात संपन्न झालेल्या तिन्ही चर्चासत्रात परिषदेचे अध्यक्ष प्रा.डॉ. विलास खंदारे, कार्याध्यक्ष प्रा.डॉ. विकास सुकाळे, कार्यवाह-खजिनदार प्रा. डॉ. मारोती तेगमपुरे यांनी हे सर्व सत्र व्यवस्थित पार पडण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले.

**आयत्या वेळचा विषय**

अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवसी चौथ्या सत्रात आयत्या वेळचा विषय समकालीन आर्थिक प्रश्नांवर खुली चर्चा घेण्यात आली. आयत्या वेळेच्या विषयासाठी 'अमेरिकेचे प्रशुल्क धोरण : भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने व संधी' हा विषय अध्यक्षांनी चर्चेसाठी निवडला होता. या सत्रात प्राचार्य डॉ. दिनकर टकले (परतुर) आणि डॉ. प्रशांत हरमकर (अमरावती) यांनी या विषयाला घेऊन अतिशय प्रभावी मांडणी केली. जागतिक व्यापार धोरणातील अस्थिरता, अमेरिकेची संरक्षणवादी भूमिका आणि भारतीय उद्योग क्षेत्रावर त्याचा दीर्घकालीन परिणाम याबाबत त्यांनी सखोल विश्लेषण केले. त्यांची विस्तृत मांडणी झाल्यानंतर हे सत्र चर्चेसाठी खुले करण्यात आले. यावेळी उपस्थित आजीव सभासदांनी चर्चेत सक्रिय सहभाग घेतला. परिषदेचे अध्यक्ष डॉ. विलास खंदारे यांच्या भाषणाने या सत्राचा समारोप झाला. कार्याध्यक्ष डॉ. विकास सुकाळे यांनी आभार व्यक्त केले.

**प्रा. नी. वि. सोवनी व्याख्यान :**

दिनांक ०२ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजता मराठी अर्थशास्त्र परिषदेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. नी. वि. सोवनी स्मृतीव्याख्यान या नावीन्यपूर्ण

उपक्रमामध्ये पंधरावे पुष्प बँकिंग क्षेत्राचे अभ्यासक श्री. देविदास तुळजापूरकर यांनी गुंफले. 'बँकिंग उद्योगाचे लोकशाहीकरण' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा. डॉ. विलास खंदारे यांनी भूषविले. आपल्या मांडणीची सुरुवात करीत असताना सोवनी यांच्या स्मृतींना उजाळा दिला. आपल्या ओघवत्या शैलीत बँकिंग उद्योगाच्या संदर्भातील विविध दाखले देत या उद्योगाचे लोकशाहीकरण अत्यंत आवश्यक असून या क्षेत्राच्या वाढत्या बाजारीकरणाच्या / खाजगीकरणाच्या काळात राष्ट्रीयीकरण किती आवश्यक असल्याचे आपल्या अभ्यासपूर्ण मांडणीत त्यांनी दाखवून दिले. यावेळी परिषदेचे कार्यवाह - खजिनदार प्रा. डॉ. मारोती तेगमपुरे यांनी प्रा. नी. वि. सोवनी स्मृती व्याख्यानाचा उद्देश आणि त्यांचे मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या उभारणीतील योगदान याविषयीची मांडणी आपल्या प्रास्ताविकात केली. परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. विकास सुकाळे यांनी प्रमुख्य व्याख्याते तुळजापूरकर यांचा परिचय करून दिला. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. विलास खंदारे यांच्या भाषणाने कार्यक्रमाचा समारोप झाला.

**डॉ. गि. सी. कल्याणकर गौरवार्थ व्याख्यान**

परिषदेच्या अकराव्या अधिवेशनाचे अध्यक्ष प्रा. डॉ. गि. सी. कल्याणकर यांच्या गौरवार्थ आयोजित व्याख्यानात प्राचार्य डॉ. सूर्यकांत जगदाळे यांनी 'डोनाल्ड ट्रम्प यांचे आयात धोरण - पायावर कुऱ्हाड की कुऱ्हाडीवर पाय' या उपरोधिक पण विचारप्रवर्तक विषयावर भाष्य केले. अमेरिकेच्या आयातनीतीचा जागतिक बाजारावर होणारा प्रभाव आणि भारतासाठी निर्माण होणाऱ्या संधी-आव्हानांचा अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून एकूणच या विषयाचा त्यांनी यावेळी परामर्श घेतला. शेवटी डॉ. विलास खंदारे यांनी अध्यक्षीय समारोप केला.

**समारोप सोहळा**

अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी समारोपीय कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. विलास खंदारे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. एस. एस. कावळे (प्र-कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ) यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी मंचावर परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा.डॉ. विलास सुकाळे, कार्यवाह -खजिनदार प्रा.डॉ. मारोती तेगमपुरे, अर्थसंवादचे प्रमुख संपादक प्रा. डॉ. राहुल म्होपरे, स्थानिक कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. रामेश्वर भिसे, स्थानिक कार्यवाह प्रा. धनंजय काळे, परिषदेचे विश्वस्त डॉ. विठ्ठल घिनमिने, डॉ. गणेश गावंडे, परिषदेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य डॉ. बाळासाहेब पाटील, डॉ. सुभाष सावंत, डॉ. जयवंत इंगळे, डॉ. विजय भोपाळे, डॉ. राजाराम पाटील, डॉ. जितेंद्र तलवारे, डॉ. विठ्ठल ठावरी, डॉ. हनुमंत भोसले, डॉ. संभाजी काळे, डॉ. लक्ष्मण मस्के आदींची उपस्थिती होती. याप्रसंगी उत्कृष्ट संशोधन निबंधांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. विद्यार्थ्यांनी व संशोधकांनी सादर केलेले निबंध नव्या दृष्टिकोनांनी समृद्ध असल्याचे निरीक्षण मान्यवरांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मोनिका शिरसाठ यांनी केले. आभार प्रा. धनंजय काळे यांनी मानले. अधिवेशन यशस्वी करण्यासाठी आय.क्यू.ए.सी. विभाग, विविध समित्या, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी या स्वयंसेवकांचा विशेष सत्कार करून त्यांचे कौतुक करण्यात आले.

**परिषदेच्या वतीने विविध पारितोषिकांचे वितरण**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने दिल्या जाणाऱ्या विविध पारितोषिकांचे वितरण समारोपाच्या सोहळ्यातील प्रमुख व मान्यवर पदाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले.

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उत्कृष्ट ग्रंथ पारितोषिक (रु. १०००/- व सन्मानपत्र) डॉ. संतोष कदम यांच्या 'अर्थसंकल्पाविषयी सर्वकाही' व डॉ. संजय ठिगळे यांच्या 'अर्थतरंग' या ग्रंथास विभागून देण्यात आले.
- प्रा.मो.स.भावे पारितोषिक (रु.५००/- व

सन्मानपत्र) अर्थसंवादमधील सर्वोत्कृष्ट लेखाबद्दल सुरज रामचंद्र चिगरे व रोहिदास अभंगे यांच्या ‘डॉ. मनमोहन सिंग यांचे अर्थशास्त्रीय योगदान’ (ऑक्टोबर-डिसेंबर २०२४, खंड ४८,अंक ३) आणि अमृत मनोहर चव्हाण व अतुल राजगुरू यांच्या ‘सोलापूर जिल्ह्यातील कृषी जमिनीचा वाढता वापर आणि नगदी पिकांचा आर्थिक अभ्यास.’ (जुलै - सप्टेंबर २०२४, खंड ४८, अंक २) या लेखांना विभागून देण्यात आले.

- प्रा.सौ. अरुणा रारावीकर वृत्तपत्रातील आर्थिक विषयक लेखाला प्रथम पारितोषिक (रु. १०००/- व सन्मानपत्र) डॉ. कृष्णा शहाणे यांच्या ‘कांदा किंमतीचे चक्रव्यूह भेदणार कसे’ तर द्वितीय पारितोषिक (रु. ५००/- व सन्मानपत्र) डॉ. संजय ठिगळे यांच्या ‘अशी ही फसवा फसवी’ या लेखांसाठी देण्यात आला.
- डॉ. रविंद्र सबनीस आर्थिक लेख पारितोषिक (इंग्रजी माध्यमातून रु. ४०००/- व सन्मानपत्र) डॉ. माधव शिंदे व योगेश गोडबोले यांच्या Milk Production in Ahmednagar District - Determinants of decline (Economic and Political Weekly, March 2024) या लेखांसाठी देण्यात आला.
- स्व. भास्कर ढाले स्मृती पारितोषिक (संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथून पदव्युत्तर अर्थशास्त्र विषयात विद्यापीठातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु. २०००/- व सन्मानपत्र) दिले जाणारे पारितोषिक स्नेहा सुभाषराव भोयर यांना देण्यात आले.

**अधिवेशन काळात सादरीकरण झालेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास पारितोषिके :**

- कै. ग.प्र. पिंपरकर पारितोषिक (रु. १०००/- व सन्मानपत्र) अधिवेशन काळात सादर केलेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास दिले जाते. डॉ. उमेश भोकसे यांच्या ‘महाराष्ट्रातील व्यसनाधिनतेचे सामाजिक व आर्थिक पैलू’ व डॉ. होणाश्री पाटील यांच्या ‘डॉ. मनमोहन सिंग - एक प्रभावशाली अर्थशास्त्रज्ञ’ या विषयावरील शोधनिबंधास विभागून देण्यात आले.
- प्रा. कांतीभाई ठक्कर ऋणमुक्ती प्रतिष्ठानचे डॉ. अमर्त्य सेन पारितोषिक (रु. ५००/- व सन्मानपत्र) सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास दिले जाणारे पारितोषिक डॉ. नयना भीमराव पाटील यांच्या ‘भारतीय भाग बाजार - जोखीम आणि परतावा अभ्यास’ या विषयावरील शोधनिबंधास देण्यात आले.
- डॉ. ज.फा. पाटील पारितोषिक (रु.२०००/- व सन्मानपत्र) अधिवेशन काळात सादर केलेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास (विद्यार्थ्यांकरिता) अनिल खरात यांच्या ‘डॉ. मनमोहन सिंग यांचे अर्थशास्त्रीय योगदान’ व स्वाती पाटील यांच्या ‘सोशल मिडिया व्यसनाधिनता एक सामाजिक समस्या’ या शोधनिबंधास विभागून देण्यात आला.
- पद्मजा गंधे पारितोषिक (रु. १०००/- व सन्मानपत्र) अधिवेशन काळात सादर केलेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास (महिलांकरिता) डॉ. प्राजक्ता पोहरे यांच्या ‘जोखीम आणि परताव्याचे आर्थिक सिद्धांत’ या शोधनिबंधास देण्यात आला.
- कै. मातोश्री भागुबाई चांगू ठाकूर पारितोषिक (रु.१५०००/- व सन्मानपत्र) अधिवेशन काळात सादर केलेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास (महिला आजीव सभासदांकरिता) डॉ. तृप्ती कवळे यांच्या ‘आरोग्यक्षेत्रातील जोखीम आणि परताव्याचे सैद्धांतिक विवेचन’ व प्रा. ज्योती प्रदीप भोई यांच्या ‘महाराष्ट्रातील भिवंडी तालुक्यातील तरुणांच्या व्यसनाधिनतेचा त्यांच्या सामाजिक व आर्थिक स्तरावर झालेल्या परिणामांचा चिकित्सक अभ्यास’ या शोधनिबंधास विभागून देण्यात आला.
- कै. मातोश्री भागुबाई चांगू ठाकूर पारितोषिक

(रु.१५०००/- व सन्मानपत्र) अधिवेशन काळात सादर केलेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास (पुरुष आजीव सभासदांकरिता) डॉ. विशाल करपे यांच्या 'भारताच्या आर्थिक विकासात डॉ. मनमोहन सिंग यांचे योगदान' या शोधनिबंधास देण्यात आला.

**ऋणनिर्देश :**

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४८ वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन यशस्वी करण्यात अनेक दृश्य आणि अदृश्य हातांचे सहकार्य लाभले असून, यामध्ये मा. अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष मा.श्री. हर्षवर्धन देशमुख (अध्यक्ष - श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती), स्थानिक कार्याध्यक्ष डॉ. रामेश्वर भिसे (प्राचार्य - शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला), स्थानिक कार्यवाह प्रा. धनंजय काळे, डॉ. उमेश घोडेस्वार, डॉ. प्राजक्ता पोहरे यांच्या प्रत्यक्ष सहकार्याशिवाय हे अधिवेशन यशस्वी होऊ शकले नसते. याप्रसंगी मी त्यांचे आभार प्रकट करतो. शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथील शिक्षक व शिक्षकेत्तर बांधवांचे आभार व्यक्त करणे कार्यवाह-खजिनदार म्हणून माझे कर्तव्य आहे.

**वार्षिक सर्वसाधारण सभा :**

४८ व्या वार्षिक अधिवेशनाच्या निमित्ताने शनिवार, दिनांक ०४ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी २.०० वाजता परिषदेचे अध्यक्ष प्रा.डॉ. विलास खंदारे यांच्या अध्यक्षतेखाली वार्षिक सर्वसाधारण सभा (आमसभा) अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. सभेच्या सुरुवातीलाच परिषदेच्या दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सर्वसाधारण सभेतील काही महत्त्वाचे निर्णय पुढीलप्रमाणे आहेत.

नोव्हेंबर २०२६ मध्ये होणाऱ्या परिषदेच्या ४९ व्या वार्षिक अधिवेशनाचे यजमानपद रयत शिक्षण संस्थेचे बळवंत कॉलेज, विटा, ता. खानापूर, जि. सांगली यांना देण्यात आले. ४९ व्या वार्षिक अधिवेशनासाठी चर्चेकरिता पुढील तीन विषय निश्चित करण्यात आले.

- व्यापार चक्राची सैद्धांतिक चिकित्सा.
- नीती आयोगाच्या परिप्रेक्ष्यातील भारताच्या आर्थिक धोरणांची मीमांसा.
- पर्यावरणीय बदल आणि महाराष्ट्राची अर्थव्यवस्था.

**निवडणूक :**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४९ व्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षपदी प्राचार्य डॉ. रामेश्वर भिसे (अकोला) यांची अविरोध निवड करण्यात आली. विश्वस्त डॉ. विठ्ठल घिनमिने यांची मुदत दि. ३१ मार्च २०२६ रोजी पूर्ण होत असल्यामुळे दिनांक ०१ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२९ या तीन वर्षासाठी विश्वस्त म्हणून डॉ. सुभाष दगडे यांची अविरोध निवड करण्यात आली. दिनांक ०१ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२९ या तीन वर्षांसाठी कार्यकारी मंडळावर प्रा. सदामते मोहन गोविंद - शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, प्रा. पावसे विशाल भाऊसाहेब - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, प्रा. सिताफुले लक्ष्मण सटवाजी - मुंबई विद्यापीठ, मुंबई यांची अविरोध निवड झाली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून प्राचार्य डॉ. जे.एस. पाटील, डॉ. सुभाष गुर्जर यांनी काम पहिले. सर्वांचे मन:पूर्वक आभार!

धन्यवाद!

**प्रा. डॉ. मारोती वि. तेगमपुरे**
कार्यवाह -खजिनदार,
मराठी अर्थशास्त्र परिषद.

# अर्थसंवाद
# (खंड ४९, २०२५-२६)

## अ) लेख सूची


| क्र. | स्वतंत्र लेख | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | सन २०२७-२८ पर्यंत महाराष्ट्राच्या एक ट्रिलियन डॉलर राज्य अर्थव्यवस्थेच्या उद्दिष्ट कालावधीच्या (अ) संभाव्यतेवर संक्षिप्त टिपण | ३ |
| २. | भारताच्या आर्थिक वृद्धीतील अस्थैर्य : वास्तव आणि निष्पत्ती | १७ |
| ३. | कृषी व्यवसायाचे सोनेरी भविष्य: कृषी जोखीम व्यवस्थापन | २७ |
| ४. | भारतीय आर्थिक सुधारणांचे पितामह: डॉ. मनमोहन सिंग..! | ३४ |
| ५. | भारतीय श्रमदलातील लिंगभाव असमानतेचे चिकित्सक अध्ययन | ४३ |
| ६. | NEP - २०२० ची प्रभावी अंमलबजावणी | ५१ |
| ७. | महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासात नाबार्डने केलेल्या कामगिरीचा अभ्यास | ५८ |
| ८. | शेतमजुरांचा तुटवडा समस्या व उपयोजनात्मक अध्ययन | ६५ |
| ९. | शोधनिबंध लेखकांसाठी मार्गदर्शक टिपण.. डॉ. मनमोहन सिंग यांचे अर्थशास्त्रीय योगदान | ७२ |
| १०. | शोधनिबंध लेखकांसाठी मार्गदर्शक टिपण.. जोखीम आणि परताव्याचे आर्थिक सिद्धांतन | ७७ |
| ११. | शोधनिबंध लेखकांसाठी मार्गदर्शक टिपण.. महाराष्ट्रातील व्यसनाधिनतेचे सामाजिक व आर्थिक पैलू | ८३ |
| १२. | ब्रिटिश भारतीय अर्थशास्त्रज्ञ लॉर्ड मेघनाद देसाई यांचे समग्र जीवन व अर्थशास्त्रीय विचार | ९१ |
| १३. | भारतीय महिलांचा श्रमशक्तीतील सहभागाचा आर्थिक-सामाजिक अभ्यास | १०४ |
| १४. | महाराष्ट्रात शेतमजूर कल्याणकारी मंडळाची निर्मिती काळाची गरज | ११२ |
| १५. | लंपी या साथीच्या रोगाचा दूधउत्पादक शेतकऱ्यांवर झालेल्या परिणामाचा अभ्यास - विशेष संदर्भ सांगली जिल्हा | १२६ |
| १६. | वाणिज्य शिक्षणाद्वारे पदवीधर विद्यार्थ्यांच्या रोजगारक्षमतेवर आणि उद्योजकीय कौशल्यावर परिणाम करणाऱ्या घटकांचे विश्लेषण | १३४ |
| १७. | कृत्रिम बुद्धिमत्ता आणि रोजगाराचे बदलते स्वरूप | १४९ |
| १८. | महाराष्ट्रातील व्यावसायिक पिकांचे क्षेत्र, उत्पादन आणि उत्पादकता यांची कामगिरी | १५९ |
| १९. | डॉ. मनमोहन सिंग यांची अर्थनीती: समाजवादी-मिश्र अर्थव्यवस्था ते बाजारकेंद्रित-भांडवलशाही | १६८ |

| | | |
|---|---|---|
| २०. | पुस्तक परिचय : 'अर्था-अर्थी<br>जागतिकीकरणानंतरचे पेच' | १७४ |
| २१. | अर्थशास्त्राचे २०२५ चे नोबेल पारितोषिक :<br>नवप्रवर्तन आणि शाश्वत आर्थिक वृद्धीला समर्पित | १८१ |
| २२. | उच्च शिक्षणातील प्रवेश व शैक्षणिक निवडीवरील<br>सामाजिक-आर्थिक घटकांचा परिणाम : संदर्भ भंडारा जिल्ह्याचा | १९१ |
| २३. | कृषि कर्जमाफीविषयक मतमतांतरांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या<br>बहुविध कृषि संकटाचे आदान व्यय आणि प्रदानप्राप्ती तफावत<br>निर्भर शास्त्रोक्त संगणनाधारित अर्थशास्त्रीय टिपण | २०२ |
| २४. | कौटिल्याचे अर्थशास्त्र - भारतीय संस्कृतीचा अनमोल ठेवा | २३२ |
| २५. | महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या - एक अभ्यास | २४२ |
| २६. | कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) : भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने व संधी | २५६ |
| २७. | सातारा जिल्ह्यातील मजूर महिलांची सामाजिक-आर्थिक स्थिती :<br>विशेष संदर्भ जावली तालुका | २६४ |
| २८. | आर्थिक पाहणी अहवाल २०२५-२६ :<br>उदयोन्मुख आव्हाने आणि भविष्यातील धोरणात्मक दिशेचे चिकित्सक मूल्यांकन | २७४ |
| २९. | केंद्रिय अर्थसंकल्प २०२६-२७ - एक दृष्टीक्षेप | २८६ |
| ३०. | महाराष्ट्र राज्याचा अर्थसंकल्प : २०२६-२७ ते विकसित महाराष्ट्र २०४७ | २९३ |
| ३१. | शाश्वत विकासासाठी हरित वाहतूक : वर्तमान परिस्थिती आणि आव्हाने | ३०५ |
| ३२. | विकसित भारत @ २०४७ साठी आर्थिक सुधारणा | ३१५ |
| ३३. | जागतिक पातळीवरील बदलते आर्थिक संदर्भ आणि भारताची व्यापाररचना | ३२५ |
| ३४. | महाराष्ट्रातील मंदिरामुळे होणाऱ्या विकसित अर्थव्यवस्थेचे अध्ययन | ३३५ |
| ३५. | AI आणि भारताचा लोकसंख्यात्मक लाभ :<br>रोजगारातून सर्वसमावेशक विकासाकडे | ३४५ |
| ३६. | मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४८ वे वार्षिक अधिवेशन :<br>२०२५-२६ कार्यवाहांचा अहवाल | ३५४ |
| ● | संदर्भ सूची | |
| | अ) लेख सूची | ३५९ |
| | ब) लेखक सूची | ३६१ |
| | क) नवीन आजीव सभासदांची यादी | ३६३ |
| | ड) तज्ञ परीक्षक सूची | ३६५ |

# अर्थसंवाद
# (खंड ४९, २०२५-२०२६)

## ब) लेखक सूची


| क्र. | स्वतंत्र लेखक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | ज्ञानदेव तळुले, सुभाष कोंबडे | ३ |
| २. | प्रशांत ज्ञा. हरमकर | १७ |
| ३. | विजय अ. पवार | २७ |
| ४. | गजानन चंद्रकांत खामकर,मारुती बाबुराव राठोड | ३४ |
| ५. | कुंडलिक भिमराव चौगुले | ४३ |
| ६. | सोनल सुभाषराव डगवार | ५१ |
| ७. | जयश्री पंढरीनाथ जाधव, निलेश भगवान महाजन | ५८ |
| ८. | वसंत नानाराव पतंगे | ६५ |
| ९. | किशोर सुतार | ७२ |
| १०. | सुभाष सावंत | ७७ |
| ११. | मारोती तेगमपुरे | ८३ |
| १२. | राजू घनश्याम श्रीरामे | ९१ |
| १३. | राजेंद्र यशवंत शिंदे, स्नेहा संतोष व्यास | १०४ |
| १४. | चंद्रकांत रा. जाधव | ११२ |
| १५. | हणमंत शहाजी सावंत | १२६ |
| १६. | विशाल रामरावजी काळे, योगेश पतींगे | १३४ |
| १७. | विजय कुंभार | १४९ |
| १८. | अमृत. म. चव्हाण, राहुल शं. म्होपरे | १५९ |
| १९. | विशाल चंद्रशेखर बेलुरे | |
| २०. | अनिलकुमार वावरे | १७४ |
| २१. | प्रशांत हरमकर | १८१ |
| २२. | धीरज कदम, भेदराज भानुदास धवळे | १९१ |
| २३. | ज्ञानदेव चि. तळुले | २०२ |
| २४. | सुनिता विजय रणाते | २३२ |
| २५. | जयश्री पंढरीनाथ जाधव, निलेश भगवान महाजन | २४२ |
| २६. | जालिंदर आनंदराव यादव | २५६ |
| २७. | वावरे अनिलकुमार कृष्णराव, कवितके रामचंद्र भारत | २६४ |

| | | |
|---|---|---|
| २८. | राहुल शं. म्होपरे, गणेश आ. टेकळे | २७४ |
| २९. | प्रमोद पांडुरंगराव लोणारकर | २८६ |
| ३०. | समित माहोरे | २९३ |
| ३१. | विनोद म. गावंडे, लक्ष्मण रामभाऊ म्हस्के, निता सखाराम खिराळे | ३०५ |
| ३२. | राजकुमार आण्णासो वाईंगडे ३१५ | |
| ३३. | एम. एच. शिंदे ३२५ | |
| ३४. | मृणालिनी नरेन्द्र तापसे ३३५ | |
| ३५. | नारायण नामदेव राऊत | ३४५ |
| ३६. | मारोती तेगमपुरे | ३५४ |
| ● | संदर्भ सूची | |
| | अ) लेख सूची | ३५९ |
| | ब) लेखक सूची | ३६१ |
| | क) नवीन आजीव सभासदांची यादी | ३६३ |
| | ड) तज्ञ परीक्षक सूची | ३६५ |


## अर्थसंवाद


| क्र. | स्वतंत्र लेखक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **पुस्तक परिचय व प्रतिक्रिया** | |
| २०. | पुस्तक परिचय : 'अर्था-अर्थी जागतिकीकरणानंतरचे पेच' | १७४ |


''साधनसामुग्रीची दुर्मिळता नाही आणि म्हणून प्रत्येक गरज भागवली जाते आहे, अशी परिस्थिती जेव्हा निर्माण होईल तेव्हा ह्या जगातून अर्थशास्त्र अदृश्य होऊन जाईल; पण असे जग दृष्टीपंथात नाही व पुढेही येणार नाही...''

**मॅक्ना**

# नवीन आजीव सभासदांची यादी

## (१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६)

| अ.क्र. | आजीव सभासदांचे नाव | आजीव सभासद क्र. | पावती क्र. | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | डॉ. तोटरे बाबू दिगांबर | २१३७ | ३१५ | ३१००/- |
| २. | बिरंगळ भरत गोरखनाथ | २१३८ | ३१६ | ३१००/- |
| ३. | शिंदे अमोल सुभाषराव | २१३९ | ३१७ | ३१००/- |
| ४. | वायनाडे सीमा कैलास | २१४० | ३१८ | ३१००/- |
| ५. | प्रा. भांबुरे ज्ञानेश्वर गोविंद | २१४१ | ३१९ | ३१००/- |
| ६. | दुधवडे संजय खंडू | २१४२ | ३२० | ३१००/- |
| ७. | डॉ. चव्हाण दत्तात्रय अर्जुन | २१४३ | ३२१ | ३१००/- |
| ८. | प्रा. पडवळ अनिल नामदेव | २१४४ | ३२२ | ३१००/- |
| ९. | व्यास स्नेहा संतोष | २१४५ | ३२३ | ५१००/- |
| १०. | काळे धनंजय पंजाबराव | २१४६ | ३२४ | ५१००/- |
| ११. | मोरे प्रवीण लक्ष्मण | २१४७ | ३२५ | ५१००/- |
| १२. | सोनवणे शांताराम विठ्ठल | २१४८ | ३२६ | ५१००/- |
| १३. | शिंदे गणेश संभाजी | २१४९ | ३२७ | ३१००/- |
| १४. | काळे विशाल शामरावजी | २१५० | ३२८ | ३१००/- |
| १५. | शैलेश नारायण भांगे | २१५१ | ३२९ | ५१००/- |
| १६. | कोंडलाडे शुभांगी लालू | २१५२ | ३३० | ३१००/- |
| १७. | जगताप गजानन रामराव | २१५३ | ३३१ | ३१००/- |
| १८. | कु.रचना दत्तात्रय कोळपे | २१५४ | ३३२ | ३१००/- |
| १९. | खरात अनिल बन्सी | २१५५ | ३३३ | ३१००/- |
| २०. | गोरे मंदार गोविंद | २१५६ | ३३४ | ३१००/- |
| २१. | शेळके विश्वनाथ काशिनाथ | २१५७ | ३३५ | ३१००/- |
| २२. | मुंढे रवींद्र दत्तू | २१५८ | ३३६ | ५१००/- |
| २३. | डॉ. खोजे ज्ञानेश्वर एकनाथ | २१५९ | ३३७ | ३१००/- |
| २४. | कु. मेघना मारोती तेगमपुरे | २१६० | ३३८ | ३१००/- |
| २५. | प्रा. डॉ. छंगानी नीलम मधुसूदन | २१६१ | ३३९ | ५१००/- |
| २६. | डॉ. धनंजय मुकुंदराव अमरावतीकर | २१६२ | ३४० | ३१००/- |
| २७. | शितल नरेंद्र चवरे | २१६३ | ३४१ | ३१००/- |
| २८. | डॉ. मच्छिंद्र नारायण वर्दलवार | २१६४ | ३४२ | ५१००/- |
| २९. | डॉ. धोंगडे सिद्धार्थ सहादू | २१६५ | ३४३ | ३१००/- |
| ३०. | डॉ. पिसे हनुमंत राजाराम | २१६६ | ३४४ | ३१००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३१. | गणेश भिकाजी शिंदे | २१६७ | ३४५ | ३१००/- |
| ३२. | वाळूंज वर्षा शंकरराव | २१६८ | ३४६ | ३१००/- |
| ३३. | डॉ. शिवाजी नामदेव झाझुर्ने | २१६९ | ३४७ | ५१००/- |
| ३४. | निल्लोलू राजशेखर कनकय्या | २१७० | ३४८ | ५१००/- |
| ३५. | ढवळे भेदराज भानुदास | २१७१ | ३४९ | ५१००/- |
| ३६. | कु. धयाळकर पूजा प्रकाश | २१७२ | ३५० | ३१००/- |
| ३७. | राऊत नारायण नामदेव | २१७३ | ३५१ | ३१००/- |
| ३८ | मिनाक्षी गणेश सोनोने | २१७४ | ३५२ | ३१००/- |
| ३९. | डॉ. संगीता शशिकांत शिंदे | २१७५ | ३१४ | ५१००/- |

**सूचना :** रुपये ३१००/- आजीव सभासद वर्गणी देणारे सभासद विद्यार्थी किंवा विना अनुदानित संस्थेमध्ये कार्यरत आहेत. त्यामुळे त्यांचेकडून इमारत निधी घेण्यात आला नाही.

## ‘अर्थसंवाद’च्या लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

१. लेखकांनी आपले शोधनिबंध Shree Lipi (२३३५) किंवा Kruti Dev किंवा Unicode यापैकी कोणत्याही Font मध्ये Pagemaker किंवा Ms Word मध्ये टाईप करून पाठवावा. या व्यतिरिक्त कोणताही Font वापरू नये.

२ संशोधनपर लेखाची प्रत अथवा सीडी पोस्टाद्वारे पाठवू नये. काही अडचण असल्यास संपादकांशी संपर्क साधावा.

३. संशोधनपर लेखाची एक सॉफ्ट कॉपी (एक मूळ फाईल व त्याचीच झ्ऊक्र केलेली फाईल अशा दोन फाईल्स्) ई-मेल द्वारे प्रमुख संपादकांकडे rahulmhopare@rediffmail.com या ई-मेल अ‍ॅड्रेसवर पाठवावी. लेखासोबत संपादकांना लेख पाठवल्याची स्वाक्षरी केलेली कव्हर नोट स्कॅन करून पाठवावी. तसेच ई-मेल केल्यानंतर संपादकांशी भ्रमणध्वनीवर (९९२३८७९०२०) संपर्क साधून आपला ई-मेल व्यवस्थित पोचल्याची खात्री करून घ्यावी.

४. संशोधनपर लेख पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल लिहिणे आवश्यक आहे.

५. लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.

६. संशोधनपर लेख खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. लेखात गरजेनुरूप सांख्यिकीय तक्ते व आलेखांचा वापर केल्यास उत्तम. लेखांची गुणवत्ता पाहून तज्ज्ञ परिक्षकांनी केलेल्या सर्व सूचनांची पूर्तता केल्यानंतरच त्याची प्रसिद्धीसाठी निवड केली जाईल.

७. भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा उपयोग करावा. संपादकांना पाठवलेल्या कव्हर नोटसह लेखनाची एक प्रत स्वत जयळ अवश्य ठेवावी.

८. लेखकांनी कृपया संशोधनपर लेख टाईप केल्यानंतर सर्व सांख्यिकी माहिती, शुद्धलेखन आणि व्याकरण अचूक तपासून नंतरच अंतिम प्रत पाठवावी.

९. संदर्भ सूची देताना पूढील पद्धतीने देणे आवश्यक आहे : उदा. पाटील, ज.फा., सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था, सकाळ पेपर्स लिमिटेड, पुणे, २०१०, (पृष्ठ क्रमांक असेल तर द्यावा.)

# अर्थसंवाद - तज्ञ परीक्षक सूची

अर्थसंवादच्या खंड ४९ मधील अंक १ ते अंक ४ मधील लेखांचे परीक्षण खालील तज्ञांनी केलेले आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. श्रीनिवास खांदेवाले | - | नागपूर |
| २. | डॉ. दि. व्य. जहागीरदार | - | अमरावती |
| ३. | डॉ. सौ. मुक्ता जहागीरदार | - | अमरावती |
| ४. | डॉ. संतोष दास्ताने | - | पुणे |
| ५. | डॉ. सुरेश ढाके | - | भुसावळ |
| ६. | डॉ. विकास सुकाळे | - | नांदेड |
| ७. | डॉ. एस. एम. भोसले | - | आटपाडी |
| ८. | डॉ. सुभाष पाटील | - | पुणे |
| ९. | डॉ. मारोती तेगमपुरे | - | अंबड |
| १०. | डॉ. के. के. पाटील | - | अर्धापूर |
| ११. | डॉ. आर. जी. रसाळ | - | लोणी |
| १२. | डॉ. राहुल शं. म्होपरे | - | अर्जूननगर |
| १३. | डॉ. दिलीप अर्जुने | - | जालना |
| १४. | डॉ. अनिल वावरे | - | सातारा |
| १५. | डॉ. अजय दरेकर | - | बारामती |
| १६. | डॉ. राजकुमार वाईंगडे | - | अर्जुननगर |
| १७. | राजेंद्र भांडवलकर | - | यवतमाळ |
| १८. | अनिल वावरे | - | सातारा |
| १९. | धीरज कदम | - | नागपूर |
| २०. | समीत माहोरे | - | नागपूर |
| २१. | राजू पाटील | - | सोलापूर |
| २२. | बाळासाहेब पाटील | - | पनवेल |
| २३. | माधव शिंदे | - | अ.नगर |

## ‘अर्थसंवाद’ या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन

**(फॉर्म ४, नियम ८ नुसार)**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रकाशन स्थळ | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/‘संगाई’, घर नं. २२, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपाच्यामागे, पारनेर रोड, अंबड, जि. जालना - ४३१२०४ |
| २. | नियतकाल | : | त्रैमासिक |
| ३. | मुद्रकाचे नाव | : | मारोती वि. तेगमपुरे |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | ‘संगाई’, घर नं. २२, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपाच्यामागे, पारनेर रोड, अंबड, जि. जालना - ४३१२०४ |
| ४. | मुद्रण स्थळ | : | भारती मुद्रणालय, ८३२ ई, शाहूपुरी ४ थी गल्ली, कोल्हापूर ४१६ ००१ फोन : (०२३१) २६५४३२९ |
| ५. | प्रकाशकाचे नाव | : | बाब क्र. ३ प्रमाणे |
| ६. | संपादकाचे नाव | : | राहुल शंकरराव म्होपरे |
| ७. | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | ‘सर’ निवास, री. स. नं. ३३/क/२, प्लॉट नं. १८, लेक व्ह्यू कॉलनी, दीपा गॅस गोडावूनच्या पाठीमागे, उजळाईवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर, पिन : ४१६ ००४ |
| ८. | मालकाचे नाव | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा : सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेन्ज, एम.एन. रॉय ह्यूमन डेव्हलपमेन्ट कॅम्पस, प्लॉट क्र. ६, एफ् ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूलजवळ, सरकारी वसाहत इमारत क्र. ३२३ समोर, वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०० ०५१ |

मी मारोती वि. तेगमपुरे असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

**मारोती वि. तेगमपुरे**
मुद्रक व प्रकाशक



# मातोश्री भागूबाई चांगू ठाकूर

मातोश्री भागूबाई चांगू ठाकूर या आपल्या कुटुंबियांसाठी तसेच समाजासाठी एक दीपस्तंभ आणि अत्यंत आदरणीय व्यक्ती होत्या. साधे परंतु मूल्याधिष्ठित जीवनतत्त्वज्ञान आचरणात आणणाऱ्या सहृदयी व्यक्ती म्हणून त्यांना समाज मान्यता मिळाली होती. एका सामान्य व्यक्तीची असामान्य यशोगाथा अशा शब्दात त्यांच्या जीवनचरित्राचे वर्णन करता येईल.. नेतृत्व, कर्तृत्व आणि दातृत्व यांचा अनोखा संगम असणाऱ्या माजी खासदार श्री. रामशेठ ठाकूर यांनी आपल्या मातोश्रींच्या स्मरणार्थ जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेअंतर्गत खालील शैक्षणिक संस्था स्थापन केल्या.

१) भागूबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालय (२००९–२०१०)

२) मातोश्री भागूबाई चांगू ठाकूर विद्यालय (२०१०)

३) याचबरोबर मराठी अर्थशास्त्र परिषदेस मातोश्री भागूबाई चांगू ठाकूर यांच्या नावे विविध उपक्रम राबवण्यासाठी माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी २० लाख रुपयांची भरघोस देणगी दिली.

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452




सौजन्य : प्राचार्य डॉ. जे. एस. पाटील



भारती मुद्रणालय, कोल्हापूर